मराठी जीवन छटा

मराठी माध्यमिक अभ्यास क्रमासाठी पाठयपुस्तकळ

विजया चिटणीस
सुमन बेलवलकर

भारतीय भाषा संस्थान
मैसूर, भारत

मराठी जीवन छटा

मराठी माध्यमिक अभ्यास क्रमासाठी पाठयपुस्तकळ

Central Institute of Indian Languages
Publication No. 481

Subject: Major Indian Languages - Marathi

मराठी जीवन छटा

मराठी माध्यमिक अभ्यास क्रमासाठी पाठयपुस्तकळ

विजया चिटणीस
सुमन बेलवलकर

भारतीय भाषा संस्थान
मैसूर, भारत

marathi jeevan chata
(Intermediate Course Reader : Marathi) by
Vijaya Chitnis
Suman Belwalkar

First Published : *October 2001*
Asvina 1923

Prof. Udaya Narayana Singh
Director
Central Institute of Indian Languages
Manasagangotri, Mysore-570 006
INDIA

Phone : 0091 / 0821-515820 (Direct)
Telex : 0846-268 CIIL IN
E-mail : udaya@ciil.stpmy.soft.net (Director)
bhasha@sancharnet.in
PABX : 0091 / 0821-515558
Grams : BHARATI
Fax : (00-91)0821-515032
Website : http://www.ciil.org
To contact Head, Publications, E-Mail to: rajya@ciil.stpmy.soft.net

ISBN-81-7342-088-2

Price: Rs. 140.00 (US $.15.00)

Published by Prof. Udaya Narayana Singh, Director,
Central Institute of Indian Languages, Mysore and
Printed by Mr. S.B. Biswas, Manager
CIIL Printing Press, Manasagangotri, Mysore-570 006, India
Cover design : H. Manohar
Production : K. Srinivasacharya

FOREWORD

Disciplines merge, and then converge. Disciplines also emerge. Merger of disciplines could be best instantiated by what was once nicknamed as `hyphenated' linguistics (classical cases like `Socio-linguistics' and `Psycho-linguistics' provide good examples, the latest being `Geo-linguistics'growing on the ashes of what was once recognized as `Dialect geography'). These compounded disciplines show signs of merger very clearly as the stitches are quite visible. It takes long time to drop the hyphens and get more integrated. However, practitioners of these disciplines had their own dogma and learning history because of which they would usually try to push (or pull) the conjoined words (and worlds) apart (so much so that separate approaches would emerge).

But in the history of language sciences, several disciplines have emerged and have made their mark. They have emerged through a longer process of being together in a mutually beneficial manner. In hard-core areas, Phonetics and Semantics are two classical examples. In applied language sciences, Language Teaching & Testing is by far the best example of this kind. Here too, one has seen ideas emanating from different disciplines and converging to create a common base. Some areas in Linguistics had always provided attractive meeting grounds for scholars with varied interests to work on. Some others emerged, but got sidelined again. (For instance, the once popular, Morphology, which bounced back as Word Formation, came up again as a point of focus with its original title). However, there have also been disciplines which grew out of linguistics or from dissatisfaction of it, but later assumed a much bigger canvas – large enough to involve people who would like to be miles away from grammar. The emergence of Semiotics with Saussure, later practiced as Semiology by modern greats as Rolland Barthes is a case in hand.

The areas such as Language Teaching always attracted the faculty at the Central Institute of Indian Languages, and as a result, a lot of interesting materials got produced. The Intermediate Course on Marathi has been produced in the same series by the Western Centre of the Institute at Pune. They cover a wide range of writing styles used in the language so that both teachers and second language learners using them benefit from the lessons. The text used here are not merely instances of ideal writing styles, they are also used to teach certain grammatical patterns and lexical coinages.

The language teaching materials produced by the Institute have so far been tried out through a series of 10 months Intensive Training Programme currently offered in the seven regional centres of the Institute at three levels: Basic, Intermediate and Advanced courses. The present book is suitable to be used not only for such language learners who are to be taught as a part of our programme, but also for those who have had introduction to the language through a formal system, and yet have not had chance to go beyond the basics.

I congratulate the teachers who have used and perfected the material as much as the author, Suman Belwalkar. The suggestions, comments, criticisms from all those who may use this teaching material will be most welcome. Specific comments on the aspect of production, including typographical and other errors that may have crept in or stylistic changes could be sent to Dr. K.S.Rajyashree (e-mail: rajya@ciil.stpmy.soft.net), who heads the Publication Unit. Suggestions on teaching and use of these materials could be mailed to Dr. Usha Nair (e-mail: wrlc_in@hotmail.com), Principal of our Centre in the West at Pune.

Mysore
27/09/2001

Udaya Narayana Singh

ACKNOWLEDGEMENT

I am grateful to the authors/poets for their generous permission to iclude their materials in the book. They include; Shri V.V. Shirvadhkar for `*Smruti*', Shri P. Savalaram for `*Ja Muli Ja*', Shri Govind Talwalkar for *Gavkusabaher* (editorial), Shri Niranjan Ghate for `*Saur Urja*' and Shri Madhukar Wakode for `*Lok-Katha*'. And also I am greatly indebted to Dr. Jayant V. Narlikar, Director, Inter-University Centre for Astronomy and Astrophysics for the interview.

I have in my mind a deep sense of gratitude to Dr. E. Annamalai former Director and to Prof. Udaya Narayana Singh, the present Director, Central Institute of Indian Languages (CIIL), who entrusted this assignment to me and seen that this book is printed in the present form.

I am thankful to Drs. N. Ramaswami and J.C. Sharma, former and present Professor-*cum*-Deputy Directors, CIIL respectively, who helped me fruitfully at every stage of preparation of this book and to Dr. Kalyan Kale, Reader, Pune University for vetting the manuscript. His great interest in the subject and thorough reading of the materials came out with a very valuable suggestions, which have been incorporated with utmost respect to him.

Further, my thanks are due to Dr. Usha Nair, Principal, Western Regional Language Centre, Pune for her encouragement and to my senior colleagues Dr. K.P. Lekhwani and Dr. Mrs. Madhu Sampat with whom my discussions were always very fruitful.

Lastly, but not least, I am thankful to Dr.P.N. Dutta Baruah, Reader-*cum*-Research Officer, CIIL, who took initiative in arranging the manuscript on floppy, Mr. Adhikari for neat typing of the manuscript, Mrs. Mahale for providing the references, Ms. Suketa for data entry, and Mrs. Shakuntala for DTP page making and the Publication Unit and Press of CIIL for seeing the printing of this book

Suman Belwalkar

अनुक्रमणिक

INTRODUCTION

'मराठी जीवन छटा' '(Marathi Jiwan Chata)' is an Intermediate Course Reader in Marathi which is specially written for the second language learners of Marathi who have successfully completed the Basic course through 'An Intensive Course in Marathi.' Those who have achieved mastery over the basic Marathi structures on their own can also use this material for further study. This book is basically the prescribed text book for the learners of the Western Regional Language Centre, Pune of the Central Institute of Indian Languages, Mysore. The Intermediate course runs for 12 weeks out of which 350 clock hours are devoted for teaching this Reader. This Reader could also be used by other similar organisations which impart instructions in Marathi to non-Marathi learners and also by Boards of Secondary Education which teach Marathi as a second/third language in the secondary stage.

Aquisition of basic language structures is a primary stage in a language learning course. Once these structures are mastered, the learner is anxious to use them in the language community and to mix with the people. Language being the most effective means for social interaction, helps the learner to know about the people and the land of which language he/she is learning. The Intermediate Course Reader meets this requirement and gradually takes the learner to a stage to be able to comprehend and appreciate the literature in that language. Thus the Intermediate Course is a bridge between the basic language structures and the literature. This book 'मराठी जीवन छटा' is going to be a middle link in the series of text books, namely, 'An Intensive Course in Marathi' and An 'Advanced Course Reader in Marathi' (मराठी शारदियेच्या चंद्रकळा).

This Reader is the main text book for a detailed study of Marathi. This Reader will help learners to proceed further. Small story books, children's books, state government's school readers, newspapers, weeklies, magazines, and passages prepared for listening and reading comprehension serve as supplimentary materials for this Reader.

This course intends to enable the trainees to converse not only with the teachers and fellow trainees on restricted topics but with the native speakers on a variety of topics which are not controlled even though they have acquired with limited vocabulary and structures. At

the end of the course, the learner is competent in reading with comprehension the materials presented in standard written language. The learner is also able to write guided compositions as well as free compositions on a variety of topics in a form of description or a dialogue or biographical sketches.

To achieve these objectives, the Intermediate Course Reader in Marathi 'मराठी जीवन छटा' is designed according to a particular format. The poems, editorials and the folk tales are the selections from literature. All the remaining lessons are written by the authors of this book. The teacher trainees of RLCs are sent for an environmental tour during this course. They are encouraged to take interviews of the eminent personalities they meet during the tour. After completion of the tour they have to write a detailed report of it. Taking into consideration all these factors, we have included in this book one interview and a narration of a trip to a historical place. All the 30 lessons are well graded and arranged according to pedagogical principles. The language of these lessons represents written standard language in simple form which marks a definite progress over the basic course and covers a variety of major forms of communication including narration, description, reflection, conversation, interview, letter writing etc. The lessons in this book focus on various cultural, historical, rural, geographical, scientific and social aspects of Maharashtra, the land and the people of Maharashtra. The book also includes detailed exercises both for content and the language along with the compositional exercises. We hope that the book will serve the learners of Marathi language as a powerful bridge.

The invaluable help, cooperation and constructive suggestions received from Dr. P.N. Dutta Baruah and Dr. Usha Nair in the various stages of preparation of this manuscript and bringing out of this book are acknowledged with gratitude.

Vijaya Chitnis
Suman Belwalkar

प्रस्तावना

"मराठी जीवन छटा" हे पुस्तक मी मराठीच्या प्रशिक्षणार्थ्यांना अतिशय समाधानाने आणि नम्रतापूर्वक सादर करीत आहे. समाधान अशासाठी की, या पुस्तकाचा पहिला आराखडा आणि लेखन ज्यांनी केले त्या पश्चिम विभागीय भाषाकेंद्राच्या पहिल्या प्राचार्या डॉ. [कै] विजया चिटणीस यांचे अपुरे काम या पुस्तकाच्या रूपाने पूर्ण होत आहे. या पुस्तकामागची दृष्टी त्यांचीच होती. म्हणून त्यावर अधिक अधिकार त्यांचा आहे ; याची जाणीव ठेवून नम्रपणा माझ्याकडे घेणे उचित ठरेल.

परभाषिकांना मराठी भाषा शिकवण्यासाठी भारतीय भाषा संस्थान, म्हैसूरने आखलेल्या अभ्यासक्रमातील "मराठी जीवन छटा" हे दुसरे पाठ्यपुस्तक आहे. भाषेचे अध्यापन तंत्रशुध्द आणि सर्वांगीण व्हावे यासाठी अन्य प्रादेशिक भाषांप्रमाणे मराठीचेही प्राथमिक, माध्यमिक आणि उच्चतर असे तीन टप्पे केले आहेत. या तीन टप्प्यांमधे अनुक्रमे संरचना, संस्कृती आणि साहित्य केंद्रस्थानी मानून पाठसामग्री तयार करावी अशी योजना होती. पैकी प्राथमिक अभ्यासक्रमासाठी डॉ. विजया चिटणीस यांनी लिहिलेले 'An Intensive Course in Marathi' हे पाठ्यपुस्तक प्रकाशित झाले आहे. या पुस्तकात मराठी संरचनांचा परिचय करुन दिला आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केलेले विद्यार्थी 'मराठी जीवन छटा' हे पुस्तक हाती घेणार आहेत ; हे लक्षात घेऊन भाषा आणि आशय यांची प्रथम सोपे आणि क्रमाने अवघड अशी रचना केली आहे. हे पुस्तक संपल्यावर उच्चतर अभ्यासक्रमात ते मराठी साहित्याची ओळख करुन घेतील. त्यांना साहित्याच्या उंबरठ्यावर आणून सोडण्यासाठी अखेरचे पाठ संपादकीय, लोककथा, कविता या स्वरूपाचे ठेवले आहेत.

माध्यमिक अभ्यासक्रमाच्या पाठ्यपुस्तकांत सुसूत्रता असावी यादृष्टीने अनुभवी भाषा शिक्षकांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने मार्गदर्शक तत्त्वे आणि पाठांचे विषय यांचा आराखडा बनवला. त्या आराखड्यात किरकोळ बदल करून या

पाठ्यपुस्तकाचे लेखन केले आहे. मराठी भाषिक समाज आणि त्याची संस्कृती यांचा परिचय होण्यासाठी महाराष्ट्राची प्रादेशिक माहिती, भौगोलिक वर्णन, इतिहास, ग्रामीण जीवन, सणसमारंभ, चालीरीती, लोककथा इत्यादींचा समावेश इथे केला आहे. यातील अनुक्रमे दोन ते अकरा हे पाठ आणि त्यांचे स्वाध्याय डॉ. विजया चिटणीस यांनी लिहिले होते. एक संपादकीय आणि तीन लोककथा हे संपादित पाठ आहेत. उरलेले सर्व पाठ, त्यांचे स्वाध्याय, सर्वांचे शब्दार्थ आणि टिपा मी लिहिल्या आहेत. हे पुस्तक जरी मराठी दुसरी भाषा म्हणून शिकणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांना डोळ्यांसमोर ठेवून लिहिले असले तरी स्वतंत्रपणे मराठीचा अभ्यास करणाऱ्यांच्या सोयीसाठी शब्दार्थ, टिपा आणि बऱ्याच उदाहरणांसह स्वाध्याय हे भाग विस्ताराने दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीशी संवाद साधण्यासाठी काही प्रश्न 'स्वाध्याया' मधे आहेत. त्यातून शिक्षक आणि विद्यार्थ्यात देवाणघेवाण शक्य होईल.

यातील काही पाठ लिहिताना श्री. गोविंदराव तळवलकर (संपादकीय). श्री. निरंजन घाटे (सौर ऊर्जा) आणि श्री. सुधामधुकर वाकोडे (मराठी लोककथा) यांच्या लेखनाचा उपयोग झाला. त्यांचा ऋणनिर्देश करायला हवा. कविवर्य कुसुमाग्रज, पी. सावळाराम आणि साधुदास यांच्या काव्यलेण्यांनी पुस्तकाचे सौंदर्य आणि प्रतिष्ठा वाढवली. डॉ. जयंत नारळीकर यांनी मुलाखत वाचून ती सुबक, सुबोध व्हावी यादृष्टीने उपयुक्त सूचना केल्या. या सर्व मान्यवर व्यक्तींची मी मनःपूर्वक आभारी आहे.

पाठ्यपुस्तक पूर्ण व्हावे यासाठी प्राचार्या डॉ. उषा नायर यांनी सतत प्रोत्साहन दिले. माझे ज्येष्ठ सहकारी डॉ लेखवाणी आणि डॉ. मधु संपट यांच्याशी झालेल्या चर्चेची मला मदत झाली. डॉ. कल्याण काळे प्रपाठक, मराठी विभाग, पुणे विद्यापीठ यांनी सर्व हस्तलिखित तपासून ते दोषरहित केले. श्री. अधिकारीनी सर्व टंकलेखन अतिशय परिश्रमपूर्वक आणि नीटस केले. टिपांमधील माहिती मिळवण्यासाठी आमच्या ग्रंथपाल सौ. यामिनी महाले यांनी संदर्भ शोधून दिले. काम वेळेत पूर्ण होण्यासाठी सर्व प्रशासकीय कार्यवाह श्री. भाटे यांनी तत्परपणे केले. या सर्वांविषयी मी कृतज्ञता व्यक्त करते.

गेली पंचवीस वर्षे वापरात असलेली ही शिक्षणसामग्री पाठ्यपुस्तकाच्या रूपाने प्रकाशित होत आहे. जे अन्य भाषाशिक्षक याचा वापर करतील त्यांच्या सूचनांचे अवश्य स्वागत होईल.

हे पाठ्यपुस्तक लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर विश्वासाने सोपवल्याबद्दल भारतीय भाषा संस्थानचे संचालक डॉ. अण्णामलै म्हैसूर यांची मी ऋणी आहे.

पुणे

सुमन बेलवलकर
पश्चिम विभागीय भाषा केंद्र
डेक्कन कॉलेज, पुणे - ४११००६

१ महाराष्ट्राची तोंडओळख

मित्रांनो आणि मैत्रिणींनो,

आज आपल्या माध्यमिक अभ्यासक्रमाचा पहिला थडा आहे. म्हणून याप्रसंगी आम्ही तुमचं सर्वांचं मनापासून स्वागत करतो. आता तुम्हाला चांगलं मराठी यायला लागलं आहे. म्हणून तुमचं स्वागत आज मराठीतूनच करायचं आहे.

अजून काही महिने तुम्ही महाराष्ट्रात राहून मराठीचा अभ्यास करणार आहात. यासाठी तुम्हाला महाराष्ट्राची तोंडओळख करून देणे योग्य ठरेल. आजच्या महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली. पण या प्रदेशाचे "महाराष्ट्र" असे उल्लेख ७ व्या ८ व्या शतकापासूनच सापडतात. महाराष्ट्राचे 'महंत राष्ट्र (महान राष्ट्र) म्हणौनि महाराष्ट्र बोलिजे" असे यादवकाळात वर्णन केले होते.

यादवकाळापासूनचा इतिहास हा खरा महाराष्ट्राचा इतिहास. यादवांची राजधानी देवगिरी म्हणजेच वेरूळच्या मार्गावरचे आजचे दौलताबाद आणि शिवाजी महाराजांचे नाव तर तुम्हाला माहीत आहेच. मराठयांचा इतिहास महाराष्ट्रात डोंगराडोंगरावर असलेल्या किल्ल्यांमधे तुम्हाला पहायला मिळेल. पुण्यात शनिवारवाडयाच्या रूपात पेशव्यांचा इतिहास उभा आहे. पारतंत्र्यांच्या

काळात गोखले, टिळक, सावरकर, आंबेडकर इ.नी इतिहास घडवला. पण खरा महाराष्ट्र घडवला तो ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास, एकनाथ या संतांनी!

महाराष्ट्राचा भूगोल अरबी समुद्र आणि सहयाद्री यांनी घडवला आहे. या दोन्हींमधली जमिनीची पट्टी म्हणजे कोकण आणि उरलेला देश. देशावर पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा असे भाग आहेत. महाराष्ट्रात एकूण ३० जिल्हे आहेत. 'चांद्यापासून बांद्यापर्यंत' महाराष्ट्राचा विस्तार आहे. सहयाद्री हा महाराष्ट्राचा कणा आहे. कृष्णा, कोयना, भीमा या नद्यांचा उगम सहयाद्रीतच आहे. गोदावरी, वैनगंगा या उत्तर महाराष्ट्राच्या लोकमाता आहेत. खडकवासला, राधानगरी, कोयना, जायकवाडी ही मोठी धरणं महाराष्ट्रात आहेत.

शेती आणि उद्योगातही महाराष्ट्र विकासाच्या वाटेवर आहे. ऊस, कापूस, ज्वारी आणि तांदूळ ही इथली मुख्य पिकं आहेत. उसामुळे साखर कारखाने बऱ्याच ठिकाणी आहेत. दुधाच्या बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण आहे. इथून द्राक्षं, आंबा ही फळं आणि समुद्राकाठावरुन कोळंबी, काजूची निर्यात होते. उद्योगधंद्याबद्दल सांगायचं तर मुंबई ही भारताची औद्योगिक राजधानी आहे. कापड, औषधं, रासायनिक खतं, स्कूटर आणि रिक्षा तयार करण्याचे मोठमोठे कारखाने महाराष्ट्रात आहेत.

महाराष्ट्राची लोकसंख्या ७.८९ कोटी आहे. त्यांमध्ये साक्षरांचे प्रमाण ६४.९ टक्के आहे. बहुतेक लोकांची मातृभाषा मराठी आहे. "बारा कोसावर भाषा बदलते" असं म्हणतात. मराठीच्या पण अहिराणी, सातारी, वऱ्हाडी, कोकणी अशा निरनिराळ्या बोली आहेत. मराठीत समृद्ध साहित्य आहे. संगीत, नाटक, चित्रपट, तमाशा या कलांमध्ये मराठी कलावंत अग्रेसर आहेत.

महाराष्ट्रात अजिंठा, वेरूळसारखी जगप्रसिद्ध ठिकाणं आहेत. महाबळेश्वर, माथेरान, चिखलदऱ्यासारखी थंड हवेची निसर्गरम्य ठिकाणं आहेत. ताडोबा, राधानगरी, रेहेकुरी, नागझिरा ही अभयारण्यं आहेत. पंढरपूर, तुळजापूर, कोल्हापूर सारखी तीर्थक्षेत्रं आहेत. तसेच मिग विमानांचा कारखाना, राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी, राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा यासारख्या राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या संस्था आहेत.

सध्या तुमचा मुक्काम पुण्यात आहे. आणखी काही दिवसांनी आम्ही तुम्हाला दोन आठवडयांसाठी महाराष्ट्रातल्या एखाद्या भागात सहलीला पाठवू. तिथलं जीवन तुम्ही पहाल. तिथली बोली तुम्ही ऐकाल. तिथल्या चालीरीतींचाही तुम्ही अभ्यास कराल. या प्रवासामुळे मराठी भाषेबरोबरच मराठी जीवन आणि मराठी संस्कृतीचीही ओळख तुम्हाला होईल. तुम्हाला शिकवताना आम्हीही तुमच्या जीवनाची आणि संस्कृतीची ओळख करुन घेण्याचा प्रयत्न करु. एकमेकांच्या सामाजिक जीवनाची ओळख झाल्यामुळे आपल्यात राष्ट्रीय एकात्मता निर्माण होईल अशी सदिच्छा मी या ठिकाणी प्रगट करते.

सांस्कृतिक टिपा :-

1. यादवकाळ - (इ.स ७६५ ते १३१२)

हा यादव वंश मूळचा उत्तरेतील मथुरेचा. सुबाहु या पराक्रमी यादवराजाचा मुलगा दृढप्रहार महाराष्ट्रात आला आणि त्याने सेहुण (सिन्नर) येथे राज्य स्थापले. ७६५ ते ११८१ पर्यंत तेवीस यादवराजांनी तिथे राज्य केले. नंतरच्या पाचव्या भिल्लमाने देवगिरी(आजचे दौलताबाद) इथे स्वतंत्र

सत्ता स्थापन केली. त्यानंतर सिंघण, कृष्णदेव, महादेव या राजांनी कोकण दक्षिण महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेशापर्यंत राज्यविस्तार केला. या राजांनी अनेक देवळं बांधली ; विद्या, कलांना आश्रय दिला. महादेव यादवाच्या श्रीकरणाधिप हेमाडपंताने महाराष्ट्रात देवळांची हेमाडपंती रचना प्रचलित केली. रामदेव या नंतरच्या यादवाच्या काळातच 'ज्ञानेश्वरी' ची निर्मिती झाली. या न्यायी आणि सन्मार्गी राजाचा अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीत पराभव झाला. खिलजीने देवगिरीहून अपरंपार लूट नेली. रामदेवपुत्र शंकरदेव आणि त्याचा जावई हरपाल यांनी मुसलमानांविरुद्ध युद्ध केले. पण शेवटी मलिक काफरने त्यांना ठार करून यादवाचे राज्य खालसा केले. यादवकाळ हा महाराष्ट्राचा संपन्न काल मानतात.

2. तमाशा :-

तमाशा ही लोककला आहे. ती खेडूतांची आवडती करमणूक आहे. खेडयातल्या जत्रेत तंबूत किंवा शहरातल्या तमाशा थिएटरात हे तमाशे होतात. इथे कलावंतिणी मोकळ्या शृंगाराचं वर्णन असलेल्या लावण्या गातात. गाताना त्या तालासुरावर नाचतात. बोर्डावर म्हणजे स्टेजवर आधी गण (गणेशवंदन) मग गौळण, वगनाट्य असा क्रम असतो. पेटी, ढोलकी, तुणतुणं इत्यादी वाद्यं ताल धरतात. लावण्या लिहिणाऱ्या कवींना शाहीर म्हणतात. लावण्या आध्यात्मिक सुद्धा असतात. कधी दोन पक्षांमधे सवालजवाब होतात. रामजोशी, होनाजीबाळा, पठ्ठे बापूराव हे प्रसिद्ध शाहीर होऊन गेले. त्यांच्या रचना पायात चाळ बांधून नाचणाऱ्या तरुणी सादर करतात तेव्हा प्रेक्षक आनंदाने बेहोश होतात. आवडती शृंगारिक लावणी ऐकण्यासाठी ते पैसे उधळतात. त्याला दौलतजादा म्हणतात. तमाशा पहायला स्त्रिया जात नाहीत.

शब्दार्थ -

तोंडओळख	-	अल्प परिचय,
उल्लेख	-	निर्देश,
किल्ला	-	गड़
कणा (Back-Bone)	-	पाठीचा आधार,
धरण	-	बांध (हिं) (Dam)
स्वयंपूर्ण	-	आत्मनिर्भर, दुसऱ्याच्या मदतीची गरज नाही असा,
निर्यात	-	Export
अग्रेसर	-	पुढे, अग्रभागी,
अभयारण्य	-	शिकारीला मनाई असलेले संरक्षित वन,
मुक्काम	-	रहाणे, निवास.

थड्यावरचे प्रश्न -

१. पाठाच्या आरंभी कोणाचं स्वागत केलं आहे ? मराठीतून स्वागत करण्याचं काय कारण ?

२. या प्रांताचं नाव महाराष्ट्र असं का पडलं ?

३. महाराष्ट्राच्या इतिहासाचे कोणते प्रमुख टप्पे आहेत ?

४. 'चांद्यापासून बांद्यापर्यंत' महाराष्ट्राचा विस्तार आहे म्हणजे काय?

५. शेती आणि उद्योगातील कोणत्या बाबतीत महाराष्ट्राने प्रगती केली आहे?

६. महाराष्ट्रात निरनिराळ्या बोली कोणत्या भागात बोलल्या जातात?

७. राष्ट्रीय एकात्मता कशामुळे वाढू शकते ?

८. विदर्भ, मराठवाडा, कोकण यांमध्ये कोणते जिल्हे येतात ?

टिपा लिहा -

१. महाराष्ट्राचे किल्ले
२. कोयना धरण
३. महाराष्ट्रातली प्रेक्षणीय ठिकाणं
४. नद्या - लोकमाता

गाळलेले शब्द धड्यातून भरा -

१. आम्ही तुमचं सर्वांचं __________ स्वागत करतो.

२. तुम्हाला महाराष्ट्राची __________ करून देणे योग्य ठरेल.

३. यादवांची राजधानी __________ म्हणजेच आजचे __________ .

४. पुण्याच्या __________ च्या रूपात __________ इतिहास उभा आहे.

५. सहयाद्रीमुळे झालेले महाराष्ट्राचे दोन भाग म्हणजे __________ आणि __________ .

६. सहयाद्री हा महाराष्ट्राचा __________ आहे.

७. दुधाच्या बाबतीत महाराष्ट्र __________ आहे.

८. मराठीच्या ________ , ________ , ________ अशा निरनिराळ्या बोली आहेत.

९. ताडोबा हे ____________ आहे. तर पंढरपूर हे ____________ आहे.

१०. आम्ही तुम्हाला दोन आठवड्यांसाठी ________ पाठविणार आहेत.

भाषाभ्यास -

१. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

स्वागत करणे, ओळख करून देणे, इतिहास घडवणे,
अग्रेसर असणे, औद्योगिक / आध्यात्मिक / सांस्कृतिक राजधानी.

२. मराठीतून -
मराठी, मराठीत, मराठीतून या शब्दांचा वापर ध्यानात घ्या.
माझी मातृभाषा मराठी आहे. किंवा मी मराठी शिकतों.
माझ्याशी मराठीत बोला, मराठीत भाषांतर करा.
त्यांनी प्रश्नांची उत्तरं मराठीतून दिली. मराठीतून भाषण करा.
या तीनही शब्दांचा वापर करुन स्वतंत्र वाक्ये बनवा.

३. डोंगराडोंगरावर म्हणजे प्रत्येक डोंगरावर असे पाच शब्द शोधून त्यांचा वाक्यात उपयोग करा.

४. प्रमाण सांगताना शेकडा अमूक किंवा अमूक टक्के (%) असे सांगण्याची पद्धत आहे. अशी पाच वाक्ये बनवा.

५. ओळख (नाम आणि क्रियापद) ओळखणे, ओळख करून देणे / घेणे / यांची वाक्ये बनवा.

स्वाध्याय -

१. पुण्याजवळ सिंहगड, पुरंदर हे किल्ले आहेत. त्यांपैकी एखाद्या किल्ल्याला भेट देऊन त्याचे वर्णन लिहा.

२. तुमच्या प्रांताविषयी अशी माहिती मराठीत लिहा.

३. अजिंठा वेरूळच्या लेण्यांची माहिती पुस्तकातून वाचून एक टिपण तयार करा.

४. महाराष्ट्रातल्या कलाकारांची माहिती गोळा करुन त्यांची ओळख करून देणारे एक टिपण बनवा.

५. तुमच्या प्रांतातल्या अभयारण्याची माहिती द्या.

२. पुणं शहर

पुणं शहर भारतात फार प्रसिद्ध आहे. सतराव्या शतकात शिवाजीराजे इथे रहात होते. पेशवेकाळात पुणं ही महाराष्ट्राची राजधानी झाली.

पुण्यात जुने अवशेष फारसे नाहीत. जंगली महाराज रस्त्यावर पाताळलेणं या नावाची, काही शतकांपूर्वीची गुहा आहे. या गुहेजवळ जंगली महाराजांचं मंदिर आहे. त्यानंतर पेशव्यांच्या काळची शनिवार वाडा, पर्वती, विश्रामबागवाडा, अशी थोडी ठिकाणं आहेत.

इंग्रज सत्तेवर आल्यानंतर त्यांनीं पुण्यात एक मोठी लष्करी छावणी ठेवली होती आजही पुणं एक महत्त्वाचं लष्करी केंद्र आहे.

पण पुण्याचं खरं महत्त्व वेगळं आहे. ते विद्येचं माहेरघर म्हणून ओळखलं जातं. इथे पूर्वी अनेक राजकीय पुढारी, समाजसुधारक, साहित्यिक, कलावंत आणि विद्वान होऊन गेले आणि आजही आहेत. पुण्यात शिक्षणाची उत्तम सोय आहे आणि इथली हवाही चांगली आहे. त्यामुळे ते मुख्यतः विद्यार्थी आणि पेन्शनर यांचं गाव आहे, असं लोक म्हणतात.

पुण्यात पहाण्यासासारखी स्थळं थोडी आहेत. पर्वतीच्या पायथ्याशी असलेली पेशवेबाग आणि बागेतलं छोटंसं प्राणिसंग्रहालय, पेशवेबागेसमोरच

खूप मोठी सारसबाग, जंगली महाराज रस्त्यावरची संभाजी बाग, रेल्वे स्टेशनच्यापलीकडे असलेलं महात्मा गांधी उद्यान, हया लहानमोठ्या बागा, टेकडीवरचं पर्वती मंदिर, तळ्यातला गणपती, जोगेश्वरी मंदिर या सारखी काही जुनी ऐतिहासिक मंदिरं, शनिवारवाडा, राजा केळकर आणि महात्मा फुले वस्तु-संग्रहालयं, पर्णकुटी इत्यादी. पुण्याच्या लक्ष्मीरस्ता म्हणजे उत्तमोत्तम कपड्यांची, अत्यंत गजबजलेली बाजारपेठ. पुण्याच्था आसपास आळंदी, देहू, चिंचवड, थेऊर यासारखी क्षेत्रं आहेत आणि सिंहगडासारखी इतिहासप्रसिद्ध ठिकाणं आहेत. आगाखान पॅलेसशेजारी महात्मा गांधींची बायको कस्तुरबा, आणि त्यांचे सेक्रेटरी महादेवभाई यांच्या समाध्या आहेत. पुण्यातलं 'बाल गंधर्व रंगमंदिर' हे नाट्यगृह आणि अलंकार, नीलायम इत्यादी अलिशान चित्रपटगृहं यांनी पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घातलेली आहे. १९९३ साली पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय क्रीडास्पर्धांसाठी बालेवाडीला आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडासंकुल तयार झाले आहे. जवळच आकुर्डीला असलेल्या अप्पूघरामुळेही पुण्याचं आकर्षण वाढलं आहे.

असं हे पुणं. वाढत्या औद्योगीकरणामुळे हळूहळू बदलत जाणारं पण तरीही कुठेतरी आपलं 'पुणेरी' पण जपणारं ! दहा महिन्यांच्या तुमच्या वास्तव्यात तुम्ही पुण्याच्या प्रेमात पडलात तर नवल नाही.

सांस्कृतिक टिपा.

१) शनिवारवाडा

थोरले बाजीराव पेशवे यांनी पुण्याच्या मध्यवस्तीत हा वाडा आपल्या कुटुंबियांसाठी १७३० साली बांधून पूर्ण केला. मूळ बांधकाम सात मजली होते. ब्रिटिशांनी जाळून पाडून टाकल्यामुळे आता केवळ तटबंदी शिल्लक आहे.

२) पर्वती

पुण्याजवळच्या टेकडीवर १७५६ साली नानासाहेब पेशव्यांनी हे देवीचे मंदिर बांधले.

३) विश्रामबागवाडा

लक्ष्मीरस्त्यापासून ३० मीटर अंतरावर बाजीराव रस्त्यावर हा वाडा आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात १८०३ ते १८०६ या काळात त्याचे बांधकाम झाले. खर्च त्यावेळी २ लाख आला. त्याची मेघडंबरी अतिशय आकर्षक आहे.

४) लष्करी छावणी

१७८६ साली पुण्यात ब्रिटिश रेसिडेन्सीची स्थापना झाली. १८१७ च्या खडकी लढाईनंतर पुणे लष्करी छावणी अस्तित्वात आली.

५) तळ्यातला गणपती

आज जिथे सारसबाग आहे तिथे पूर्वी तळं होतं. मध्यभागी गणपतीचं लहान देऊळ होतं. गणपती हे पेशव्यांचं दैवत. गुप्त बोलणी करण्यासाठी पेशवे या तळ्यात नौकाविहार करत. पुणे महानगरपालिकेने त्याचं उद्यान बनवलं.

६) राजा केळकर वस्तुसंग्रहालय

श्री. दिनकर गंगाधर केळकर (कवी अज्ञातवासी) यांनी आपला एकुलता एक मुलगा राजा याच्या स्मरणार्थ हे वस्तुसंग्रहालय उभे केले. एका मध्यमवर्गीय माणसाने आपला सर्व पैसा घालून स्वतः भटकून अनेक वस्तू जमवल्या असे हे अद्वितीय संग्रहालय आहे.

७) आगाखान पॅलेस.

इस्मालिया खोजा लोकांचे धर्मगुरू सुलतान महंमदशा आगाखान यांनी १८९२ ते ९७ या काळात हा राजवाडा बांधला. दुष्काळग्रस्तांना काम देण्यासाठी हे बांधकाम करण्यात आले. त्याला खर्च १२ लाख आला. १९४२ ते ४४ या काळात गांधीजींना इथे कैदेत ठेवले होते. त्याकाळात १५ ऑगस्ट १९४२ रोजी महादेवभाईचे आणि २२ फेब्रुवारी १९४४ रोजी कस्तुरबांचे निधन या वास्तूत झाले. १९६९ साली प्रिन्स करीम आगाखाननी हा राजवाडा गांधी स्मारकासाठी राष्ट्राला अर्पण केला.

८) सिंहगड -

मूळ नाव कोंढाणा. सन १३५० पासून त्याचे उल्लेख सापडतात. शिवाजी राजांचे या गडावर वास्तव्य असायचे. १६६५ च्या तहात हा किल्ला मोगलांना [मिर्झाराजे जयसिंह] द्यावा लागला. आग्र्याहून परत आल्यावर राजांनी एकेक किल्ला परत मिळवला. या किल्ल्यावर उदयभान राठोड हा किल्लेदार होता. ४ फेब्रुवारी १६७० रोजी तानाजीला हा किल्ला घेण्यासाठी पाठवले. घनघोर लढाईत दोघे मारले गेले. 'गड आला पण सिंह गेला' ही कादंबरी या प्रसंगावर लिहिली गेली आहे.

शब्दार्थ -

अवशेष	-	जुन्या इमारतीचा शिल्लक राहिलेला थोडा भाग.
माहेरघर	-	मुख्य ठिकाण, निर्मितिकेंद्र
गजबजलेली	-	जिथे सतत गर्दी, धावपळ असते अशी.
बाजारपेठ	-	ज्या रस्त्यावर दोन्ही बाजूला दुकानंच असून जिथे बाजार भरता तो रस्ता.

भर घाल - वाढव.

अलिशान - वैभवशाली, थाट दाखवणारे.

संकुल - निरनिराळे विभाग एकाच छताखाली येतात त्याला संकुल म्हणतात. उदाः-व्यापारी संकुल, commercial complex. चित्रपटसंकुल क्रीडासंकुल

प्र.१ लाः पुढील विधानांचा खुलासा द्या.

१) सबंध भारतात पुण्याला एक विशिष्ट स्थान आहे

२) पुणं हे विद्येचं माहेरघर आहे.

३) पुण्यात आजही कुठेतरी 'पुणेरीपण' दडलेलं आहे

४) बाहेरगावचा पाहुणा पुण्याच्या फार लौकर प्रेमात पडतो

५) पुण्याचा लक्ष्मीरस्ता म्हणजे गजबजलेली बाजारपेठच.

प्र.२ राः पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.

१) पुण्यात कोणकोणते जुने अवशेष आहेत ?

२) पुण्यात कोण कोण थोर लोक होऊन गेले त्यांची नावे सांगून एकेका वाक्यात त्यांचे कार्य सांगा.

३) तुमच्या प्रांतात होऊन गेलेल्या एकेका क्षेत्रातील थोर व्यक्तींची नावे आणि त्यांचे कार्य सांगा.

४) पुण्यातल्या शिक्षणसंस्थांची माहिती करुन घ्या आणि त्यावरुन 'पुणं हे विद्यार्थ्यांचं गाव आहे' असं का म्हणतात ते सांगा.

५) पुण्यात पहाण्यासारखी कोणकोणती ठिकाणं आहेत ? त्यापैकी तुम्ही कोणती पाहिलीत ? आणि तुम्हाला कोणतं ठिकाण सर्वात जास्त आवडलं? का?

प्र.३ राः 'पुणं शहर' या वर्णनात्मक लेखाच्या धर्तीवर, 'माझा प्रांत' विषयावर छोटासा लेख लिहा.

प्र.४ थाः पुढे काही विशेष शब्द दिले आहेत. त्यांचा खुलासा किंवा अर्थ देऊन तुमच्या स्वतःच्या वाक्यात ते शब्द वापरा.

१) राजधानी	२) अवशेष	३) गुहा
४) छावणी	५) माहेरघर	६) पायथा
७) प्राणिसंग्रहालय	८) वस्तु संग्रहालय	९) गजबजलेली
१०) बाजारपेठ	११) क्षेत्र	१२) समाधी
१३) अलिशान	१४) औद्योगीकरण	१५) वास्तव्य

प्र.५ वाः पुढील वाक्ये वेगळ्या प्रकारे लिहून दाखवा :

१) पुण्यात जुने अवशेष फारसे नाहीत.

२) पुणं विद्येचं माहेरघर म्हणून ओळखलं जातं.

३) इथे पूर्वी अनेक राजकीय पुढारी - विद्वान होऊन गेले.

४) पुण्यात पहाण्यासारखी स्थळं थोडी आहेत.

५) तुम्ही पुण्याच्या प्रेमात पडलात तर नवल नाही.

प्र.६ वा: बालेवाडी आणि अप्पूघर ही ठिकाणं पाहून त्यांचं तुमच्या शब्दांत वर्णन लिहा.

३ नाटक

बालगंधर्व रंगमंदिरात गेल्या शनिवारी रात्री 'वेडा कुंभार' नाटकाचा प्रयोग होता. त्याला मी गेलो होतो.

नाटकाला जाताना, वाटेत मला मंगेश आणि यशोदाबाई भेटल्या. मंगेश माझा लहानपणापासूनचा मित्र ! खूप वर्षांनी आमची गाठ पडली. मी मंगेशला विचारलं, "अरे, तू इकडे कुठे ? आणि आता कुठे चाललायस?" मंगेश म्हणाला, "चाललोय 'वेडा कुंभार' ला !"

"काय म्हणतोस ? 'वेडा कुंभार' नाटक पहायला ? अरे वा ! मीपण तिकडेच चाललो आहे. चला, आपण बरोबरच जाऊ. तुम्ही नाटकाची तिकिटं काढली असतीलच." मी म्हणालो.

यशोदाबाई म्हणाल्या, "हो, आम्ही कालच तिकिटं काढून ठेवली आहेत."

आम्ही तिघं रंगमंदिरात जाऊन पोचलो. नाटकाला खूप गर्दी होती. मंगेशनी मला विचारलं, "आज नाटकाचा पहिलाच प्रयोग आहे का ?"

मी म्हटलं, "छे छे ! हया नाटकाचा लौकरच पंचविसावा प्रयोग होणार आहे. पंचविसाव्या किंवा पन्नासाव्या प्रयोगाच्या वेळेला नाटकाच्या

लेखकाचा, नाटकातल्या नटसंचाचा, नाटयसंस्थेतर्फे सत्कार होतो. तेव्हा नाटकाला खूप गर्दी असते. यावेळी नाटकाबरोबर नाटकाचा लेखकही पहायला मिळतो.''

गप्पा मारत मारत आम्ही आत जाऊन आमच्या जागेवर बसलो. बरोबर नऊला पहिली घंटा झाली. दहा मिनिटांनी दुसरी घंटा झाली. तिसऱ्या घंटेला, बरोबर साडेनऊ वाजता, पडदा वर गेला आणि नाटकाचा पहिला अंक सुरु झाला.

रंगमंचावर एका कुंभाराच्या घराचा हुबेहूब देखावा होता. सुरवातीला स्टेजवर कुंभार, त्याचा मुलगा, त्याची सून, इतकी पात्रं होती. नंतर आणखी काही पात्रं आली आणि गेली.

एका तासानी पहिला अंक संपला. पडदा खाली आला. थिएटरमधले दिवे लागले. आम्ही तिघंजण बाहेर आलो. इतक्यात मला नाटकाचे दिग्दर्शक भेटले. नाटक चांगलं बसल्याबददल आम्ही दिग्दर्शकांचं अभिनंदन केलं. मी माझ्या मित्राची त्यांच्याशी ओळखा करून दिली. आम्ही सर्वांनी चहा घेतला.

नंतर दुसरा अंक झाला. दुसरा आणि तिसरा, हे दोन्ही अंक छान झाले. नाटकाचा विषय गंभीर होता. नेपथ्य, प्रकाश योजना, रंगभूषा, सर्व गोष्टी नेटक्या होत्या. थिएटर चांगलं, नाटक चांगलं, नाटकातला नटसंच चांगला त्यामुळे नाटक चांगलं रंगलं आणि मला फार आनंद झाला. सर्वच नट नटयांनी नाटकाच्या तालमी मेहनतपूर्वक केल्या होत्या.

रात्री साडेबाराला नाटक संपलं. मंगेश आणि त्याची बायको रिक्षानी घरी गेली. माझं घर थिएटरच्या जवळच आहे, म्हणून मी पायीच घरी गेलो.

रात्री एक वाजता मी झोपलो.

शब्दार्थ

प्रयोग	-	दोन अर्थ १) Performance, show २) Experiment
यंदा	-	हया वर्षी
रंगमंदिर	-	नाट्यगृह
पात्र	-	नाटकातल्या व्यक्तिरेखा, Characters
नेपथ्य	-	रंगमंचावर नाटकाच्या विषयाला अनुकूल असे पडदे. वस्तू इ.
रंगभूषा	-	Make-up
वेशभूषा	-	Costumes
तालीम	-	Rehearsal
नाटक रंगलं	-	कलाकारांचा अभिनय आणि प्रेक्षकांचा प्रतिसाद यांमधून उत्कृष्ट कलेच्या आविष्काराचा आनंद सर्वानाच मिळाला. जिथे live performance म्हणजे प्रत्यक्ष कला सादर करतात तिथे रंगणे किंवा पडणे हे शब्द वापरले जातात. *उदा:* भाषण, गायन इ.

प्र.१ला:१. ‘वेडा कुंभार’ नाटक कधी आणि कुठे झालं ? त्याला कोण गेलं होतं ?

२. लेखकाला वाटेत कोण भेटलं ? त्याच्या मित्राचं वर्णन करा आणि त्यांच्यातला संवाद थोडक्यात लिहा.

३. प्रतिशब्द द्या :

पंचविसावा प्रयोग ____________

पन्नासावा प्रयोग ____________

पंच्यात्तरावा प्रयोग ____________

शंभरावा प्रयोग ____________

दहावा प्रयोग ____________

दोनशेवा प्रयोग ____________

साठ वर्षे पूर्ण होणे ____________

पन्नास वर्षे पूर्ण होणे ____________

४. पंचविसाव्या प्रयोगाला नाटकाच्या लेखकाचा सत्कार कोण करतं ? आणि का ?

५. प्रत्यक्ष नाटक सुरू होण्यापूर्वी काय घडलं ?

६. रंगमंचावर काय घडलं ?

७. लेखकानी नाटकाच्या दिग्दर्शकांचं अभिनंदन का केलं ?

८. लेखकाला कशामुळे आनंद झाला ?

९. नाटकाला आलेली मंडळी घरी कशी गेली ?

प्र.२ राः हा सर्व धडा संवादरूपात लिहा.

संवादात मी, मंगेश, यशोदाबाई, दिग्दर्शक' एवढी पात्रं घाला.

प्र.३ राः पुढील विधाने चूक असतील तर त्यांच्यापुढे x अशी खूण करा आणि बरोबर असतील तर ✔ अशी खूण करा.

१. मी गेल्या शुक्रवारी नाटकाला गेलो होतो.

२. मंगेशनी यंदाची सुटटी मुंबईत घालवायचं ठरवलं.

३. यशोदाबाईंनी तिकिटं काढून ठेवली होती.

४. शनिवारी नाटकाचा पहिलाच प्रयोग होता.

५. गप्पा मारत मारत सर्व मंडळी घरात जाऊन बसली.

६. साडेनऊ वाजल्याबरोबर पडदा उघडला.

७. रंगमंचावर कुंभाराच्या घराचा खोटा देखावा होता.

८. अंक संपल्यावर पडदा खाली कोसळला.

१०. नाटकाचा विषय विनोदी नव्हता.

११. नटसंच देखणा होता म्हणून नाटक रंगलं.

१२. मी रिक्षानी घरी गेलो नाही.

विरुद्धार्थ द्या:

लहानपण ________ छान ________

गर्दी ______	गंभीर ______
पहिला ______	नेटका ______
हुबेहूब ______	मेहनत ______
नाटक रंगलं ______	जवळ ______
नाटक बसलं ______	

भाषाभ्यास :

प्र.१ लाः पुढील वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा :

गाठ पडणे ______, सुट्टी घालवणे ______,

सत्कार होणे ______, दिवे लागणे ______,

प्रयोग होणे ______

प्र.२ राः पुढील वाक्यांना ३ पर्याय दिले आहेत, त्यातला योग्य पर्याय निवडून त्यावर खूण करा.

'वेडा कुंभार' नाटकाचा प्रयोग होता ______

१. 'वेडा कुंभार' नाटक स्टेजवर होणार होतं.

२. 'वेडा कुंभार' नाटकाची चर्चा होणार होती.

३. 'वेडा कुंभार' नाटकातले लोक प्रयोग करणार होते.

खूप वर्षांनी आमची गाठ पडली :

१. खूप वर्षांनी आम्ही भेटलो.

२. खूप वर्षांनी आम्ही एकमेकांना पाहिलं.

३. खूप वर्षांनी आम्ही पैसे मिळवले.

नाटकाच्या लेखकाचा नाट्यसंस्थेतर्फे सत्कार होतो.

१. नाटकाच्या लेखकाला नाट्यसंस्था हार अर्पण करते.

२. नाटकाच्या लेखकाला नाट्यसंस्था सन्मानानी वागवते.

३. नाटकाच्या लेखकाला नाट्यसंस्था बक्षिस जाहीर करते.

रंगमंचावर एका कुंभाराच्या घराचा हुबेहूब देखावा होता.

१. रंगमंचावर कुंभाराचं घर जसं असतं तसाच देखावा उभा केला होता.

२. रंगमंचावर कुंभाराचं प्रत्यक्ष घर आणून उभं केलं होतं.

३. रंगमंचावर कुंभाराच्या घरासारखं घर होतं.

नाटक चांगलं बसल्याबददल आम्ही दिग्दर्शकांचं अभिनंदन केलं.

१. नाटकातल्या नटनटांकडून उत्तम अभिनय करुन घेतला म्हणून आम्ही दिग्दर्शकांचं अभिनंदन केलं.

२. नाटक स्टेजवर व्यवस्थित मांडून ठेवल्याबददल आम्ही दिग्दर्शकांचं अभिनंदन केलं.

३. नाटक उत्तम रंगण्यासाठी दिग्दर्शकांनी सर्वच गोष्टींची उत्तम काळजी घेतली होती, म्हणून आम्ही दिग्दर्शकांचं अभिनंदन केलं.

प्र.३ राः पुढील वाक्यात रिकाम्या जागी धड्याच्या आधाराने योग्य क्रियापदांची योग्य रूपे भरा :

१. यंदाची सुट्टी मंगेशनी पुण्यात घालवायचं ________

२. मंगेश आणि यशोदाबाई रंगमंदिरात जाऊन ________

३. 'वेडा कुंभार' नाटकाचा लौकरच पंचविसावा प्रयोग ________ आहे.

४. रंगमंदिरात काल दोन लेखकांचा सत्कार ________

५. गेल्या शनिवारी आम्हाला नाटकाबरोबर नाटकाचा लेखकही पहायला ________

६. नंतर आणखी काही पात्रं ________ आणि ________

७. रात्री मंदिरातले सर्व दिवे ________

८. आम्ही लेखकाचं अभिनंदन ________

९. त्या नाटकाचा प्रयोग खूप ________

१०. नाटक पहाटे पाच वाजता ________

प्र.४ थाः पुढे दिलेल्या रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. [धड्यातून शोधून काढून]

१. काल 'वेडा कुंभार' नाटकाचा ________ होता.

२. आम्ही नाटकाची ________ काढली.

३. ते ________ जाऊन पोचले.

४. नाट्यसंस्था नाटकातल्या नटनट्यांचा ________ करते.

५. 'वेडा कुंभार' नाटकाचा ________ फार चांगला होता.

६. तिसऱ्या ________ साडेनऊ वाजता ________ वर गेला.

७. नाटकाचे तिन्ही ________ छान झाले.

८. रंगमंचावर कुंभाराच्या घराचा छान ________ होता.

९. कुंभाराचा पोषाखही ________ होता.

१०. स्टेजवर ________ येत होती आणि जात होती.

११. पहिला अंक संपल्यावर पडदा ________ आला.

१२. दिग्दर्शकांनी नाटक चांगलं ________ होतं.

१३. नाटकाचा विषय ________ होता.

१४. नाटकाचे सर्व ________ खूष ________.

१५. 'वेडा कुंभार' नाटकाचं ________ छान होतं. ________ आणि ________ सुंदर होती, सर्वच गोष्टी छान होत्या.

१६. नाटकातल्या ________ कामं छान केली.

१७. आम्ही नाटकाच्या भरपूर ________ घेतल्या.

१८. सर्वांनी नाटक ________ केलं होतं.

प्र.५ वाः पुढील वाक्यात अधोरेखित केलेल्या दोन शब्दांपैकी तुम्हाला योग्य वाटेल तो शब्द निवडून दुसऱ्या शब्दावर काट मारा :

१. मला बाजारात शामराव भेटले / मिळाले.

२. मीनाची आणि माझी खूप दिवसांनी गाठ झाली / पडली.

३. मी यंदाची सुट्टी पुण्यात घालवली / घालवून दिली.

४. त्यांनी कालच नाटकाची तिकिटं काढून ठेवली / बाजूला ठेवली.

५. आज नाटकाचा योग / प्रयोग चांगला होता.

६. ते नाटककाराचा सत्कार / सन्मान करणार आहेत.

७. काल नाटकाला फार गर्दी / चेंगराचेंगरी होती.

८. नाटकाचा पहिला अंक / आकडा सुरु झाला.

९. पहिल्या अंकात खूप पात्रं / मंडळी होती.

१०. अंक संपल्यावर पडदा खाली आला / गेला.

११. थिएटरमधले दिवे / कंदील लागले.

१२. मी माझ्या मित्राची त्यांच्याशी ओळख करून दिली / ओळख करून घेतली.

१३. नेपथ्य इत्यादी सर्व गोष्टी नेटक्या / नीट होत्या.

१४. नाटक चांगलं रंगलं / रंगात आलं.

१५. नाटक अगदी पडलं / उतरलं.

१६. आम्ही नाटकाच्या तालमी मेहनतपूर्वक / मेहनतपूर्व केल्या होत्या.

१७. रात्री बाराला नाटक संपून गेलं / संपलं.

१८. मंगेश रिक्षानी / रिक्षात घरी गेला.

१९. मी पायानी / पायी घरी गेलो.

२०. रात्री एक वाजता / वाजेतोपर्यंत मी झोपलो.

२१. चांगल्या नाटकाबददल आम्ही नाटककाराचं अभिनंदन / अभिवादन केलं.

प्र.६ वा: अधोरेखित शब्द किंवा वाक्प्रचारांचे समानार्थी असलेले शब्द किंवा वाक्प्रचार वापरून अर्थ न बदलता पुढील वाक्ये लिहा:

१. गेल्या शनिवारी 'वेडा कुंभार' नाटकाचा प्रयोग होणार होता ____________

२. खूप वर्षांनी आमची गाठ पडली ____________

३. मी पण तिकडेच चाललो आहे ____________

४. रंगमंचावर कुंभाराच्या घराचा सुंदर देखावा होता ____________

५. नेपथ्य रंगभूषा, वेषभूषा, इत्यादी सर्व गोष्टी नेटक्या होत्या ____________

६. आम्ही मेहनतपूर्वक तालमी केल्या ____________

७. रात्री साडेबाराला नाटक संपलं ____________

पुढे दिलेल्या शब्दांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा :

१. खूप दिवसांपासूनचा ____________

२. काळजीपूर्वक ____________

३. शाळेतर्फे ____________

४. केशभूषा ____________

५. पात्रपरिचय ____________

काही वाक्य रचना

१. मी यंदाची सुट्टी पुण्यात घालवायचं ठरवलं आहे.

२. काय म्हणतोस ? 'वेडा कुंभार' नाटक पहायला ?

३. तुम्ही नाटकाची तिकिटं काढली असतीलच.

४. आम्ही कालच तिकिटं काढून ठेवली आहेत.

५. आम्ही तिघं रंगमंदिरात जाऊन पोचलो.

६. पंचविसाव्या किंवा पन्नासाव्या प्रयोगाच्या वेळेला / नाटकाच्या लेखकाचा, नाटकातल्या नटसंचाचा / नाट्यसंथेतर्फे / सत्कार होतो.

७. लोकांना नाटकाबरोबर नाटकाचा लेखकही पहायला मिळतो.

८. गप्पा मारत मारत / आम्ही / आत जाऊन / आमच्या जागेवर/ बसलो.

९. नाटक चांगलं बसवल्याबददल आम्ही दिग्दर्शकाचं अभिनंदन केलं.

१०. मी माझ्या मित्राची त्यांच्याशी ओळख करून दिली.

स्वाध्याय

१. तुम्ही पाहिलेल्या मराठी नाटकाचं वर्णन करा.

२. हया धडयाच्या आधारे, तुम्हाला 'नाटक' या गोष्टीबददलचे किती नवे शब्द आणि वाक्प्रचार माहिती झाले त्याची यादी करा.

३. तयार केलेल्या यादीच्या आधारे तुम्ही तुमच्या शाळेतल्या मुलांचं नाटक बसवता आहात अशी कल्पना करुन एक विनोदी प्रसंग वर्णन करुन सांगा.

४. तुमच्या भाषेतल्या एखाद्या उत्तम नाटकाच्या प्रयोगाची ओळख करुन द्या.
तुम्ही कधी स्वतः नाटकात काम केलं आहे का ? कोणत्या नाटकात ? कधी ? सर्व प्रसंगाचं वर्णन करा. [विषय, पात्र-परिचय इ.]

६. 'वेडा कुंभार' नाटकाची गोष्ट काय आहे, ते समजावून घ्या व वर्गात त्याची चर्चा करा.

४ बारसं

दिवाळीत ताई आणि तिचे यजमान प्रभाकरपंत आमच्याकडे आले होते. भाऊबीज झाल्यावर माझे मेहुणे एकटेच परत गेले. ताई आमच्याकडेच राहिली. मी आईला विचारलं, “ताई गेली नाही ?” तेव्हा ती म्हणाली, “तुझ्या ताईला आता बाळ होणार आहे.”

दहा डिसेंबरला ताई गुप्ते डॉक्टरांच्या दवाखान्यात गेली आणि अकराला पहाटे तिला मुलगा झाला. माझ्या छोटया भाच्याला पहायला मी दोन दिवसांनी दवाखान्यात गेलो होतो.

तेवीस डिसेंबरला बाळाचं बारसं करायचं ठरलं. बावीसला संध्याकाळपर्यंत बाळाचे वडील, माझ्या मोठया मामी, माझी आत्या, पुण्यातल्या दोन्ही मावश्या आणि ताईची एक नणंद सरोज, एवढी माणसं आली. सरोज आमच्या ताईएवढीच आहे. म्हणून आम्ही तिला सरोजताई म्हणतो.

तेवीसला सकाळपासून घरात गडबड सुरू झाली. बाळाचा पाळणा स्वतः बाळाच्या वडलांनी सजवला होता. पाळण्याला रंगीबेरंगी फुगे लावले होते. बाळाला सुंदर कपडे घातले होते. सरोजताई बाळाची मोठी आत्या.

म्हणून नाव ठेवण्याचा मान तिचा होता. मी सरोजताईला हळूच विचारलं,"बाळाचं नाव काय ठेवणार ?" ती म्हणाली, "मी आता नाही सांगणार, ऐन वेळी सांगीन."

बारशाची सर्व तयारी झाली. दुपारी चारचा मुहूर्त ठरला होता. हळूहळू गावातली पुष्कळ मित्रमंडळी आणि नातलग जमायला लागले. बरोबर चार वाजता बाळाला पाळण्यात घातलं. सरोजताई त्याच्या कानात काहीतरी पुटपुटली. मग सर्वजण ओरडले, "आम्हाला नाव सांग. आम्हाला नाव सांग."

सरोजताई मोठयानी बोलली, 'पराग' सर्व पाहुण्यांनी बाळाळा भेटी दिल्या. कोणी छानछान खेळणी दिली, कोणी कपडे दिले, कोणी चांदीची वाटी नाहीतर खुळखुळा दिला. बायकांनी ताईची ओटी भरली.

नंतर आईनी सर्वांना पेढे दिले. चहा-कॉफी आणि चिवडा दिला. बायकांना हळदीकुंकू दिलं. खाणं-पिणं झाल्यावर, निरोप घेऊन, जो तो आपापल्या घरी गेला आणि बारशाचा समारंभ संपला.

सांस्कृतिक टिपा.

१. बारशाचे विधी.

बाळाच्या जन्मानंतर पाचव्या दिवशी 'सटवाई' देवीची पूजा करतात. ही देवी बाळाचं भाग्य लिहिते अशी समजूत आहे. यावरुन 'पाचवीला पुजणे' हा वाक्प्रचार आला आहे. याचा अर्थ नशिबातच असणे - जन्मापासून मागे लागणे. उदा. दारिद्र्य त्याच्या पाचवीलाच पुजलं आहे.

बारशादिवशी भिजलेले हरभरे उकडून घुगऱ्या बनवतात. पेढेबर्फीबरोबर घुगऱ्यापण सर्वांना देतात. एखाद्यापेक्षा आपण वयाने मोठे, अनुभवी आहोत हे सांगण्यासाठी "मी तुझं बारसं जेवलो आहे" असं म्हणतात.

बारशाच्या मुहूर्ताआधी पाळणा रंगवून फुलांनी, फुगे बांधून सजवतात. पाळण्यावर चिमणाळं किंवा चांदवा बांधतात. पाळण्याखाली रांगोळी घालतात. चार कोपऱ्यात आणि मधे पानांवर दिवे, घुगऱ्या ठेवतात. वरवंटयाला कुंची गुंडाळून त्याचा "गोपा" बनवतात. आधी पाळण्यात गोपा ठेवतात कारण अशुभ शक्तींची नजर बाळावर आधी पडू नये अशी कल्पना असते. मग दोन सुवासिनी "गोविंद घ्या गोपाळ घ्या" म्हणत पाच वेळा पाळण्याखालून वर - गोपा देतात. मग बाळलाही तसेच करतात. नाव ठेवण्यापूर्वी पाच देवांची नावं बाळाच्या कानात पुटपुटतात. बाळाचं नाव ठेवताना जमलेल्या बायका बाळाच्या आत्याच्या पाठीत धपके मारतात.

२. ओटी.

ओटी म्हणजे मुख्यतः खण नारळ. सुवासिनीचा बहुमान करण्याची ही एक पध्दत आहे. लग्न, मुंज, डोहाळजेवण, हळदीकुंकू अशा प्रसंगी बायकांची ओटी भरतात. गावाला जाणाऱ्या सुवासिनीची पण ओटी भरतात.

जिची ओटी भरायची तिला पाटावर पूर्वेकडे तोंड करुन बसवतात. ताटात हळदकुंकू, खण किंवा कापड, नारळ, तांदूळ घेतात. काही विशिष्ट वेळी पाच फळांनी किंवा गहू आणि खोबऱ्याच्या तुकडयानीपण ओटी भरतात. आधी सुवासिनीला हळदकुंकू लावतात. खणानारळालापण लावतात. काळं किंवा पांढरं कापड ओटीत देत नाहीत. कापडावर नारळ, थोडे तांदूळ ठेवून

बसलेल्या स्त्रीच्या पदरात घालतात. नारळ देताना शेंडी आपल्या बाजूला पाहिजे. नंतर चार वेळा तांदूळ पदरात घालतात. शेवटी थोडे तांदूळ कपाळाला लावून डोक्यावर टाकतात. तिला देवीचं रूप समजून वाकून नमस्कार करतात.

देवीच्या दर्शनाला गेल्यावर देवीची ओटी भरतात. महापुराच्यावेळी नदीचीपण ओटी भरतात.

शब्दार्थ -

यजमान	-	नवरा. पुरोहिताच्या दृष्टीने धार्मिक कृत्य करणारा गृहस्थ.
पाळण्यात घालणे	-	पहा - बारशाचे विधी.
ऐनवेळी	-	नेमक्या त्याच वेळी.
खुळखुळा	-	बाळाला हातात पकडून 'खुळखूळ' वाजवता येईल असं खेळणं.

प्र.१ लाः पुढील वाक्यात अधोरेखित केलेल्या शब्दांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत. त्यांपैकी योग्य त्या पर्यायावर खूण कराः

१. मी आता नाही सांगणार, ऐन वेळी सांगीन.
   १. ठरलेल्या वेळेला
   २. वेळ निघून गेल्यावर

३. पुष्कळ वेळा
४. वेळेच्या आधी.

२. सरोजताई त्याच्या कानात काहीतरी पुटपुटली.
१. बोलली
२. कुजबुजली
३. हसली
४. ओरडली

३. सर्व पाहुण्यांनी बाळाला भेटी दिल्या.
१. वस्तू भेट म्हणून दिल्या
२. पाहुणे बाळाला भेटायला आले
३. बाळाला बक्षिसं दिली
४. बाळाचं कौतुक केलं

४. बायकांनी ताईची ओटी भरली
१. ताईच्या पदरात नारळ ठेवला
२. ताईला हळदकुंकू लावलं
३. ताईला वस्तू दिली
४. ताईला ओवाळलं

प्र.२ राः हया धड्यात आलेल्या नात्याच्या शब्दांची खाली फोड करुन दाखवली आहे. त्यापैकी योग्य वाटणाऱ्या खुलाशावर ✔ अशी खूण करा :

यजमान - १. नवरा
२. पाहुणा

३. घरमालक
४. श्रीमंत

मेहुणा - १. बायकोचा भाऊ
२. बहिणीचा नवरा
३. बहिणीचा मुलगा

भाचा - १. बहिणीचा मुलगा
२. भावाचा मुलगा
३. काकाचा मुलगा
४. मेव्हणीचा मुलगा

नणंद - १. नव-याची बहीण
२. बायकोची बहीण
३. भावाची बायको
४. आईची बहीण

मामा - १. काकीचा भाऊ
२. आईचा भाऊ
३. वहिनीचा भाऊ
४. मामीचा भाऊ

प्र.३ राः कंसात दिलेल्या तीन पर्यायांपैकी बरोबर असलेल्या पर्यायावर अशी खूण करा :

१. अकरा तारखेला पहाटे ताईला मुलगा [होता / झाला / आला]

२. तेवीस डिसेंबरला आम्ही बाळाचं बारसं करायचं [ठरलं / ठरवलं / ठरुन गेलं]

३. आमच्या घरी मामा, मामी, आत्या, मावश्या, नणंदा जावा [एवढी / एवढाली / एवढीशी] माणसं आली होती.

४. सरोज आमच्या [ताईएवढीच / ताईइतकीच / ताईसारखीच] आहे.

५. बाळाला सुंदर कपडे [घातले / घालवले / सजवले] होते.

६. बाळाचा पाळणा बाळाच्या वडिलांनी [सजला / सजवला / साजरा केला] होता.

७. मी बाळाचं नाव बारशाच्या [ऐनवेळी / नंतर / त्याच वेळी] सांगीन

८. सरोजताई त्याच्या कानात काहीतरी [पुटपुटली / कुजबुजली / चिकटली]

प्र.४ थाः रिकाम्या जागा भरा :

१. भाऊबीज झाल्यावर माझे मेहुणे __________ परत गेले.

२. तुझ्या ताईला आता __________ होणार आहे.

३. माझ्या छोटया __________ पहायला मी दवाखान्यात गेलो.

४. तेवीस डिसेंबरला बाळाचं __________ करायचं ठरलं.

५. बारशाला ताईची ____________ सरोज आली होती.

६. बाळाचा ____________ स्वतः बाळाच्या वडिलांनी सजवला होता.

७. दुपारी ____________ मुहूर्त ठरला होता.

८. चार वाजता बाळाला पाळण्यात ____________

९. बायकांनी ताईची ____________ भरली.

१०. आईनी बायकांना हळदीकुंकू ____________

प्र.५ वाः पुढे दिलेल्या गोष्टी करणारे कोण ते लिहा :

१. भाऊबीज झाल्यावर परत जाणारे :

२. मुलाला जन्म देणारी :

३. भाच्याला पहायला जाणारा :

४. बाळाचा पाळणा सजवणारे :

५. बाळाचं नाव ठेवण्याचा मान असणारी :

६. बाळाच्या कानात पुटपुटणारी :

७. बारशाला जमणारे :

८. बाळाला भेटी देणारे :

९. ताईची ओटी भरणाऱ्या :

१०. बायकांना हळदीकुंकू देणारी :

प्र.६ वा: पुढे वाक्प्रचारांच्या काही जोडया दिल्या आहेत. त्यांच्यातला फरक समजून घेऊन दिलेल्या वाक्यातल्या रिकाम्या जागी त्यांचा उपयोग करा :

१.	नाव ठेवणे,	नावं ठेवणे
२.	ओटी भरणे,	ओटीत घालणे
३.	निरोप घेणे,	निरोप देणे
४.	मान देणे,	मान असणे

वाक्यं १. सुशीलाबाईनी आपल्या मुलाला बहिणीच्या ____________

२. लोकांनी रानडयांना बालविवाहबदद्ल खूप ____________

३. मी वसंताचा ________ ____________ आणि घरी आले.

४. विजयाच्या नणंदेनी विजयाच्या मुलाचं ____________

५. आईनी मीनाची खणा-नारळानी ____________

६. बारशाच्या समारंभात नवऱ्याच्या बहिणीचा ____________ ____________

७. डॉ. पंडितांना गावातले लोक फार ____________ ____________

८. ऑफिसात आलेल्या पाहुण्यांना आम्ही ____________

प्र.७ वा: पुढील उतारे काळजीपूर्वक वाचा आणि त्यात सांगितलेल्या घटनांचा एका वाक्यात गोषवारा सांगा.

१. दिवाळीत ताई आणि तिचे यजमान ____________ ताईला आता बाळ होणार आहे.
२. तेवीस डिसेंबरला ____________ एवढी माणसं आली.
३. बारशाची सर्व तयारी ____________ आम्हाला नाव सांग.
४. नंतर आईनी ____________ समारंभ संपला.

धड्यावरचे प्रश्न :

प्र.१ लाः पुढील प्रश्नांची उत्तरं द्या :

१. भाऊबीज झाल्यावर मेहुणे एकटेच परत का गेले ?
२. ताई दवाखान्यात कशासाठी गेली ?
३. बावीसला संध्याकाळपर्यंत कोणकोण मंडळी बारशाला आली ?
४. बाळाचा पाळणा कोणी सजवला होता ? कसा सजवला होता?
५. बाळाचं नाव कोणी ठेवलं ? का ?
६. सर्वजण काय ओरडले आणि का ओरडले ?
७. बाळाचं नाव कळल्यानंतर जमलेल्या पाहुण्यांनी काय केलं ?
८. जमलेल्या बायकांनी काय केलं ?
९. बारशाचा समारंभ कधी संपला ?
१०. बाळाचं नाव काय ठेवलं ?

प्र.२ राः धड्याच्या आधारानी धड्यात एकूण किती घटनांचे वर्णन केले आहे ते थोडक्यात सांगा.

प्र.३ राः दोन मित्रांची खूप दिवसांनी गाठ पडली आहे अशी कल्पना करून हा सर्व घडा संवादरूपानी लिहा.

स्वाध्याय :

प्र.१ लाः धड्याच्या आधारानी मराठी लोक बारशाचा समारंभ कसा साजरा करतात ते लिहा.

प्र.२ राः तुमच्या प्रांतात नवीन जन्मलेल्या मुलाचा नामकरणविधी कसा करतात त्याचं सविस्तर वर्णन करा.

प्र.३ राः तुम्ही एका मराठी कुटुंबात बारशाच्या समारंभाला गेला होता आणि परत आल्यानंतर तुमच्या अमराठी मित्राजवळ तुम्ही समारंभाचं वर्णन करताहात अशी कल्पना करून एक संवाद लिहा.

५ पत्र

ता.

पुणे - ४

प्रिय अरविंद,

स. न.

मी तुला खूप दिवसांनी पत्र लिहिते आहे. हल्ली माझा वेळ फार गडबडीत जातो. कारण इकडे आमचा मराठीचा वर्ग सुरू आहे. आमच्याकडे मराठी शिकण्यासाठी निरनिराळया प्रांतांतले शिक्षक येतात. यंदा आमच्या वर्गात एकूण पंचवीस शिक्षक मराठी शिकताहेत. मराठी शिकायला आलेले हे सर्वच शिक्षक खूप चांगले आहेत. ते अभ्यासही खूप करतात. असो.

तू नागपूरला जाणार होतास असं कळलं. गेला होतास का? नागपूरहून माझ्यासाठी साडी आणलीस का? नागपूरला संत्री खूप स्वस्त मिळतात न? तू संत्र्यांची करंडी आणलीस की नाही?

तुला धुळ्याची माझी मैत्रीण नीला साठे आठवते का? परवा तिचं लग्न होतं. मी लग्नाला गेले होते. लग्नाला खूप ओळखीची मंडळी भेटली.

धुळ्याच्या मंडळींना भेटून मला खूप आनंद झाला. मी नीलाला काचेचा लेमन सेट आहेर म्हणून दिला. नीलाचा नवरा मुंबईचा आहे. नीला आणि तिचा नवरा लौकरच अमेरिकेला जाणार आहेत.

मीना सध्या कुठे आहे ? तिची परीक्षा कधी सुरू होते ? तिची गाण्याची तयारी कुठपर्यंत आली ? तिनी किती नवीन साडया घेतल्या? मला तर हल्ली बाजारात जायला मुळीच वेळ मिळत नाही. त्यामुळे काही नवीन खरेदी नाही. मध्यंतरी एक सिनेमा मात्र पाहिला. सिनेमाचं नाव होतं 'सिंहासन.' सिनेमा खूप छान होता. मला तुझी आणि मीनाची खूप आठवण आली. तुम्ही तो सिनेमा धुळ्याला लागला की जरूर पहा. प्रभाकरसुद्धा मला पुष्कळ दिवसांत भेटलेला नाही. मुलांची परीक्षा संपल्यावर तो पुण्याला येणार आहे. सौ. वहिनीमात्र मुंबईला आपल्या माहेरी जाणार आहे.

मे महिन्याच्या सुट्टीत ती. [र्थरूप] बाबा आणि ती [र्थरूप] सौ[भाग्यवती] आई एकडे येणार आहेत का ? मे महिन्यात इथली हवा धुळ्याच्या हवेपेक्षा थंड असते. तू आणि मीनाही त्यांच्याबरोबर जरूर या. आपण खूप मजा करू.

आपल्या नव्या बंगल्याचं बांधकाम कुठपर्यत आलं ? दिवाळीत घरभरणी होईल तेव्हा मी धुळयाला नक्की येईन. आपण यंदाची दिवाळी नवीन घरात करू या असो. बाकी विशेष काही नाही. तुमची सर्वांची प्रकृती कशी आहे ? काही दिवसांपूर्वी मला थोडा खोकला झाला होता. पण वेळेवर औषध घेतल्यामुळे थांबला. आता माझी प्रकृती उत्तम आहे. काळजी करू नये.

, ती[र्थरूप] आजी, ती [र्थरूप] बाबा आणि ती [र्थरूप] सौ[भाग्यवती]

आई ह्यांना शि[र] सा[ष्टांग] न[मस्कार] मीनाला स[प्रेम] आ[शीर्वाद]. पत्राचं उत्तर लौकर पाठव. कळावे.

तुझी
विजू

सांस्कृतिक टिपा

१. आहेर

संस्कृत "आहार्य" या धातूपासून हा शब्द आला आहे. आहार्यचा अर्थ वस्त्र धारण करणे. लग्न-मुंजप्रसंगी वस्त्र, अलंकार भेट देणे म्हणजे आहेर करणे. देवदर्शन, प्रथम भेट, दुखवटा, शुभवार्ता याप्रसंगी वस्त्राचा आहेर करण्याची पध्दत आहे. मंगलकार्यात आप्तेष्ट यजमान दंपतीला, वधूवरांना किंवा सत्कार्यव्यक्तीला आहेर करतात. पुरोहित त्यावेळी "युवं वस्त्राणि" हा ऋग्वेदातला मंत्र म्हणतात. लग्नमुंजीत जवळचे नातेवाईक मुलाच्या किंवा मुलीच्या आईला साडीचोळी, वडलांना धोतर किंवा पँटशर्टचं कापड, टोपी किंवा फेटा असे कपडे देऊन मुलाला स्वतंत्र भेटवस्तू देतात. इतर लोक फक्त नवरा - मुलगा किंवा मुलीलाच भेटवस्तू देतात. आईवडलांना नाही.

२. घरभरणी

यावर स्वतंत्र पाठ आहे.

शब्दार्थ -

करंडी - झाकण असलेली टोपली, करंडा, करंडक

प्रकृती - शारीरिक स्थिती, आरोग्य

माहेरी - विवाहित स्त्रीच्या आईवडलांच्या घरी

प्र.१ ला: पुढे काही प्रश्नवाचक शब्द दिले आहेत. त्यांचा दिलेल्या वाक्यांमधे योग्य त्या रिकाम्या जागी उपयोग करा :

का, न, की, कुठे, कधी, कुठपर्यंत, किती, कशी, कसे

१. प्रियाची नवीन शाळा ________ आहे ?

२. संभाजी पुलाचं बांधकाम ________ आलं आहे ?

३. तू सिमल्याला ________ जाणार आहेस ?

४. चांगले हापूस आंबे ________ मिळतात ?

५. सरोजचे वडील वकील आहेत ________ ?

६. हे घर बांधायला ________ खर्च आला ?

७. सर आज आपल्या घरी येणार आहेत ________ नाहीत ?

८. अशा प्रकारची घरं दिल्लीला बांधतात ________ ?

९. नीलाचा नवरा लग्नानंतर ________ जाणार आहे ?

प्र.२ राः पुढे दिलेल्या शब्दसमूहांबद्दल एक शब्द द्या.

१. आपल्या ओळखीचे, मित्र, नातलग इत्यादी लोक ________

२. तीर्थक्षेत्रातील तीर्थाच्या पाण्याप्रमाणे पवित्र असणारे ________

३. जिचा नवरा जिवंत आहे अशी स्त्री ________

४. जिचा नवरा जिवंत नाही अशी स्त्री ________

५. नवीन घरात रहायला जाण्यापूर्वी करायचा समारंभ ________

६. लग्नात वधूला किंवा वराला भेट द्यायची वस्तू ________

प्र.३ राः पुढे दिलेल्या शब्दांचा तुमच्या स्वतःच्या वाक्यात उपयोग कराः

गडबडीत, करंडी, तयारी, माहेरी, बांधकाम, घरभरणी, खोकला, काळजी.

प्र.४ थाः पुढे दिलेल्या शब्दांना काही प्रत्यय लागून दुसरे शब्द तयार होतात, ते शब्द द्या आणि तयार केलेल्या शब्दांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा :

उदाहरण: तयार - तयारी

वाक्य : मीनाच्या लग्नाची सर्व तयारी झाली.

स्वस्त ________

आनंद ____________

माहेर ____________

थंड ____________

औषध ____________

ओळख ____________

प्र.५ वा: लाग -- ह्या सहायक क्रियापदाबरोबर येणारी निरनिराळी नामं देऊन त्यातून जे वाक्प्रचार तयार होतील त्यांचा वाक्यात उपयोग करा :

उदाहरण: लाग - दिवे लाग -
वाक्य : थिएटरमधले दिवे लागले.

प्र.६ वा: पुढील वाक्य आणि नमुना नीट लक्षात घ्या आणि त्याप्रमाणे 'म्हणून' ह्या शब्दाचा प्रयोग त्याच अर्थानी तुमच्या स्वतःच्या वाक्यात करा:

वाक्य - मी नीलाला काचेचा लेमन सेट आहेर म्हणून दिला.
नमूना - श्री. भागवत मित्र म्हणून फार चांगले आहेत.

प्र.७ वा: 'तर' चे दोन उपयोग लक्षात घेऊन नमुन्यात एक वाक्य करून दाखवले आहे . त्या धर्ती वर दिले ल्या नमु न्यावर आधारित वाक्य तयार करा :
मला वेळ मिळतो.

नमुना - मला वेळ मिळाला तर मी बाजारात जाईन.
मला तर बाजारात जायला मुळीच वेळ नाही.

१. सिंहासन सिनेमा लागतो.

२. पुण्याची हवा थंड असते.

३. मला खोकला होतो.

४. दिवाळीत घरभरणी होते.

५. मुलांची परीक्षा संपते.

धड्यावरचे प्रश्न :

प्र.१ लाः विजयाला अरविंदला पत्र लिहिणं का जमत नाही ?

प्र.२ राः अरविंद कुठे गेला होता ? त्याबद्दल विजयानी पत्रातून त्याला कोणते प्रश्न विचारले आहेत.

प्र.३ राः हया पत्रातून विजयानी अरविंदला स्वतःबद्दलच्या कोणकोणत्या बातम्या कळवल्या आहेत?

प्र.४ थाः पत्रात मीनाबद्दल काय चौकशी केली आहे ?

प्र.५ वाः विजया दिवाळीत कशासाठी धुळ्याला जाणार आहे ?

स्वाध्याय :

प्र.१ लाः हया पत्राला अरविंद उत्तर देतो आहे अशी कल्पना करा आणि ते पत्र लिहा.

प्र.२ राः तुम्ही तुमच्या बहिणीला / भावाला / बायकोला / नवऱ्याला / मुलीला / मुलाला पत्र लिहिता आहात अशी कल्पना करून एक पत्र लिहा.

प्र.३ राः अरविंद आणि विजया दिवाळीत प्रत्यक्ष भेटले आहेत अशी कल्पना करून पत्रातल्या मजकुराच्याच आधारे संवाद लिहा.

प्र.४ थाः पुढील विषयांवर पत्रलेखन करा :

१. रजेचा अर्ज

२. नोकरीसंबंधी याचना पत्र

३. वर्तमानपत्राच्या संपादकाला पत्र

४. राज्यपरिवहन मंडळाच्या अधिकाऱ्यांना पर्यावरणास बस लागणार आहे अशा संबंधाचं पत्र

५. जिवलग मित्राला मैत्रिणीला पत्र

६. आपल्या मुलाच्या / मुलीच्या बारशाचं / लग्नाचं आमंत्रण पत्र

७. सेंटरच्या वर्धापनदिनासंबंधी आमंत्रण - पत्र

६ "ये रे ये रे पावसा"

६ 'ये रे ये रे पावसा'

भाग - १

आमच्या भारतात तीन ऋतू आहेत. उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा. पण आम्हाला पावसाळा हा ऋतूच सर्वात महत्त्वाचा वाटतो. उन्हाळा लौकर किंवा उशिरा सुरू झाला, कडक किंवा सौम्य असला तरी आम्हाला त्याचं काही वाटत नाही. आणि हीच गोष्ट हिवाळ्याची. पण पाऊस जर वेळेवर आला नाही, पाहिजे तेवढा पडला नाही किंवा अतिशय पडला तर मात्र आम्ही बेचैन होतो.

कारण आमचा देश शेतीप्रधान देश आहे. अनेक शतकांपासून आमच्या देशात शेती हा मुख्य धंदा आहे. आमचं प्रत्येक नवीन येणारं वर्ष कसं जाईल ते आम्ही पावसावरुन ठरवतो. पाऊस चांगला पडला म्हणजे धान्य भरपूर पिकतं आणि लोकांना आनंद होतो.

पाऊस वेळेवर आला नाही तर शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसतो. आणि देवाची प्रार्थना करतो. कारण पाऊस आला नाही तर पेरणी होत नाही. पेरलेलं बी वाढायलासुद्धा पाऊस पाहिजे. शेवटपर्यंत पाऊस चांगला पडला तरच पीक चांगलं येतं.

महाराष्ट्रात पाऊस जूनच्या दुसऱ्या आठवडयात सुरू होतो. आधी तो पश्चिम किनाऱ्यावर म्हणजे कोकणात पडतो आणि हळूहळू पूर्वेकडे

सरकतो. कोकणात आणि सहयाद्रीच्या उंच भागात तो जास्त असतो. महाबळेश्वरला सरासरी दोनशे पन्नास इंच, कोकणात दीडशे इंच, मुंबईत सत्तर इंच आणि पुण्यात फक्त वीस ते पंचवीस इंच पाऊस दरवर्षी पडतो.

आमच्या जुन्या पध्दतीप्रमाणे सूर्य मृग नक्षत्रात गेला की पावसाळा सुरू होतो. आणि स्वाती नक्षत्रात गेला की पावसाळा संपतो. हा काळ साडेचार महिन्यांचा आहे. पण साधारणपणे पावसाळा चार महिने चालू असतो. मात्र सर्व नक्षत्रात सारखा पाऊस पडत नाही. कित्येकदा एखाद्या नक्षत्रात तो अजिबात पडत नाही. मग आम्ही म्हणतो, "हे नक्षत्र कोरडं गेलं."

सांस्कृतिक टिपा

१. नक्षत्रे -

आकाशाच्या पूर्वपश्चिम परिघावर एकामागून एक उगवणारे तारकापुंज म्हणजे नक्षत्रे. मुख्य नक्षत्रे २७ आहेत - अभिजित हे क्वचित दिसणारे नक्षत्र धरुन २८ होतात. काही नक्षत्रांना काही विशेष महत्त्व असते. उदा. स्वाती नक्षत्रावर मुलीचा विवाह केला तर ती पतीला आवडते, रेवती नक्षत्रावर नव्या घरात रहायला जावे इ. सूर्याला एक नक्षत्रविभाग क्रमण्यासाठी जो काळ लागतो, त्याला सौर नक्षत्र म्हणतात. पैकी मृग ते हस्त [मृग, आर्द्रा, पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, मघा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती इत्यादी] ही नक्षत्रे पावसाची समजली जातात. यावरुन एक मराठी कोडं आहे. "ज्ञानू श्रीपती, सत्ताविसातून नऊ गेले खाली उरले किती ?" उत्तर शून्य. कारण २७ नक्षत्रातली पावसाची नऊ नक्षत्रं कोरडी गेली तर काहीच पिकणार नाही.

शब्दार्थ

हवालदिल	-	अतिशय काळजीत, धीर सुटण्याची अवस्था
डोळे लावून बस	-	प्रतीक्षा, वाट पहाणे.
सरक	-	To move slowly
सरासरी	-	Average औसद - हिं

धड्यावरचे प्रश्न :

प्र.१ लाः

१. भारतात एकंदर किती ऋतू आहेत ? कोणकोणते ?

२. भारतातल्या लोकांना पावसाळा हा ऋतू सर्वात महत्त्वाचा का वाटतो ?

३. पाऊस वेळेवर आला नाही तर शेतकरी काय करतो ?

४. पाऊस वेळेवर आला नाही तर काय काय घटना घडतात?

५. महाराष्ट्रातल्या पावसाचं वर्णन करा.

प्र.२ राः पुढे दिलेल्या वाक्प्रचारांचा खुलासा द्या आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा.

१. बेचैन होणे

२. आभाळाकडे डोळे लावून बसणे

३. नक्षत्र कोरडं जाणे

प्र.३ राः पुढे दिलेल्या वाक्यातील 'सर्वात' हया रचनेऐवजी - 'पेक्षा' प्रत्ययाचा वापर करून ती वाक्ये लिहा :

१. पावसाळा हा ऋतू सर्वात महत्त्वाचा वाटतो ____________
२. पाऊस वेळेवर पडला तर शेतकरी सर्वात जास्त सुखी होतो.
३. कोकणात सर्वात जास्त पाऊस पडतो.
४. जुलै महिन्यात सर्वात जास्त पाऊस पडतो.
५. मला हिवाळा सर्वात जास्त आवडतो.

प्र.४ थाः 'पाहिजे तेवढा' ची योग्य रूपे घालून पुढील वाक्ये पुन्हा लिहा:

१. मोहन रोज दूध पितो____________
२. सरोजनी परीक्षेसाठी अभ्यास केला नाही____________
३. लालचंदला व्यापारात पैसे मिळाले ____________
४. आज आईनी भाजी केली ____________
५. यंदा आम्हाला वहया मिळाल्या ____________
६. बाजारात लिंबं आली आहत ____________

प्र.४ था: ब] आता 'पाहिजे तेवढा' वापरून लिहिलेलीच वाक्ये 'हवा तेवढा' ची योग्य रूपे वापरून लिहा.

प्र.५ वा: 'हीच गोष्ट हिवाळ्याची' हया वाक्याच्या धर्तीवरच तुम्ही स्वतःची काही वाक्ये तयार करा.

नमुना : मला सिनेमा आवडत नाही आणि हीच गोष्ट मोहनची.

प्र.६ वाः पुढे दिलेली वाक्ये पूर्ण करा -

१. तो माझ्या घरी आला किंवा ______

२. आज जेवणात भाजी असली किंवा ______

३. सदानंदनी गाडी भरभर चालवली किंवा ______

४. मीना सुंदर दिसली किंवा ______

५. चंदर पास झाला किंवा ______

६. त्याचा रुमाल सापडला किंवा ______

७. लाडू कडक असला किंवा ______

८. पीक भरघोस आलं किंवा ______

९. भात थोडा खाल्ला किंवा ______

१०. पुऱ्या पक्क्या तळल्या किंवा ______

प्र.७ वाः 'साधारणपणे' आणि 'कित्येकदा' हया क्रियाविशेषणांचा उपयोग करून प्रत्येकी ५ - ५ वाक्ये लिहा.

प्र.८ वाः धड्यातल्या शब्दांचा वापर करून पुढील वाक्यांतील मोकळ्या जागा भरा.

१. आमचा देश ______ देश आहे.

२. आमच्यादेशात __________ हा मुख्य धंदा आहे.

३. पाऊस आला नाही तर __________ होत नाही.

४. __________ बी वाढायला पाऊस पाहिजे.

५. पाऊस __________ चांगला पडला तरच __________ चांगलं येतं.

६. __________ आणि __________ उंच भागात पाऊस फार पडतो.

७. महाबळेश्वरला __________ दोनशे पन्नास __________ पाऊस पडतो.

८. सर्व नक्षत्रात पाऊस __________ पडत __________

९. एखाद्या __________ पाऊस __________ पडत __________

१०. आम्ही म्हणतो "हे __________ __________ गेलं."

स्वाध्याय :

प्र.१ लाः तुमच्या भागात पडणाऱ्या पावसाचं वर्णन करा.

प्र.२ राः महाराष्ट्रातल्या शेतकऱ्यांचा पोषाख, घरं, त्यांचं जीवन / हयाबद्दल माहिती गोळा करा आणि त्याची तुलना तुमच्या भागातल्या शेतकऱ्याशी करा.

प्र.३ राः 'पुण्यातला पावसाळा' हया विषयावर एक निबंध लिहा.

प्र.४ थाः तुम्ही पुण्याला आलात तेव्हा पावसाळ्याचे दिवस होते. त्या दिवसांत तुमचा प्रवास कसा झाला त्याचं वर्णन करा.

प्र.५ वाः भारतातल्या तीन ऋतूंपैकी तुम्हाला कोणता ऋतू सर्वात जास्त आवडतो ? आणि का ? सविस्तर लिहा.

प्र.६ वाः 'सर्व ऋतूत मीच श्रेष्ठ' असे प्रत्येक ऋतू म्हणतो आहे अशी कल्पना करुन एक छोटीशी नाटिका लिहा.

७ 'ये रे ये रे पावसा' भाग - २

पाऊस एकसारखा पडत राहिला तर नद्यांना पूर येतात आणि शेतीचं फार नुकसान होतं. कित्येकदा तर पेरणी अगदी फुकट जाते, आणि दुष्काळ पडतो. हा ओला दुष्काळ.

पण पाऊस अजिबात पडला नाही किंवा फारच कमी पडला तरीही दुष्काळ पडतो. हा कोरडा दुष्काळ. या दुष्काळात गुरांना चारा-पाणी मिळत नाही. लोकांना धान्य मिळत नाही, नदीनाले आणि विहिरी आटतात. मग अनेक लोक गाव सोडून परमुलखात जातात. आणि मजुरी करून पोट भरतात.

दुष्काळाचं भयंकर चित्र अनेक लेखकांनी रेखाटलं आहे. व्यंकटेश माडगूळकर हयांच्या 'बनगरवाडी' हया कादंबरीत कोरडया दुष्काळाचं फार चांगलं वर्णन आलेलं आहे.

मात्र हल्ली कालवे, धरणं आणि तलाव जिकडेतिकडे होत आहेत. विहिरींना पंप बसवणं चालू आहे. त्यामुळे दुष्काळ पूर्वीइतका भयंकर राहिलेला नाही. शिवाय आता सरकारनी सहकारी बँका काढल्या आहेत.

त्या माफक दरानी शेतकऱ्याला कर्ज देतात. त्याचप्रमाणे शेतकी खातं त्याला बी-बियाणं, खतं, अवजारं आणि इतर उपयोगी साधनं पुरवतं. त्यामुळे आता शेतकरी पुष्कळच सुखी झाला आहे.

पावसाळा हा सणांचा ऋतू आहे. पंढारपूरची यात्रा, गौरी-गणपती, नारळी पौर्णिमा, नागपंचमी इत्यादी सण हयाच ऋतूत येतात. नाग-पंचमीला लोक नागाची पूजा करतात तर नारळी पौर्णिमेला कोळी लोक नारळ देऊन समुद्राची पूजा करतात. हया ऋतूत मृतांची श्राद्धं होतात. नवीन लग्न झालेल्या मुली माहेरी येतात. असा हा पावसाळा गडबडीचा असतो.

आमच्या छोट्या मुलांना तर पावसाळा फारच आवडतो. त्यांना पावसात भिजायला फार आवडतं. पावसाच्या पाण्यात कागदाच्या होड्या सोडायला आवडतं. थंड वारा वहायला लागला, आकाशात ढग जमले, ढगांचा गडगडाट सुरू झाला म्हणजे मुलं रस्त्यावर किंवा अंगणात जमतात आणि एकसुरात गाणं म्हणतात :

"ये रे ये रे पावसा"
तुला देतो पैसा
पैसा झाला खोटा
पाऊस आला मो ऽ ऽ ऽ ठा ।"

सांस्कृतिक टिपा :

१. पंढरपूरची यात्रा,

गौरी गणपती, नारळीपौर्णिमा, नागपंचमी याविषयी माहिती 'सणांचा ऋतू पावसाळा' या दोन पाठांमधे आली आहे.

२. मृतांची श्राध्दे

ज्या दिवशी माणसाचा मृत्यू झाला असेल त्या दिवशी दरवर्षी त्या व्यक्तीचा मुलगा श्राद्ध करतो. म्हणजे मृताच्या आत्म्याला वंदन करतो. या दिवशी काही धार्मिक विधी, ब्राह्मणभोजन, दानधर्म पण करतात.

भाद्रपद पौर्णिमेनंतरचा पंधरवडा हा पक्षपंधरवडा मानतात. मृताच्या तिथीला या पंधरवड्यात काही विधी, ब्राह्मणभोजन इ. करतात. मृत स्त्री सुवासिनी असेल तर नवमीला अविधवा नवमी करतात. त्यादिवशी सुवासिनीला भोजन देतात. अमावास्येला सर्वपितरी अमावास्या म्हणतात. या दिवशी सर्व पूर्वजांना वंदन करतात. पक्षपंधरवड्यात नवी खरेदी, शुभ काम करत नाहीत.

शब्दार्थ -

एकसारखा	-	सतत, अखंड
दुष्काळ	-	Femine
कोरडा दुष्काळ	-	Drought
आटतात	-	पाणी कमी होतं - कापड आटतं म्हणजे कमी होतं
माफक	-	कमी
खतं	-	खाद - उर्वरक Fertilezer
खातं	-	विभाग Department
रेखाटणे	-	रेखांकित करणे, चित्र काढणे, लेखकाच्या बाबतीत शब्दांनी चित्र काढणे

धड्यावरचे प्रश्न :

प्र.१ लाः पुढील प्रश्नांची धड्याच्या आधारानी उत्तरे द्या.

१. पाऊस एकसारखा पडत राहिला तर काय काय होतं ?

२. ओला दुष्काळ म्हणजे काय ?

३. पाऊस पडला नाही तर काय होतं ?

४. कोरडा दुष्काळ म्हणजे काय ?

५. 'दुष्काळ पूर्वीइतका भयंकर राहिलेला नाही' कारणं द्या.

६. हल्लीचा शेतकरी पूर्वीच्या शेतकऱ्यापेक्षा सुखी का झाला आहे?

७. पावसाळ्यात कोणकोणते सण येतात ?

८. मुलांना पावसाळा का आवडतो ?

९. पावसात मुलं काय करतात ?

१०. पावसाळ्यापूर्वी मुलं कोणतं गाणं म्हणतात ?

प्र.२ राः पुढील विषयावर निबंध लिहा.
'पावसाळा सणांचा ऋतू'

प्र.३ राः धड्याच्या आधाराने पुढील वाक्यातल्या रिकाम्या जागी योग्य ते शब्द भरा.

१. पाऊस एकसारखा पडला तर ओला ________ पडतो.

२. ________ दुष्काळात लोकांना ________ मिळत नाही.

३. पाऊस पडला नाही तर ____________ आणि विहिरी ____________ .

४. हल्ली जिकडे तिकडे ____________ , ____________ आणि ____________ बांधताहेत.

५. ____________ बँका शेतकऱ्यांना ____________ दरानी ____________ देतात.

६. शेतकऱ्यांना ____________ , ____________ , ____________ इत्यादी साधनं पुरवली जातात.

७. पावसाळा हा ____________ ऋतू आहे.

८. पावसाळ्यात मृतांची ____________ होतात.

९. थंड ____________ वहायला ____________ की मुलांना आनंद होतो.

१०. पाऊस सुरू झाला की मुलं ____________ किंवा ____________ जमतात.

प्र.४ थाः विरुद्धार्थी शब्द द्या आणि त्यांचा हयाच धड्याचा आधार घेऊन तुमच्या वाक्यात उपयोग करा.

ओला ____________ कोरडा

पाऊस पडला नाही तर कोरडा दुष्काळ पडतो.

१. एकसारखा ____________ ७. सुखी ____________

२. नुकसान ____________
३. आटतात ____________
४. भयंकर ____________
५. माफक ____________
६. उपयोगी ____________
८. गडबडीत ____________
९. थंड ____________
१०. एकसुरात ____________
११. खोटा ____________

प्र.५ वा: पुढील वाक्प्रचारांचा खुलासा देऊन त्यांचा तुमच्या वाक्यांत उपयोग करा.

१. पोट भरणे ____________
२. आटणे ____________
३. रेखाटणे ____________
४. काढणे ____________
५. पुरवणे ____________
६. फुकट जाणे ____________

प्र.६ वा: कडून चा उपयोग करून पुढील वाक्ये लिहा :

१. अनेक लेखकांनी दुष्काळाचं भयंकर चित्र रेखाटलं आहे.
२. सहकारी बँका माफक दरानी शेतकऱ्याला कर्ज देतात.
३. शेतकीखातं शेतकऱ्याला बियाणं पुरवतं.
४. कोळी लोक समुद्राची पूजा करतात.
५. छोटी मुलं पावसाच्या पाण्यात कागदाच्या होड्या सोडतात.

प्र.७ वा: 'जिकडे तिकडे' चा उपयोग करून ५ वाक्यं तयार करा आणि नंतर तीच वाक्ये 'सर्वत्र' चा प्रयोग करून लिहा.

स्वाध्याय :

१. धड्याच्या आधाराने तुमच्या प्रांतात पडणाऱ्या पावसाबद्दल माहिती लिहा.

२. माझ्या प्रांतातल्या / गावातल्या शेतकऱ्याचं जीवन' ह्या विषयावर निबंध लिहा.

३. तुमच्याकडे दुष्काळ पडला तर काय काय उपाययोजना केल्या जातात ते थोडक्यात लिहा.

४. तुमच्याकडे लहान मुलांसाठी पावसावरची गाणी आहेत का ? असल्यास एखादं गाणं वर्गात म्हणून दाखवा आणि त्याचं मराठीत भाषांतर करा.

५. 'बनगरवाडी' ह्या कादंबरीचं सर्व भारतीय भाषांमध्ये भाषांतर झालेलं आहे. तुम्ही आपल्या मातृभाषेत भाषांतरित झालेलं पुस्तक प्रथम वाचा आणि नंतर मूळ कादंबरी वाचा.

८ सणांचा ऋतू - पावसाळा

भाग - १

पावसाळा हा सणांचा ऋतू आहे. महाराष्ट्रात आषाढ महिन्यापासून पाऊस पडायला सुरुवात होते. आषाढ, श्रावण, भाद्रपद आणि आश्विन हे पावसाळ्याचे चार महिने. हया चार महिन्यांनाच चातुर्मास म्हणतात. चातुर्मासात लोक निरनिराळी व्रतं करतात. शिवाय हया चार महिन्यात सणांचीही अगदी रेलचेल असते. म्हणूनच पावसाळ्याला 'सणांचा ऋतू' असं म्हटलेलं आहे.

पावसाळ्यात येणाऱ्या सणांची आता आपण ओळख करून घेऊ या. आषाढ महिन्यापासूनच सुरुवात करू. आषाढ शुद्ध त्रयोदशीला येतो बैलांचा सण बेंदूर. कोकणातले शेतकरी बेंदूर साजरा करतात. तर देशावरचे शेतकरी बैलांचा सण पोळा श्रावणातल्या पिठोरी अमावस्येला साजरा करतात. हा सण खास शेतकऱ्यांच्या घरी साजरा होणारा. हया सणामागची सुंदर कल्पना, तो कसा साजरा करतात इत्यादी गोष्टींची माहिती देणारा एक स्वतंत्र धडा तुम्ही शिकणार आहात. त्या धड्याचं नाव आहे 'बैलांचा वर्षातला एकच रविवार पोळा.'

आषाढी पौर्णिमा म्हणजेच गुरुपौर्णिमा किंवा व्यासपौर्णिमा. हया दिवशी शिष्यांनी आपल्या गुरूचं स्मरण करायचं, गुरूचा सत्कार करायचा. "गुरुर्ब्रह्मा, गुरुर्विष्णुः" असं आपल्या संस्कृतीत म्हटलेलंच आहे. तुम्ही - आम्ही सर्व शिक्षकच आहोत. तेव्हा हया दिवसाचं माहात्म्य तुम्हाला वेगळं सांगायला नकोच.

आषाढी एकादशी म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनातला एक फार महत्त्वाचा दिवस आहे. महाराष्ट्राचं दैवत म्हणजे पंढरपूरचा विठोबा. आषाढी एकादशीला पंढरपूरला विठोबाची मोठी यात्रा भरते. महाराष्ट्राला संतांची भूमी असं म्हटलं जातं. ज्ञानेश्वर - नामदेव - तुकाराम - रामदास आणि आणखी कितीतरी संतांची मोठी परंपरा इथे नांदली. 'ज्ञानदेवे रचिला पाया' आणि 'तुका झालासे कळस,' या अभंगाच्या दोन ओळीतून तुम्हाला महाराष्ट्रातल्या संतजीवनाचा परिचय घडतो.

आषाढी एकादशीला मराठी माणसं संबंध दिवस उपास करतात. 'पांडुरंग पांडुरंग' 'विठ्ठल रखुमाई' अशा विठोबाच्या नामसंकीर्तनात, टाळमृदंगाचा गजर करत, दिंड्या - पताका फडकवत, विठोबाचे हजारो भक्त, हया दिवशी पंढरपुरात चंद्रभागेच्या तीरावर जमतात. आळंदीहून ज्ञानेश्वर, देहूहून तुकाराम, पैठणहून एकनाथ अशा थोर संतांच्या पालख्यांबरोबर 'ज्ञानबा तुकारामा'च्या गजरात, हजारो भक्त पायी प्रवास करत निघतात आणि वाटेत ठिकठिकाणी मुक्काम करत एकादशीला पंढरपुरात पोचतात. विठोबाला भेटायला जाणाऱ्या हया यात्रेकरूंना वारकरी म्हणतात आणि त्यांच्या पायी प्रवासाला 'पंढरीची वारी' म्हणतात. विठोबाच्या भक्त वारकऱ्यांमध्ये बहुसंख्य शेतकरी जसे असतात तसेच काही समाजशास्त्रज्ञ, लेखक, भक्तीचा हा रस स्वतः अनुभवायला जातात. सर्व भक्तगण एकादशीला

पंढारपूरला पोचले म्हणजे चंद्रभागा नदीत स्नान करतात आणि विठोबाचं दर्शन घेतात. रात्री भजन-कीर्तन करतात आणि दुसऱ्या दिवशी उपास सोडतात.

शहरातले लोकही उपास करतात. पण अगदी कडक उपास नाही बरं का ! बहुतेक घरी 'एकादशी आणि दुप्पट खाशी' असाच प्रकार असतो. बटाटे, रताळी, साबूदाणा, वऱ्याचे तांदूळ, शिंगाडे असे उपासाला चालणारे निरनिराळे जिन्नस - हया जिनसांपासून तिखट गोड सर्व प्रकारचे छान रुचकर पदार्थ तयार करायचे आणि त्यांच्यावर भरपूर ताव मारायचा. शिवाय जोडीला फळं पण असतातच. असाही उपास करतात बरेच जण !

एकूण आषाढ महिना महाराष्ट्रात मोठा वैशिष्ट्यपूर्ण ठरतो तो वारकऱ्यांच्या वारीमुळे, बैलांच्या पूजेमुळे आणि गुरुजनांच्या आदरसत्कारामुळे. पावसाचा कितीही जोर असो, वारकऱ्यांची वारी आज वर्षानुवर्ष भक्तीचा झेंडा फडकवत महाराष्ट्राच्या दैवताला - विठोबाला - संतांच्या रसाळ अभंगांच्या माध्यमातून आळवण्याचं काम करते आहे. आणि यातूनच समतेचं, बंधुभावाचं दर्शनही घडवत आहे. हेच हया वारीचं महत्त्वाचं कार्य !

सांस्कृतिक टिपा

१. चातुर्मास

आषाढ शुद्ध ११ ते कार्तिक शुद्ध ११ हे चार महिने म्हणजे चातुर्मास. आपले एक वर्ष म्हणजे देवांची एक दिवसरात्र. त्यातला वरील चार महिन्यांचा काळ हा देव झोपतात तो काळ. म्हणून पहिल्या एकादशीला देवशयनी

आणि दुसरीला प्रबोधिनी असे नाव आहे. देवांच्या निद्राकाळात असुर प्रबल होतात. त्यांच्या त्रासापासून वाचण्यासाठी लोक निरनिराळी व्रते करतात. काय खावे, काय वर्ज्य याचे नियम आहेत. कांदालसूण, वांगी चातुर्मासात खात नाहीत. धरणे-पारणे म्हणजे एक दिवस उपास, दुसऱ्या दिवशी जेवण असं व्रत करतात. एकधान्य खाऊन, एकवेळ जेवूनपण रहातात. संन्यासी चातुर्मासात एका जागी रहातात. या काळात दानधर्म करण्याला जास्त महत्व आहे.

२. ज्ञानदेवे रचिला पाया

तुकारामांची शिष्या संत बहिणाबाई हिने सर्व संतांची कामगिरी एका अभंगात वर्णन करून सांगितली आहे.

संतकृपा झाली । इमारत फळा आली
ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश.

भागवतधर्माचा विस्तार महाराष्ट्रात कसा झाला याचे नेमके चित्र या मंदिराच्या रूपकातून व्यक्त केले आहे.

३. पंढरीची वारी

पंढरीची वारी । जयाचिये कुळी
तेणे मुक्ती चारी । साधियेल्या

असे संतवचन आहे. पंढरपूरपर्यंत पायी प्रवास म्हणजे वारी. ही आषाढी आणि कार्तिकी एकादशीला करतात. हा प्रवास करणाऱ्या भक्तांना

वारकरी म्हणतात. सर्व महाराष्ट्रातून शेतकरी, कामकरी, स्त्रीपुरुष, म्हातारे, तरुण, संन्यासी-संसारी असे लाखो भाविक दरवर्षी नेमाने हा प्रवास करतात. खांद्यावर पताका, कपाळावर चंदन आणि बुक्का, गळ्यात तुळशीची माळ आणि तोंडात हरिनाम हे वारकऱ्याचं वैशिष्ट्य. वारकऱ्यांच्या दिंड्या म्हणजे गट भजनकीर्तन करत जात असतात. वाटेत ते मुक्काम करतात. वारकऱ्यांना वाटेत आणि मुक्कामाच्या ठिकाणी जेवण, औषधपाणी - देऊन लोक त्यांची सेवा करतात. पंढरपूरची वारी करणाऱ्या माणसाबद्दल मराठी लोकांना आदर वाटतो.

शब्दार्थ

व्रत	-	धार्मिक नियम, बंधन
रेलचेल	-	विपुलता, पुष्कळ असणे
माहात्म्य	-	महिमा, महत्त्व
यात्रा	-	धार्मिक कारणाने केलेला प्रवास
नांदणे	-	आनंदानी रहाणे - सुखात रहा हा मूळ अर्थ. मुलीने नवऱ्याच्या घरी रहाण्याला हे क्रियापद वापरतात. दुसऱ्या संदर्भात राहिली. रूजली, वाढली हा अर्थ आहे.
दिंडी	-	वारकऱ्यांचा गट
ताव मारणे	-	भरपूर खाणे - अमर्याद खाणे
(ध्वज) फडकवणे	-	हिंदी लहराना (उंच हलवणे)

आळवणे - अतिशय आर्त भावानी विनंती करणे.
ईश्वराने आपला उद्धार करावा म्हणून त्याची विनवणी संतकवी आपल्या अभंगांतून करतात.

धड्यावरचे प्रश्न :

प्र.१ ला: पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरं लिहा.

१. महाराष्ट्रात पावसाळ्याचे चार महिने कोणते ?

२. चातुर्मास म्हणजे काय ? चातुर्मासात लोक काय करतात ?

३. पावसाळ्याला 'सणांचा ऋतू' का म्हटलेलं आहे ?

४. पंढरपूरच्या वारीतून आपल्याला कोणतं दर्शन घडतं ?

५. पंढरपूरच्या विठोबाला 'महाराष्ट्राचं दैवत' असं का म्हटलं आहे?

प्र.२ रा: पुढे दिलेल्या विषयांवर टिपा लिहा.

१. 'पंढरीची वारी'

२. 'एकादशी, दुप्पट खाशी'

३. अभंग

४. कीर्तन

५. 'ज्ञानदेवे रचिला पाया'

६. 'तुका झालासे कळस'

प्र.३ राः पुढे दिलेल्या सणांचं धड्याच्या आधारानी, थोडक्यात वर्णन करा.

१. गुरुपौर्णिमा

२. आषाढी एकादशी

प्र.४ थाः 'पंढरपूरची यात्रा' याबद्दल थोडक्यात माहिती सांगा.

भाषाभ्यास

प्र.१ लाः पुढे दिलेल्या वाक्यातले गाळलेले शब्द भरा.

१. ह्या चार महिन्यात सणांचीही अगदी __________ असते.

२. आषाढात येणारा बैलांचा सण __________ . त्यालाच __________ असंही म्हणतात.

३. गुरुपौर्णिमेचं __________ तुम्हाला वेगळं सांगायला __________ .

४. महाराष्ट्राला __________ भूमी असं म्हणतात.

५. महाराष्ट्राचं __________ म्हणजे पंढरपूरचा विठोबा.

६. लोक 'पांडुरंग पांडुरंग' असं विठोबाचं __________ करतात आणि __________ गजर करतात.

७. विठोबाचे हजारो भक्त पंढरपुरात __________ तीरावर जमतात.

८. विठोबाला भेटायला जाणाऱ्या भक्तांना ______ म्हणतात.

९. भक्तांच्या पायी प्रवासाला ______ ______ म्हणतात.

१०. एकादशीला काही लोक ______ उपास करतात.

११. उपासाच्या जिनसांपासून तिखट-गोड, छान ______ पदार्थ तयार करतात.

१२. आम्ही उपासाच्या पदार्थावर भरपूर ______ मारला.

१३. वारकऱ्यांची वारी आज ______ पंढरपूरला जाते आहे.

१४. संतांच्या ______ अभंगातून ______, बंधुभावाचं ______ घडतं.

प्र.२ राः अ) पुढे दिलेल्या शब्दांतले मूळ शब्द ओळखून काढा आणि दिलेले शब्द आणि मूळ शब्द हया दोन्हींचा वाक्यात उपयोग करून दाखवा.

अ) १. सांस्कृतिक २. प्राकृतिक ३. धार्मिक
४. सामाजिक ५. नैतिक

ब) १. रसाळ २. मधाळ ३. दुधाळ
४. फेसाळ ५. केसाळ

क) १. हजारो २. लाखो ३. शेकडो

ड) १. रुचकर २. खेळकर

इ) १. माहात्म्य २. दैवत ३. जगोबा
४. अंतोबा ५. निळोबा

प्र.३ राः भूतकाळाची रूपं + 'जा-' क्रियापदाची रूपं हयांनी तयार झालेली वाक्यं नीट समजून घेऊन त्याप्रमाणे तुमची स्वतःची वाक्यं तयारा करा :
महाराष्ट्राला संतांची भूमी असं म्हटलं जातं.

नमुना : १. पंढरपूरच्या वारीतून समतेचं दर्शन घडवलं जातं.
२. आमचा वर्ग हुषार मुलांचा वर्ग म्हणून ओळखला जातो.

प्र.४ थाः पुढील शब्दसमुदायांबद्दल एक शब्द द्या :

१. पावसाळ्याचे चार महिने ____________
२. देवाचं नाव एकसारखं घेणं ____________
३. पायी प्रवास करणारा भक्त ____________
४. पंढरपूरला पायी प्रवास करणं ____________
५. रुचकर पदार्थ भरपूर खाणं ____________
६. बैलांची पूजा करणारा सण ____________
७. अनेक भक्तांचा समुदाय ____________

प्र.५ वाः ________ हून, ____________ तून, ____________ मधून हया प्रत्ययांचं कार्य पुन्हा एकदा समजून घ्या आणि त्यांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.

नमुना:१. संत ज्ञानेश्वरांची पालखी आळंदीहून निघते.

१. मी दुकानातून पेढे आणले.

२. बस लोकांच्या रांगेमधून पुढे गेली.

प्र.६ वा: पुढील क्रियापदं किंवा वाक्प्रयोगांचा तुमच्या वाक्यात वापर करा.

१. ओळख करून घे________

२. स्मरण कर________

३. नांद________

४. गजर कर________

५. आळव________

६. अनुभव________

७. ताव मार________

८. वैशिष्ट्यपूर्ण________

९. झेंडा फडकव________

१०. दर्शन घडव________

प्र.७ वा: मार - ह्या क्रियापदाबरोबर निरनिराळी नामं येतात आणि त्यातून निरनिराळे वाक्प्रचार तयार होतात. ह्या धड्यातही ताव मार ---- असा वाक्प्रचार आलेला आहे. तुम्हाला

आठवत असलेले असे वाक्प्रचार लिहा आणि त्यांचा वाक्यात उपयोग करून दाखवा.

स्वाध्याय :

१. तुमच्या प्रांतातल्या दोन थोर संतांची नावं सांगून त्यांच्या कार्याचं थोडक्यात वर्णन करा.

२. तुमच्याकडे 'गुरुपौर्णिमा' कशी साजरी करतात त्याचं वर्णन करा.

३. तुमच्याकडे 'एकादशी आणि दुप्पट खाशी' असा एखादा वाक्प्रयोग आहे का ? तुमच्याकडे उपासाला कोणते पदार्थ खातात ? थोडक्यात सांगा.

४. तुमच्याकडे भरणाऱ्या एखाद्या यात्रेचं वर्णन करा.

५. तुम्ही एखादं व्रत करता का ? कशासाठी करता ? त्या व्रताचं पालन कसं करता ? तुम्ही व्रत करत नसल्यास तुमच्या घरातील वडील - माणूस जे व्रत करत असेल, त्याची माहिती द्या.

६. महाराष्ट्रातलं 'संतजीवन' समजून घेण्यासाठी तुमच्या ग्रंथालयात असलेली हया विषयावरची पुस्तकं वाचा.

६ सणांचा ऋतू - पावसाळा

भाग - २

आषाढानंतर पावसाळ्यात येणारा दुसरा महिना म्हणजे श्रावण. 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चहूकडे' असं श्रावणाचं वर्णन एका निसर्गवेड्या कवीनी केलेलंच आहे. श्रावण हा मोठा प्रसन्न महिना आहे. सृष्टीचा लाडका महिना आहे. शिवाय हया महिन्यात सणांनासुद्धा अगदी बहर आलेला असतो.

श्रावण महिन्यातला पहिला सण नागपंचमी. 'पंचमी' च्या हया सणाला खेड्यापाड्यातून तर फारच महत्त्व असतं. हया दिवशी नवीन लग्न झालेल्या मुली माहेरी येतात. घरोघरी सवाष्ण बायका न्हाणं वगैरे करून गावाच्या जवळपास असलेल्या वारुळाजवळ नागाची पूजा करण्यासाठी जातात. वारुळाची पूजा करतात. नागाची पूजा करताना त्याला दूध आणि लाहयांचा नैवेद्य दाखवला जातो. नागाला दक्षिणा अर्पण केली जाते. "नागोबाऽ ऽ ऽ ला दूध" असं ओरडत गारुडी त्यादिवशी नागाची टोपली घेऊन घरोघरी हिंडतात. त्या टोपलीत जिवंत नाग असतात. घरोघरी लोक गारुड्याजवळच्या नागाचीही पूजा करतात.

नागपंचमीच्या सणाला महाराष्ट्रात बत्तीस शिराळं ह्या गावी नाग पकडणारे असंख्य लोक जमतात. नागपंचमीला इथे जमणारे नाग चावत नाहीत अशी समजूत आहे. तिथे जमलेले असंख्य देशी-परदेशी लोक स्वतःच्या गळ्याभोवती नाग गुंडाळून आपला फोटो काढून घेतात. नागपंचमीला मोदक किंवा 'दिंडं' नावाचा गोड पदार्थ करतात. त्यादिवशी काहीही चिरायचं नाही, कापायचं नाही, तळायचं, नांगरायचं नाही, तवा चुलीवर ठेवायचा नाही अशी समजूत असते.

श्रावणातल्या दर मंगळवारी नवीन लग्न झालेल्या मुली मंगळागौरीचं व्रत करतात, गौरीची म्हणजे पार्वतीची पूजा करतात मंगळागौरीची पूजा फुलांनी सजवतात आणि एकमेकींच्या घरी जागरण करायला जातात. त्यावेळी झिम्मा, फुगड्या असे अनेक पूर्वापार चालत आलेले बायकांचे खेळ खेळतात, गाणी म्हणतात. पाच वर्षं हे व्रत केल्यानंतर त्याचं उद्यापन करतात. आपल्या नवऱ्याला खूप आयुष्य मिळावं म्हणून बायका हे व्रत करतात.

श्रावणातला ह्यानंतरचा सण म्हणजे राखी पौर्णिमा किंवा नारळी पौर्णिमा.

श्रावणात येणाऱ्या ह्या पौर्णिमेला वरुणदेवतेची म्हणजे समुद्राची पूजा करून कोळी लोक समुद्राला नारळ अर्पण करतात. ह्या पौर्णिमेच्या आधी पावसाळा चालूच असतो, त्यामुळे समुद्रात आगबोटींची ये - जा, कोळ्यांचा मच्छीमारीचा धंदा, समुद्रमार्गे होणारा व्यापार ह्या सर्व गोष्टी बंद असतात. कारण समुद्र ह्या काळात खवळलेला असतो. पण नारळी पौर्णिमेपासून समुद्र शांत व्हायला लागतो, म्हणून त्याची विधिपूर्वक पूजा केली जाते आणि समुद्रामार्फत होणारे सर्व व्यवहार सुरू केले जातात.

नारळी पौर्णिमेलाच राखी पौर्णिमा असंही नाव आहे. ह्या दिवशी बहीण आपल्या भावाच्या हाताला राखी बांधते. भाऊ परगावी किंवा परदेशी असला तरी ती त्याला पोस्टानी राखी पाठवते आणि त्याच्यावर असलेल्या आपल्या रक्षणाच्या जबाबदारीची त्याला आठवण करून देते. इतिहासकाळात ह्या सणातल्या आशयाला फार महत्त्व होतं. पण आज काळ बदलला आहे. त्यामुळे त्यातला मूळ अर्थ पुष्कळसा हरवला आहे. तरीपण आज सुद्धा हा सण महाराष्ट्रापेक्षा उत्तर भारतात फार महत्त्वाचा मानला जातो. तिकडे ह्या सणाचं नावच मुळी 'रक्षाबंधन' असं आहे. बहिणीनी भावाला राखीच्या बंधनात अडकवून ठेवायचं, एकमेकांनी आपल्या नात्याची, जबाबदारीची आठवण ठेवायची अशी ह्या सणामागची सुंदर कल्पना आजच्या युगातही लक्षात ठेवण्यासारखी आहे.

नंतर येते वद्य अष्टमी - श्रीकृष्णाचा जन्मदिवस ! श्रीकृष्णाचा जन्म भर रात्री बारा वाजता झाला. ह्या जन्मवेळेपर्यंत असंख्य लोक कडक उपास करतात. आणि रात्री जन्मोत्सव साजरा करून नंतर दुसऱ्या दिवशी गोड पक्वान्न खाऊन उपास सोडतात. कृष्णजन्म हा महाराष्ट्रातल्या कोकण भागातल्या लोकांचा फार लाडका सण असतो. ह्या दिवशी ठिकठिकाणी उंच उंच दही हंड्या उभारतात. दहीहंडी फोडण्याची स्पर्धा लावतात. जो दहीहंडी फोडून दाखवेल त्याला मोठं बक्षीसपण देतात.

सांस्कृतिक टिपा

१. बत्तीस शिराळं

हे गाव सांगली जिल्ह्यात आहे. त्याचं मूळ नाव 'श्रीयाळ' असं होतं. इथल्या नागपंचमीच्या संदर्भात गोरखनाथाची एक कथा आहे. एकदा गोरखनाथ भिक्षा मागत असता एका बाईला भिक्षा आणायला उशीर झाला.

कारण विचारल्यावर तिनी सांगितलं की, मातीच्या नागांची पूजा करून यायला तिला वेळ झाला. म्हणून गोरखनाथांनी लगेच तिच्यासाठी जिवंत नाग पकडून आणला. तसेच त्या दिवशी, त्या गावात कोणालाही नाग चावणार नाही असा आशीर्वाद दिला. या चमत्कारामुळे बत्तीस गावचे लोक त्यांचे शिष्य झाले म्हणून या गावाला बत्तीस शिराळे हे नाव पडले. इथे त्या दिवशी पकडलेल्या नागांचे घरोघरी खेळ दाखवतात. संध्याकाळी बैलगाड्यांवरून नागांची मिरवणूक निघते. सर्व नाग मिरवणुकीने एका मैदानात जमतात. एक मडकं समोर फिरवत नागांना खेळवतात. दुसऱ्या दिवशी नाग पोत्यात घालून सोडून येतात.

२. मंगळागौर

एका अल्पायुषी तरुणाला केवळ त्याच्या बायकोनी हे व्रत केल्यामुळे दीर्घायुष्य मिळाले अशी कथा आहे. ब्राह्मणांमधे हे व्रत करण्याची पद्धत आहे. नवीन लग्न झालेल्या मुली श्रावण महिन्यात दर मंगळवारी हे व्रत करतात. एक सासरी आणि एक माहेरी अशी मंगळागौर मोठ्या प्रमाणात करतात. अशा पूजेला आपल्यासारख्या नवविवाहित मुलींना बोलवतात. त्या सर्व न्हाऊन, उंची कपडे, दागिने घालून येतात. सर्वजणी देवदर्शनाला जातात. तेव्हा काही माणसे हौसेने सनईचौघडा लावतात. घरात मोठ्या चौरंगावर शिवलिंग बनवून सर्व मुली पुरोहितांच्या सांगण्याप्रमाणे पूजा, आरती करतात. यापूजेला सोळा प्रकारच्या पत्री, फुलं आणतात. पूजा-नैवेद्य होईपर्यंत मुली उपास करतात. जेवतानापण त्या मुळीच बोलत नाहीत. संध्याकाळी हळदीकुंकू असते. रात्री हलका फराळ करून रात्रभर खेळ, गाणी म्हणत मंगळागौर जागवतात. सर्व वयाच्या बायका यात भाग घेतात. सकाळी उत्तरपूजा करुन दहीभात खाऊन सर्व घरी जातात. पाच वर्षांनी या व्रताचं उद्यापन मोठ्या प्रमाणात करतात. त्यावेळी मुलगी आईला एक तपेलं आणि सोन्याचा नाग

देते. बायका नवऱ्यासाठी हे व्रत करतात पण त्यात हौस आणि स्नेहसंमेलनाचा भाग जास्त असतो.

३. दहीहंडी

कृष्ण हे गोप संस्कृतीचं दैवत आहे. गुराख्यांच्या, गवळयांच्या गावात कृष्ण वाढला. उंच शिंक्यावर बांधलेल्या हंड्यांमधून लोणी, दही पळवणे हा कृष्णाचा आवडता खेळ होता. गुरं राखायला नेल्यावर सर्वांचं जेवण एकत्र करुन बनवलेला 'दहीकाला' त्याची मित्रभावना दाखवतो. म्हणून कृष्णाच्या जन्मदिनी उंचावर मडक्यात दहीकाला किंवा पाणी भरतात. तरुण मुलांचे गट 'गोविन्दा आला' म्हणत दहीहंडी फोडायला येतात. ही मुलं एकमेकांवर चढून हया दहीहंड्या फोडतात. मोठ्या शहरात ही दहीहंडी फोडण्याची स्पर्धा लावतात. फोडणाऱ्या गटांना रोख बक्षिसंपण देतात.

शब्दार्थ

निसर्गवेडा	-	झाडंवेली, पशुपक्षी या निसर्गातल्या गोष्टींबद्दल अतिशय प्रेम असणारा. (लोकांना वेड वाटेल इतकी आवड)
वारुळ	-	वाल्मीक - मुंग्यांनी बनवलेलं सापाचं निवासस्थान. यावरुनच 'आयत्या बिळावर नागोबा' ही म्हण आली आहे.
गुंडाळून	-	लपेटून

दिंडं	-	कणकेच्या पुरीत पुरण भरून वाफेवर उकडलेला पदार्थ
मच्छीमारी	-	मासे पकडणे
खवळलेला	-	रागावलेला, क्षुब्ध, stormy
विधिपूर्वक	-	धर्मग्रंथांत सांगितलेल्या नियमांप्रमाणे

धड्यावरचे प्रश्न :

प्रश्न अ): पुढील प्रश्नांची धड्याच्या आधारानी उत्तरं लिहा.

१. श्रावण हा सृष्टीचा लाडका महिना आहे असं का म्हटलं आहे?

२. नागपंचमीच्या सणाला 'बत्तीस शिराळं' हया गावी काय असतं?

३. श्रावणातल्या दर मंगळवारी नवीन लग्न झालेल्या मुली कोणतं व्रत करतात ? हे व्रत त्या का करतात ?

४. बायकांचे खेळ कोणते ?

५. नागपंचमीला कोणते पदार्थ करतात ?

६. ''नागोबाला दूध'' असं कोण ओरडतं ? त्या व्यक्तीचं वर्णन करा.

७. श्रावण पौर्णिमेला राखी पौर्णिमा आणि नारळी पौर्णिमा अशी दोन नावं का आहेत ?

८. कोळी लोक श्रावण पौर्णिमेला समुद्राची पूजा का करतात ?

९. रक्षाबंधन हा सण बहीणभावाच्या प्रेमाचे प्रतीक कसा आहे?

१०. इतिहासकाळात रक्षाबंधन या सणाला विशेष महत्त्व कोणत्या प्रांतात होतं ? का ?

११. महाराष्ट्रात रक्षाबंधन हा सण इतिहासकाळात नव्हता याची कारणे काय ?

१२. रक्षाबंधन सणाला आज कोणते महत्त्व आहे ?

१३. कृष्णजन्माष्टमी महाराष्ट्रात कशी साजरी करतात ?

१४. दहीहंडीचे वैशिष्ट्य काय आहे ?

टिपा लिहा

१. नागपंचमी

२. मंगळागौरी

३. उद्यापन

४. प्रदेशाचा भूगोल आणि तिथले सण यांचा संबंध

५. कोळीगीते

६. दहीहंडी - गोपाळकाला

७. भाऊबीज

प्र.१ ला: पुढे दिलेल्या वाक्यातले गाळलेले शब्द भरा :

१. एका ____________ कवीनी श्रावणाचं वर्णन केलं आहे.

२. बायका __________ नागाची पूजा करायला जातात.

३. शहरातल्या बायका पाटावर __________ __________ नागाचं चित्र काढतात.

४. नागाला दूध आणि __________ __________ दाखवतात.

५. परदेशी लोक गळ्याभोवती नाग __________ स्वतःचा फोटो काढून घेतात.

६. गारुड्याच्या टोपलीत __________ नाग असतात.

७. नागपंचमीला __________ किंवा __________ नावाचा पदार्थ करतात.

८. बायका __________ चालत आलेले खेळ खेळतात.

९. पाच वर्षानी मंगळागौरीचं __________ करतात.

१०. आपल्या नवऱ्याला खूप __________ मिळावं म्हणून मंगळागौरीचं व्रत करतात.

११. श्रावणात येणाऱ्या या पौर्णिमेला __________ म्हणजे __________ पूजा करतात.

१२. हयामुळे समुद्रात आगबोटींची __________ __________, कोळ्यांचा __________ धंदा, __________ होणारा व्यापार बंद असतो.

१३. कारण समुद्र हया काळात __________ असतो.

१४. त्याची __________ पूजा केली जाते.

१५. इतिहासकाळात या सणातल्या ———— फार महत्त्व होतं.

१६. कृष्णाचा जन्म———— ————बारा वाजता झाला.

१७. रात्री ———— साजरा करून दुसऱ्या दिवशी गोड ———— खाऊन उपास सोडतात.

१८. ———— फोडण्याची स्पर्धा लावतात.

भाषाभ्यास :

पुढे दिलेल्या शब्दसमूहांबद्दल एक शब्द द्या, आणि त्या शब्दाचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.

१. निसर्गाचं वेड असलेला :-

२. नाटकाचं वेड असलेला :-

३. पुस्तकांचं वेड असलेला :-

४. क्रिकेटचं वेड असलेला :-

५. यंत्रांचं वेड असलेला :-

प्र.२ राः 'घर' पासून 'घरोघर' असा शब्द तयार झाला आहे. 'घरोघर ---- घरोघरी' हा फरक नीट समजावून घ्या आणि पुढे दिलेल्या शब्दांवरुन असे शब्द तयार करून त्यांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा -

१. दार २. गाव ३. देश ४. हात

प्र.३ राः वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
अर्पण करणे, आठवण करून देणे, आठवण ठेवणे,
स्पर्धा लावणे, चालू असणे, मानला जाणे.

प्र.४ थाः आगबोटींची ये - जा हे धातूंचे नाम बनले आहे. याप्रमाणे
ऊठ - बस, धर - पकड
मार - हाण, चढ - उतार, धू - पूस,

या जोड्याही नामाप्रमाणे वापरता येतात. देव - घेव ही जोडीही 'व' लावून बनते. तुम्ही त्यांचा वाक्यात उपयोग करा.

प्र.५ वाः समुद्रमार्गे - या शब्दातील मार्गे हे अव्यय द्वारा व्या अर्थाचे आहे. मुंबईमार्गे, हवाईमार्गे, असे त्याचे दोन्ही उपयोग आहेत. त्यांचा वाक्यात उपयोग करा.

प्र.६ वा: विधिपूर्वक याप्रमाणे खात्रीपूर्वक. आग्रहपूर्वक, प्रेमपूर्वक, स्नेहपूर्वक, अगत्यपूर्वक या शब्दांचा वाक्यात उपयोग करा.

प्र.७ वा: या सणाचं नावच मुळी रक्षाबंधन असं आहे. यामधे मुळी हे जोर देण्यासाठी वापरले आहे.

उदा: मी मुळी नव्हतेच तिथे. तो मुळी ऐकतच नाही. त्याला पगारच मुळी चारशे रुपये आहे. तुम्ही 'मुळी' योग्य जागी वापरून वाक्ये बनवा.

प्र.८ वाः ठेवण्यासारखा प्रमाणे ठेवण्याजोगा, ठेवण्यालायक ही त्याच अर्थाची क्रियाविशेषणे आहेत. अशी तुम्ही बघ, पहा, सांग, दाखव, खा, पी, रहा या क्रियापदांपासून क्रियाविशेषणे / विशेषणे बनवून त्यांचा वाक्यात उपयोग करा.

स्वाध्याय :

प्र.१ लाः 'श्रावणमासी हर्ष मानसी ———————— चहूकडे' ही कविता मुळातून वाचा आणि तुमच्या प्राध्यापकांच्या मदतीनी समजावून घ्या.

प्र.२ राः तुमच्या प्रांतात नागाच्या पूजेचा सण असतो का ? त्या सणाचं वर्णन करा.

प्र.३ राः आमच्याकडे 'नागपंचमीचा' सण कसा सुरू झाला हे सांगणाऱ्या २-३ प्रकारच्या लोककथा आहेत. त्या तुमच्या प्राध्यापकांकडून समजावून घ्या. आणि तशीच एखादी लोककथा तुमच्या भाषेत असल्यास ती मराठीत लिहा.

प्र.४ थाः तुमच्याकडे नवीन लग्न झालेल्या मुली 'नवऱ्याला खूप आयुष्य मिळावं' म्हणून काही व्रतं करत असतीलच. त्या व्रतांची नावं सांगून त्यांचं थोडक्यात वर्णन करा.

प्र.५ वाः 'पंचमीचा सण आला - डोळे माझे ओले' अशा आशयाची मराठीत एक कविता आहे. ती तुमच्या प्राध्यापकांकडून समजावून घ्या आणि तुमच्याकडे तशाच आशयाची एखादी कविता असल्यास तिचं वर्णन करा.

प्र.६ वा: महाराष्ट्रात रक्षाबंधन या सणाला जरी अलीकडे महत्त्व आले असले तरी 'भाऊबीज' या सणाला पूर्वीपासून महत्त्व आहे. त्या सणाची माहिती मिळवा.

२. कोळ्यांचे जीवन समुद्राशी बांधलेले आहे. कोळीगीत या लोकगीतांच्या प्रकारात त्यांचेजीवन प्रतिबिंबित होते. अलीकडे काही कवींनीपण कोळीगीतं लिहिली आहेत. ती मिळवून ऐका.

३. तुमच्या प्रांताला लागून समुद्र आहे का ? तुमच्या कोळ्यांच्या अशा एखाद्या सणाची माहिती द्या.

४. तुमच्याकडे जन्माष्टमी कशी साजरी करतात ते लिहा.

५. जन्माष्टमी दिवशी गावातल्या देवळात कीर्तन असते. देवळात जन्माष्टमी कशी साजरी करतात याची माहिती मिळवून त्यावर टिपण लिहा.

६. नारळीपौर्णिमा या सणाचा संबंध मुख्यतः कोळी जमातीशी आहे. तुमच्याकडे असा एखाद्या विशिष्ट जमातीचा सण असल्यास त्याची माहिती द्या.

१० बैलांचा वर्षातला एकच रविवार - पोळा

पोळा हा पावसाळ्यात येणारा मोठा सण. या सणात वर्षभर शेतात राबणाऱ्या बैलांना विशेष महत्त्व असतं. त्या दिवशी सकाळी शेतकरी आणि त्याचं सर्व कुटुंब लौकर उठतं. मग बैलांना नदीवर किंवा ओढ्यावर नेऊन स्वच्छ आंघोळ घालतात. नंतर बाजारात जाऊन गुलाबी, तांबडे, हिरवे रंग विकत आणतात. त्या रंगांनी बैलांची शिंगं रंगवतात. शिंगांना बेगडाच्या पट्टया चिकटवतात. शिंगांना सुरेख गोंडे लावतात. शिंगांच्या टोकांना 'शेंब्या' घालतात.

घरातली लहानमोठी माणसं आपल्या हाताचे पंजे रंगात बुडवतात आणि बैलांच्या सर्व अंगावर पंजांचे ठसे उठवतात. बैलांच्या बरोबर घरातल्या कुत्रा, गाय, मांजर हयासारख्या इतर पाळीव जनावरांच्या वाटणीलाही थोडा थोडा रंग येतो. आपल्या बैलांना दृष्ट लागू नये म्हणून शेतकरी त्यांच्या गळ्यात काळा दोरा घालतात. त्या दोऱ्याला 'कंडा' म्हणतात. कंड्यात रंगीबेरंगी मणी ओवतात.

बैल रंगल्यानंतर घरचा मालक त्यांची पूजा करतो. त्यांच्या खुरांवर हळदकुंकू वहातो. घरची मालकीण त्यांना ओवाळते. त्या दिवशी घरोघर गोड जेवण असतं. बैलांना पुरणपोळीचा घास देतात. बैलांबरोबर घरातल्या सर्वांचीच तोंडं गोड होतात.

ज्यांच्या घरी बैल नसतात ते लोकही हा सण साजरा करतात. बैलांबद्दल त्यांना वाटणारी कृतज्ञताच त्यात असते. त्या दिवशी गावचा कुंभार त्यांना मातीचे बैल आणून देतो. त्या बैलांना सजवून पाटावर मांडतात आणि त्यांची पूजा करतात. खेड्यातली काही लहान मुलंसुद्धा मातीचे सुंदर बैल तयार करतात. त्यांना रंग देतात, आणि त्यांच्याशी खेळतात. शहरामधेही मातीचे रंगीत बैल विकत मिळतात.

संध्याकाळी पाच वाजता खेड्यातल्या सर्व बैलांची मिरवणूक निघते. त्यासाठी बैलांना पुन्हा विशेष प्रकारानी सजवतात. त्यांच्या पाठीवर सुंदर रेशमी काम केलेल्या झुली घालतात. पायात रुप्याचे तोडे घालतात. डोक्याला बाशिंग बांधतात. ही बाशिंगं भिंगांची असतात. म्हणजे त्यांना छोटे छोटे गोल आरसे लावलेले असतात. सजवलेल्या बैलांची ही मिरवणूक फार पहाण्यासारखी असते. मिरवणुकीत वाजंत्री असतात. ढोल, पिपाणी, सनई, ताशा, शिंग इत्यादी वाद्यं त्यात असतात. वाद्यांच्या कडकडाटात मधूनच उखळीचे बार वाजतात. सर्व शेतकरी रंगीबेरंगी फेटे बांधून येतात. लहान मुलं आनंदानी नाचत असतात. मिरवणुकीच्या पुढे गावातली तरुण आणि चलाख मुलं लेझीम खेळत असतात.

जसजसा अंधार पडत जातो तसतशा गॅसच्या बत्त्या पेटतात. आणि दारूकाम सुरू होतं. गावच्या प्रमुख रस्त्यातून वाजत गाजत मिरवणूक शेवटी ग्रामदेवतेच्या देवळापर्यंत येते आणि देवदर्शन घेऊन सर्व मंडळी आपापल्या बैलांना घेऊन घरी परत येतात. पोळ्याचा सण संपतो !

दुसऱ्या दिवशी सकाळी बैल पुन्हा आपल्या कामाला लागतात. पुढच्या वर्षी येणाऱ्या सुट्टीची वाट पहात ! तोपर्यंत त्यांच्या अंगावर काही दिवस

उरणारे रंगच त्यांना सणाची आठवण देतात. त्यानंतर पुन्हा 'ये रे माझ्या मागल्या !'

सांस्कृतिक टिपा

१. दृष्ट लागणे -

नव्या वास्तूला, नववधूला, लहान मुलांना, उत्तम पिकाला वाईट नजरेच्या माणसापासून धोका असतो अशी अंधश्रद्धा आहे. दृष्ट लागली की, काहीतरी नुकसान होतं किंवा आजारपण येतं. अशी दृष्ट लागू नये म्हणून जुनी चप्पल, काळी बाहुली, मिरच्या आणि लिंबू बांधण्याची पद्धत आहे. यासाठीच लहान मुलांना काळी तीट लावतात. दृष्ट लागली असे वाटते तेव्हा मीठ 'मोहरी' मिरच्या त्या माणसावरून ओवाळून आगीत टाकतात.

२. ये रे माझ्या मागल्या -

'येरे माझ्या मागल्या, ताककण्या चांगल्या' अशी ही म्हण आहे. मागल्या म्हणजे मागायला आलेला, मागणारा. पूर्वी खेड्यात ज्यांच्या घरी दूधदुभतं भरपूर आहे अशी माणसं गरिबांना ताक फुकट वाटत असत. मका किंवा ज्वारी भरडून त्या कण्या मीठ टाकून भातासारख्या शिजवणे हे गरिबांचे जेवण. हया पातळ कण्या आणि मागून आणलेलं ताक हेच रोजचं जेवण. सणाच्या दिवशी ताकाबरोबर काही पक्वान्नंसुद्धा मिळायची. पण ती एकच दिवस. पुन्हा दुसऱ्या दिवशी त्याच ताककण्या चांगल्या म्हणून खायच्या. रोजचं नीरस काम आणि एखाद्या दिवशी चैन अशा प्रसंगासाठी ही म्हण वापरतात.

शब्दार्थ -

राबणारे - अतिशय कष्ट करणारे, खूप मेहनत करणारे.

बेगड - चकाकणारा रंगीत कागद. दिखाऊ मोठेपणाला बेगडी श्रीमंती म्हणतात.

शेंब्या - बैलांच्या शिंगांना पितळी टोपण घालतात - (बॉलपेनच्या टोपणा-सारख्या शेंब्याही शिंगांच्या टोकाला बसवतात.)

खूर - जनावराच्या पायांचा नखासारखा टणक भाग (हरीण, गाय, बैल इ.)

झूल - जनावराच्या पाठीवर घालायचे शोभिवंत कापड.

बाशिंग - खेड्यातल्या लग्नात नवरानवरीच्या कपाळावर रंगीत कागदाचे बाशिंग बांधतात. त्यावरुन 'बाशिंगबळ' हा शब्द आला आहे. बैलाच्या कपाळावर पोळ्यादिवशी आरसे लावलेली म्हणजे भिंगाची कापडी बाशिंगं बांधतात.

उखळीचे बार - गावठी बंदुकीत दारू ठासून भरून काढलेले बार (मोठा आवाज) धमाका (हिंदी)

चलाख - हुशार, चपळ

दारूकाम - फटाकयांची आतषबाजी. शोभेची दारू उडवणे.

पंजा - मनगटापासून पुढचा हात - जनावराचा पाय (paw)

लेझीम - लाकडाची दांडी आणि लोखंडी चकत्या यांनी बनवलेले एक खेळण्याचे साधन. महाराष्ट्रात

कोणत्याही मिरवणुकीत, शाळेच्या समारंभात
मुलं, मुली हा सांघिक खेळ खेळतात.

पिपाणी - तोंडानी वाजवायचे वाद्य.

ताशा - चर्मवाद्य - काठ्यांनी वाजवतात.

शिंग - शिंगाच्या आकाराचे पितळेचे वाद्य.
तोंडाने फुंकून वाजवतात.

रुप्याचा तोडा - चांदीसारखा पण स्वस्त धातू रुपं. तोडा हा
तिरप्या कळ्या गुंफून बनवलेला दागिना.
लहानमुलांच्या पायात चांदीचे तोडे घालतात.
बायका हातात सोन्याचे तोडे घालतात.
शिंदेशाही तोडे हे बायकांच्या पायातले जड तोडे.

प्र.१ लाः पुढे दिलेल्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरं द्या :

१. पोळ्याच्या दिवशी शेतकरी आणि त्याचं कुटुंब लौकर का उठतं ?

२. शेतकरी बैलांना कसं सजवतात ? त्यांना दृष्ट लागू नये म्हणून काय करतात ?

३. 'बैलांबरोबर घरातल्या इतर जनावरांना वाटणीला थोडा थोडा रंग येतो' ह्या वाक्यातून काय सूचित होतं ?

४. बैल सजवल्यानंतर मालक काय करतात ?

५. ज्यांच्या घरी बैल नाहीत असे लोकही पोळा सण का साजरा करतात ?

६. ते लोक हा सण कसा साजरा करतात ?

७. संध्याकाळच्या मिरवणुकीसाठी बैलांना कशा प्रकारे सजवतात?

८. पोळ्याचा सण केव्हा संपतो ?

प्र.२ राः बैलपोळ्याच्या मिरवणुकीचं तुमच्या शब्दात वर्णन करा.

प्र.३ राः 'ये रे माझ्या मागल्या' ह्या वाक्प्रचाराचा अर्थ स्पष्ट करून बैलांच्या संदर्भात त्याचा का उपयोग केला आहे ते स्पष्ट करा.

प्र.४ थाः पुढील शब्दांचा अर्थ सांगून त्यांचा वाक्यात उपयोग करा :

१.	बेगड	२.	शेंब्या	३.	कंडा
४.	पंजा	५.	खूर	६.	झूल
७.	तोडा	८.	बाशिंग	९.	भिंग
१०.	पिपाणी	११.	शिंग	१२.	उखळीचा बार
१३.	लेझीम	१४.	ताशा	१५.	दारूकाम

प्र.५ वाः गाळलेले शब्द भरा :

१. या सणात वर्षभर शेतात __________ बैलांना विशेष महत्त्व असतं.

२. बैलांच्या शिंगांना __________ पट्ट्या __________

३. शिंगांना __________ गोंडे लावतात.

४. शिंगांच्या टोकांना ______________ घालतात.

५. सर्व माणसं हाताचे पंजे रंगात ______________

६. बैलांच्या सर्व अंगावर पंजांचे ______________ उठवतात.

७. घरातल्या ______________ जनावरांच्या वाटणीला थोडा थोडा रंग येतो.

८. आपल्या बैलांना ______________ लागू ______________ म्हणून त्यांच्या गळ्यात काळा दोरा घालतात.

९. बैलांच्या गळ्यातल्या काळ्या दोऱ्याला ______________ म्हणतात.

१०. कंड्यात रंगीबेरंगी मणी ______________.

११. मालक बैलांच्या खुरांवर ______________ वहातो.

१२. बैलांच्या पाठीवर सुंदर ______________ घालतात आणि पायात ______________ तोडे घालतात.

१३. काही लोक बैलांना सजवून पाटावर ______________.

१४. सजवलेल्या बैलांची मिरवणूक फार ______________ असते. मिरवणुकीत ______________ असतात.

१५. ______________ गजबजाटात मधूनच ______________ बार वाजवतात.

१६. सर्व शेतकरी मिरवणुकीत रंगीबेरंगी ______________ बांधून येतात.

१७. मिरवणुकीपुढे तरुण आणि ____________ मुलं ____________ खेळत असतात.

१८. जसजसा अंधार पडत जातो ____________ गॅसच्या बत्त्या पेटतात.

१९. गावच्या प्रमुख रस्त्यातून ____________ ____________ मिरवणूक देवळापर्यंत येते.

२०. बैलांच्या अंगावर काही दिवस ____________ रंगच त्यांना सणाची आठवण देतात.

प्र.६ वाः पुढील वाक्प्रचारांचा अर्थ देऊन त्यांचा तुमच्या स्वतःच्या वाक्यांमधे उपयोग करा :

१. दृष्ट लागणे
२. तोंड गोड होणे
३. बाशिंग बांधणे
४. कामाला लागणे
५. आठवण देणे
६. घास देणे

भाषाभ्यास :

प्र.१ लाः 'घरची मालकीण', 'गावचा कुंभार' हया शब्दप्रयोगांमधला 'घरचा', 'गावचा' हे शब्द लक्षात घ्या आणि त्यांच्यात आणि 'घराचा', 'गावाचा' हयात असलेला फरक समजवून घ्या. त्याचप्रमाणे हया जोड्यांचा अर्थ देऊन त्यांचा वाक्यात उपयोग करा.

प्र.२ राः 'जसजसा ———— तसतसा' आणि पड ———— / पडत जा ———— चा प्रयोग नीट लक्षात घ्या आणि त्याचा तुमच्या स्वतःच्या वाक्यात उपयोग करा.

प्र.३ राः 'दुसऱ्या दिवशी सकाळी बैल पुन्हा आपल्या कामाला लाग-तात! पुढच्या वर्षी येणाऱ्या सुट्टीची वाट पहात !' ही वाक्यरचना लक्षात घ्या आणि अशाप्रकारच्या ५ वाक्यरचना करून दाखवा.

नमुना - शेतकरी शेत नांगरायला लागतात.

चांगलं पीक येण्याची आशा करत !

स्वाध्याय :

प्र.१ लाः तुमच्याकडे बैलांसाठी 'पोळ्या' सारखा सण साजरा करतात का ? त्या सणाचं नाव काय ? त्या सणाचं वर्णन करणारा निबंध लिहा.

प्र.२ राः बैल पोळ्याचा सण जवळ आला आहे अशी कल्पना करून, शेतकरी, त्याची बायको आणि त्याची मुलं हयांच्यात होणारा संवाद लिहा.

प्र.३ राः तुम्ही पाहिलेल्या एखाद्या मिरवणुकीचं वर्णन करा.

प्र.४ थाः तुम्ही तुमच्या मित्राला पत्र लिहून त्यात महाराष्ट्रातल्या तुम्हाला सर्वात जास्त आवडलेल्या सणाचं वर्णन लिहून कळवा.

११ खेडं - जुनं आणि नवं

माडगूळ गाव दक्षिण महाराष्ट्रात आहे. सुमारे ५०-५५ वर्षांपूर्वी या गावाची वस्ती सतराशे होती. पैकी आठ घरं ब्राह्मणाची होती. काही घरं रामोशांची होती. एक सुताराचं होतं. एक लोहाराचं होतं. दोन न्हाव्यांची होती आणि इतर कुंभारांची होती. गावात मोमिनांची दोन घरं होती. मोमीन मुसलमान होते. ते हातमागावर कापड विणून विकायचे. एक घर वाण्याचं होतं. आपल्या शेतातलं धान्य किंवा वैरण देऊन, हया दुकानातून गूळ, रॉकेल तेल, काड्याची पेटी, असल्या वस्तू घेता यायच्या. पैसेच पाहिजेत असं नव्हतं.

गावचा कारभार पाटील आणि कुळकर्णी पहायचे. ब्राह्मणांच्या आठ घरांपैकी प्रत्येकाकडे पाच वर्षांनी कुळकर्णी वतनाची पाळी यायची. पाटलाचं एकच घर होतं.

गावाला ओढा होता. गावाच्या चारही बाजूंनी काळ्या जमिनी होत्या. काही शेतकऱ्यांच्या जमिनीत विहिरी होत्या. बाकीची रानं पावसावर अवलंबून होती. विहिरी असलेल्या जमिनीत कापूस, मिरची, गहू ही पिकं यायची. कोरडवाहू शेतात जोंधळा, बाजरी व्हायची. मटकी, तूर, उडीद, तीळ ही कडधान्याची पिकंही कोरडवाहू जमिनीत व्हायची.

साधारणपणे तीन चार वर्षांनी एकदा दुष्काळ पडायचा. शेतमजुरांचे फार हाल व्हायचे. असे लोक, गावात काम न मिळाल्यामुळे जिथे सुकाळ आहे अशा मुलखात जायचे आणि जगले वाचले तर परत यायचे.

गावात शाळा होती. चावडीच्याच इमारतीच्या काही भागात शाळा भरायची. मास्तर एकच होते. इयत्ता चार होत्या. सर्व इयत्तांना सर्व विषय एकच मास्तर शिकवायचे. महाराची, मांगांची, मुलं थोडी वेगळी बसून शाळा शिकायची.

गावात चांगले रस्ते नव्हते. गटारं नव्हती. रस्त्यावर दिवे नव्हते. अंधार पडला की लोक शेतातून परत यायचे आणि झोपायचे. जास्त वेळ जागले तर दिव्यासाठी तेल उगीच जाळावं लागायचं. गावात शिंपी नव्हता. धान्य दळण्याची गिरणी नव्हती. शेजारी पाच मैलावर असलेल्या तालुक्याच्या गावी बाजार भरायचा. माझ्या गावचे लोक हया बाजाराला घोड्यावरुन, बैलगाडीतून किंवा पायी चालत जायचे आणि कापड, धान्य, तेल असले जिन्नस आणायचे. काही शेतकरी हया बाजारात आपण पिकवलेला शेतमाल विकायचे. बहुतेक घरातल्या बायका आपलं धान्य घरच्या जात्यावर दळायच्या. काही लोक घरचं धान्य बाजाराच्या दिवशी तालुक्याला न्यायचे आणि ते गिरणीत दळून आणायचे. गिरणीवाला पैसेच घेई. वाण्याप्रमाणे त्याला धान्य चालायचं नाही.

मोहरम, दिवाळी, बेंदूर, नागपंचमी, होळी हे सण गावात फार दणक्यात व्हायचे. मोहरमच्या ताबूतापुढे सर्व गाव जमायचं. सोंगं निघायची. बेंदूरात सजवलेल्या बैलांची जंगी मिरवणूक निघायची.

दिवाळीला सगळ्यांच्या अंगांवर नवे कपडे दिसायचे आणि सर्वांच्या घरात गोडधोड व्हायचं. नागपंचमीच्या सासुरवाशिणी मुली माहेरी यायच्या.

फेर धरून गाणी गायच्या आणि झाडांच्या फांद्यांना बांधलेल्या झोपाळ्यावर उंच झोके घ्यायच्या. होळीच्या सणाला चावडीपुढे मोठी होळी पेटायची. दसऱ्याला लोक आपटयाच्या पानांचं सोनं वाटायचे.

गावात मध्यभागी मारुतीचं देऊळ होतं. हनुमानजन्म आणि रामजन्म तिथे साजरे व्हायचे.

सुगी संपली की उन्हाळ्यात लोकांना मोकळीक असायची. अशा वेळी सापगारुडी, कोल्हाटी लोक येऊन आपले खेळ दाखवायचे. साप-गारुडी सापाचा खेळ करायचे. कोल्हाटी उड्या मारायचा आणि दोरीवरुन चालायचा. काही वेळा हरदासबुवा यायचा आणि देवळात त्याचं कीर्तन व्हायचं. ह्या कीर्तनासाठी फार गर्दी व्हायची. हया सगळ्या लोकांना गावातले शेतकरी थोडं धान्य द्यायचे. ते घेऊन हे फिरते लोक, दुसऱ्या खेड्याला जायचे.

गावात भांडणं होती. पण काठ्या-लाठ्या किंवा कु-हाडी-कोयते घेऊन कधी मारामारी व्हायची नाही. एखाद्या घरी लग्न निघालं किंवा मयत झालं तर सर्व गाव त्याला मदत करायचं.

बहुसंख्य लोक सज्जन, गरीब होते. आमचं गाव हे आजूबाजूला गरीब पण चांगलं गाव म्हणून ओळखलं जायचं.

सांस्कृतिक टिपा

१. रामोशी -

रामोशी स्वतःला रामवंशी म्हणवतात. पिकांची राखण करणे, पिकाची किंवा गुरांची चोरी शोधून देणे इ. कामे या जातीचे लोक करत होते. पोट

भरेल एवढे काम नाही म्हणून हे लोक चोऱ्या-दरोडे या गुन्हेगारी मार्गाने पोट भरत. मजबूत शरीराच्या, धाडसी रामोश्यांना ब्रिटिशांनी गुन्हेगार जमात ठरवले होते.

२. कुळकर्णी वतन

कुळकर्णी हे प्राचीन ग्रामसंस्थेतले अधिकारी होते. त्यांना गावच्या जमिनीचा १/२५ वा भाग वंशपरंपरेने दिलेला असे. इतरही बरेच हक्क त्यांना मिळत. गावच्या वसुलाचा हिशेब ठेवणे हे त्यांचे मुख्य काम. त्यांच्या हिशेबात गावच्या हद्दीतील एकूण जमिनीच्या क्षेत्रफळाची नोंद असते. हे साधारणपणे सुशिक्षित ब्राह्मण लोक असायचे.

३. चावडी

गावचा कारभार पहायची सार्वजनिक जागा. इथे बसून पाटील किंवा आता सरपंच कामकाज पहातात. न्यायनिवाडा चावडीवर करण्याची पध्दत आहे. गावची प्रशासकीय इमारत.

४. महार

अस्पृश्य मानलेली जात. पण गावचे बलुतेदार. शेतांच्या, गावाच्या सीमेबद्दल अधिकारी व्यक्ती. हे सरकारी तिजोरीचे रक्षक असतात. घुंगरू बांधलेली काठी घेऊन ते गावात फिरतात. सरकारी अधिकारी गावात आले की त्यांच्याबरोबर रहातात. चावडीवर पहारा करणे, गावची स्वच्छता ठेवणे, लाकडे फोडणे, मृताच्या दहनासाठी जळण नेणे इ. त्याची कामे असतात. टपालाची, निरोपाची ने - आण करणे हे पण महाराचे काम असते. महार मेलेली गुरं ढोरं ओढून नेतात.

५. मांग

ते स्वतःला मातंग म्हणवतात. ते गावचे पहारेकरी असतात. वाटाड्याचे कामही करतात. त्यांना जमीन इनाम दिलेली असते. पण त्याबरोबर आंबाडीच्या वाखाचे दोर वळणे ; शिंकं, गोफण बनवणे हे कामपण ते करतात. गुन्हेगारी जमातीत उल्लेख. फाशी देण्याचं काम मांगांचं असतं.

६. मोहरम

मुसलमानी वर्षाच्या पहिल्या महिन्यात येणारा उत्सव. याच महिन्यात महंमद पैगंबरांचे नातू हसन आणि हुसेन यांना त्यांच्या शत्रूंनी म्हणजे सुन्नी पंथाच्या खलीफांनी क्रूर पद्धतीने मारले. या प्रसंगाची आठवण म्हणून हा सण साजरा करतात. या उत्सवात ताजियाला किंवा ताबूताला फार महत्त्व असते. इराकमधे करबला या ठिकाणी हुसेनची कबर आहे. त्या कबरीची प्रतिकृती म्हणजे ताजिया. मक्केकडे तोंडे करून ताजियांची स्थापना करतात. 'मुजलिस' म्हणजे शोकप्रदर्शन हा एक कार्यक्रम असतो. शेवटच्या दिवशी मिरवणुकीने ताजियांचे विसर्जन होते. त्यावेळी भक्त छाती पिटून आपले दुःख व्यक्त करतात.

शब्दार्थ

वैरण	-	चारा, कणीस कापून उरलेला भाग
कोरडवाहू	-	कमी पावसाची, पाणी न टिकणारी जमीन
मुलूख	-	प्रदेश
जिन्नस	-	वस्तू, पदार्थ

दणक्यानी - खूप थाटात

सासुरवाशीण - सासरी रहाणारी (सून) तीच माहेरी माहेरवाशीण

सुगी - पिकाच्या कापणीचे, समृद्धीचे दिवस

सापगारुडी - सापाचा खेळ दाखवणारे

कोल्हाटी - उड्या मारणे, दोरावर चढणे/चालणे हया कसरती करणारा

हरदासबुवा - कीर्तनकार (कीर्तन-पहा दामोदर हरी चापेकर)

धड्यावरचे प्रश्न

प्र.१ लाः पुढील प्रश्नांची धड्याच्या आधारे, थोडक्यात उत्तरं लिहा :

१. सुमारे ५०-५५ वर्षांपूर्वी माडगूळ गावात कोण कोण लोक रहात होते ?

२. त्यावेळी माडगूळची शेती आणि पिकं कशी होती ?

३. दुष्काळ पडला की शेतमजुरांची स्थिती कशी व्हायची ?

४. गावातली शाळा कशी होती ?

५. गावात वाण्याकडचा व्यवहार कसा चालायचा ?

६. माडगूळ गावात पूर्वी कोणत्या गैरसोयी होत्या ?

७. गावात सण कसे साजरे व्हायचे ?

८. गावामधे करमणुकीची साधनं कोणती होती ?

९. माडगूळ गावातले लोक कसे होते ?

१०. माडगूळ गावात देवाण-घेवाण कशी होत असे ?

प्र.२ राः टिपा द्या : (सुमारे ५ ओळी)

१. वैरण

२. काळी जमीन

३. कोरडवाहू जमीन

४. चावडी

५. दुष्काळ

६. हातमाग

७. ओढा

८. महाराष्ट्रातला होळीचा सण

९. सुगी

१०. कीर्तन

११. जात्यावरच्या ओव्या

१२. महाराष्ट्रातला दसरा

प्र.३ राः ह्या वाक्यांतला सामाजिक संदर्भ स्पष्ट करा.

१ 'महारांची, मांगांची मुलं थोडी वेगळी बसून शाळा शिकायची'

२. (लोक) जास्त वेळ जागले तर दिव्यासाठी तेल उगीच जाळावं लागायचं

३. मोहरम, दिवाळी ______________ होळी हे सण गावात फार दणक्यानी व्हायचे.

४. गावात भांडणं होती, पण ______________ कुऱ्हाडी, कोयते घेऊन कधी मारामारी व्हायची नाही.

भाषाभ्यास :

प्र.४ थाः पुढे दिलेल्या शब्दांचा धड्याच्या आधारे वाक्यात उपयोग करा :

१. वस्ती	२. कारभार
३. पाळी	४. रान
५. सुकाळ	६. मुलूख
७. इयत्ता	८. काड्याची पेटी
९. गूळ	१०. शेतमजूर
११. पैकी	१२. शेतमाल
१३. दणक्यानी	१४. सोंग
१५. जंगी	१६. गोडधोड
१७. सासुरवाशीण	१८. मोकळीक
१९. कोल्हाटी	२०. मारामारी
२१. मयत	२२. बहुसंख्य

प्र.५ वा: पुढील वाक्प्रयोगांचा अर्थ स्पष्ट करून त्यांचा तुमच्या स्वतःच्या वाक्यात प्रयोग करा :

१. अवलंबून असणे

२. पीक घेणे

३. हाल होणे

४. जगले वाचले

५. शाळा शिकणे

६. फेर धरणे

७. मारामारी होणे

८. लग्न निघणे______________

९. ओळखला जाणे___________

१०. बाजार भरणे______________

प्र.६ वा: 'विहिरी असलेल्या जमिनीत कापूस, गहू, ही पिकं यायची' हया वाक्यातल्या 'असलेल्या' हा प्रयोग नीट लक्षात घ्या आणि त्याचा वापर करून तुमची स्वतःची ५ वाक्यं लिहा.

प्र.७ वा: 'गावात काम न मिळाल्यामुळे'.
मिळाल्यामुळे = 'मिळालं नाही म्हणून'. अशा प्रकारे पुढील वाक्यांमधे म्हणून ऐवजी 'न _______ ' चा प्रयोग करा.

१. मोहन माझ्याकडे आला नाही म्हणून मी शाळेत गेलो नाही.

२. चित्राचा परीक्षेत पहिला नंबर आला नाही म्हणून शिक्षक तिला रागवले.

३. मेसचं जेवण वेळेवर तयार झालं नाही म्हणून विद्यार्थी रागवले.

४. पाऊस पडला नाही म्हणून शेतकरी काळजीत पडले.

५. त्याला कुठेही नोकरी मिळाली नाही म्हणून तो निराश झाला.

प्र.८ वा: 'हया दुकानातून ———— वस्तू घेता यायच्या. पैसेच पाहिजेत असं नव्हतं' हे वाक्य कोणत्याही काळात लिहिता येतं. उदाहरणार्थ - 'हया दुकानातून ———— वस्तू घेता येतात. पैसेच पाहिजेत असं नाही.' किंवा 'हया दुकानातून ———— वस्तू घेता येतील. पैसेच पाहिजेत असं नाही.' तसंच 'पैसेच पाहिजेत असं नाही' ही वाक्यरचनाही लक्षात घ्या. त्यातून नकारार्थी अर्थ ध्वनित होतो.

पुढे काही वाक्यांचे संदर्भ दिले आहेत, त्यातून वरीलप्रमाणे वाक्य तयार करून ती निरनिराळ्या काळात लिहून दाखवा:

नमुना : नाटकात सुरवार चालेल ———— 'धोतर नको'

मोहननी नाटकात सुरवार घातली तरी चालेल धोतरच पाहिजे असं नाही. (हेच वाक्य वर्तमान आणि भूतकाळात लिहावं.)

१. तोंडी बोलणं ____________ परीक्षा नको.
२. पायी जाणं ____________ मोटार नको.
३. डॉक्टरकडे टेलिफोन ____________ मोटार नको.
४. समारंभात चहा ____________ फुलं नको.
५. नृत्यासाठी घुंगरू ____________ तबला नको.

प्र.९ वा: 'गोडधोड' सारखे जोडशब्द (*उदा.* पाणीबिणी, लाडूबिडू) तुम्ही हयापूर्वी शिकला असालच. तसे १० शब्द द्या आणि त्यांचा वाक्यात उपयोग करून दाखवा.

प्र.१०वा: 'घेई', 'घेत असे' आणि 'घ्यायचा' हया पध्दतीनी पुढे दिलेल्या क्रियापदांची तिन्ही रूपे देऊन त्याचा प्रत्येकाचा वाक्यात उपयोग करून दाखवा.

१. बस____________
२. निघ____________
३. खा____________
४. वाट ____________ (to distribute)
५. दिस ____________

प्र.११वा: 'दिव्यासाठी तेल उगीच जाळावं लागायचं' या वाक्यातल्या 'उगीच' चा प्रयोग लक्षात घ्या आणि 'उगीच' हा शब्द वापरून तुमची स्वतःची पाच वाक्यं तयार करा.

प्र.१२वाः 'मार ---' हया क्रियापदापासून 'मारामारी' हे नाम तयार झाले आहे. त्याचप्रकारची नामं पळ, शिव, भांड, तोड आणि फेक हया क्रियापदांपासून तयार करा आणि त्यांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.

स्वाध्याय :

१. तुमच्या प्रांतातल्या खेडेगावाचा व्यवहार कसा चालत असे हयाची माहिती अगदी थोडक्यात द्या.

२. तुमच्याकडे होणाऱ्या पिकांची थोडक्यात माहिती लिहा.

३. 'खेडं -- जुनं आणि नवं' हया धड्यांपैकी भाग - १ आणि भाग - २ मध्ये माडगूळ हया एका प्रातिनिधिक खेड्यावरून महाराष्ट्रातलं 'जुनं खेडं' कसं होतं हयाची तुम्हाला साधारण कल्पना आली आहे. तुम्हीही तुमच्या प्रांतातल्या एखाद्या खेड्याचं - किंवा तुम्ही स्वतः रहात असलेल्या खेड्याचं वर्णन करा.

४. आज महाराष्ट्रात चालू असलेली 'दलित वाङ्मयाची' चळवळ समजावून घ्या. तुमच्या प्रांतात दलितांसाठी कोणत्या चळवळी चालू आहेत ? त्यासंबंधी थोडक्यात माहिती द्या.

५. तुम्ही पाहिलेल्या एखाद्या दुष्काळाचं चित्रण करा.

१२ खेडं - जुनं आणि नवं

भाग - २

माडगूळ गाव आता फारच बदललं आहे. गावाबाहेर शाळेची नवी इमारत झाली आहे. तिथे सातव्या इयत्तेपर्यंत शाळा आहे, शाळेत शिकवायला आता दोन मास्तर आणि एक मास्तरीण आहे.

गावाला आता वीज आली आहे. पूर्वी परगावाहून येणाऱ्या पाहुण्यांना लांबून गाव कुठे आहे हे कळायचं नाही. आता झगमगत्या दिव्यांमुळे कळतं.

गावाशेजारीच "बुद्धिहाळ" चा तलाव झाल्यामुळे बरीच शेतजमीन बागाईत झाली आहे. ऊस, हायब्रीड मका, असली पिकं लोक मोठ्या प्रमाणावर काढतात. एका शेतकऱ्यानी उत्तम द्राक्षाची बाग केली आहे. एकानी पेरूची बाग केली आहे.

बऱ्याच शेतकऱ्यांच्या विहिरींवर आता पंप बसवले आहेत. गावातली बरीच मुलं आता कॉलेजात जातात. कारण तालुक्याच्या गावी कॉलेज निघालं आहे.

एस. टी. मोटार गावात रोज दोन वेळा येते. हया मोटारीनी तालुक्याला किंवा रेल्वेस्टेशनला जाता येतं.

गावात आता ग्रामपंचायत आहे. सोसायटी आहे. शेतकऱ्यांना बी-बियाणं, पंप, औषधं यांचा पुरवठा ह्या दोन संस्था करतात.

कुळकर्णी वतनं आता रद्द झाली आहेत. गावचा कारभार सरपंच बघतात. पाटील आणि तलाठी आजही आहेत. पण त्यांना पूर्वीइतके अधिकार नाहीत.

गावचा शेतमाल आता मालमोटारीतून लांब लांब जातो. गावात बऱ्याच सायकली आहेत. दोन शेतकऱ्यांच्या फटफट्या आहेत.

तालुक्याला असलेल्या आरोग्यकेंद्रातून डॉक्टर आणि परिचारिका आमच्या गावाला आठवड्यातून तीन दिवस येतात. कुटुंब नियोजनाचा प्रचार गावात झाला आहे. काही लोकांनी पाळणा थांबवला आहे, काहींनी पाळणा लांबवला आहे. ग्रामपंचायतीनी गावचे रस्ते नीट केले आहेत. गटारं केली आहेत, आणि गावाबाहेर संडास बांधले आहेत.

शाळेत आता महारांची मुलं दूर बसत नाहीत. ग्रामपंचायतीमधला एक पंच महार आहे. शिवाय आमच्या गावच्या महाराचा एक मुलगा पदवीधर होऊन आकाशवाणीवर नोकरीला लागला आहे. तो केंद्राधिकारी आहे.

गावच्या शेतकऱ्याचा एक मुलगा वकील झाला आहे. एक शेती पदवीधर होऊन अमेरिकेला शिकण्यासाठी गेला आहे. आणखीसुद्धा बरीच मुलं पदवीधर झाली आहेत आणि बरीच नोकरीला लागली आहेत.

मोठ्या शहरापासून दूर असलेलं आमचं छोटंसं गाव आता बरंच सुधारलं आहे.

शब्दार्थ

बागाईत - पाण्याची स्वतंत्र सोय असलेली जमीन. (विहीर, तलाव, कालव्यामुळे ज्या जमिनीला बारा महिने पाणी मिळू शकते ती जमीन.

हायब्रीड - मराठी शब्द संकरित.

तलाठी - कुळकर्ण्याची कामं करणारा सरकारी पगारी नोकर.

फटफटी - मोटारसायकल.

धड्यावरचे प्रश्न :

प्र.१ लाः पुढील प्रश्नांची धड्याच्या आधारानी थोडक्यात उत्तरं द्या :

१. माडगूळ गावाशेजारी बुद्धिहाळ' चा तलाव झाल्यामुळे शेतीत काय बदल झाला ?

२. ग्रामपंचायतीनी गावात कोणत्या सुधारणा केल्या आहेत ?

३. गावात एस.टी. बस झाल्यामुळे गावात काय बदल झाले ?

४. तालुक्याच्या गावी कॉलेज निघाल्यामुळे काय घडलं ?

५. गावात वीज आल्यामुळे कोणता फायदा झाला ?

६. माडगूळ गावात शिक्षणपध्दतीत कोणते बदल झाले ? हया बदलांमुळे काय फायदे झाले ?

प्र.२ राः पुढील वाक्यांचा खेड्यामधे झालेल्या बदलाच्या संदर्भात खुलासा करा :

१. गावाशेजारी बुद्धिहाळचा तलाव झाल्यामुळे बरीच शेतजमीन बागाईत झाली आहे.

२. एस्. टी. मोटार गावात रोज दोन वेळा येते.

३. दोन शेतकऱ्यांच्या फटफट्या आहेत.

४. काही लोकांनी पाळणा थांबवला आहे, काहींनी पाळणा लांबवला आहे.

५. ग्रामपंचायतीतला एक पंच महार आहे.

प्र.३ राः पुढे दिलेल्या वाक्यातल्या गाळलेल्या जागा भरा :

१. आता गाव ____________ दिव्यांमुळे कुठे आहे ते कळतं.

२. गावातली जमीन आता ____________ झाली आहे.

३. ग्रामपंचायत शेतकऱ्यांना बी ____________ पुरवठा करते.

४. कुळकर्णी ____________ आता रद्द ____________ आहेत.

५. गावचा ____________ आता मालमोटारीतून ____________ जातो.

६. डॉक्टर आमच्या गावाला ________ तीन दिवस येतात.

७. कुटुंबनियोजनाचा गावात ____________ झाला आहे.

८. आमच्या गावच्या महाराचा एक मुलगा ______________ झाला आहे.

९. आमच्या गावची ______________ मुलं पदवीधर झाली आहेत.

१०. आमचं गाव आता बरंच ______________ आहे.

प्र.४ थाः टिपा लिहा :

१. माडगूळची शेती.

२. तालुक्याचं आरोग्य केंद्र.

३. माडगूळची शिक्षणसुधारणा.

प्र.५ वाः माडगूळ - जुनं आणि नवं हयात तुम्हाला समजलेले अगदी महत्त्वाचे बदल थोडक्यात लिहा.

भाषाभ्यास :

प्र.१ लाः 'झगमगता' हयासारखी काही विशेषणं तुम्ही पूर्वी शिकला आहात. तशी ५ विशेषणं देऊन त्यांचा तुमच्या वाक्यात उपयोग करा.

प्र.२ राः 'बराच' हया शब्दाचा उपयोग लक्षात घ्या आणि हया शब्दाची निरनिराळी रूपं तुमच्या वाक्यात वापरा. (५ वाक्यं)

प्र.३ राः 'असलेला' ची वेगवेगळी रूपं वापरून तुमच्या वाक्यात उपयोग करा. (५ वाक्यं)

प्र.४ था: शेतजमीन, शेतकरी, शेतमाल, शेतमजूर आणि शेतमळणी हया शब्दांचा खुलासा वर्गात समजून घ्या आणि अशाच प्रकारचे फॅक्टरी किंवा 'कारखाना' हया शब्दापासून होणारे शब्द द्या.

स्वाध्याय :

१. महाराष्ट्रातली दलित चळवळ समजून घ्या आणि त्यासंबंधी कोण कोण पुढारी महाराष्ट्रात होऊन गेले त्यांची माहिती मिळवा.

२. 'बलुतं', 'उपरा', ही पुस्तकं आणि काही दलित कवींच्या कविता वाचा.

३. महाराष्ट्रात स्त्रियांच्या जीवनात सुधारणा कशा आणि कोणी सुधारणा घडवून आणल्या हयाचा परिचय करून घेऊन, त्यासंबंधीची काही पुस्तकं वाचा.

१३ हुतात्मा दामोदर हरि चापेकर

सन १८१८ मधे पेशव्यांच्या शनवारवाड्यावर ब्रिटिशांचं युनियन जॅक लागलं आणि पारतंत्र्याला सुरुवात झाली. या गुलामगिरीविरुद्ध प्रथम आवाज उठला तो १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात. राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, नानासाहेब ही त्यातली सर्व मंडळी मराठी होती. ते स्वातंत्र्ययुद्ध अयशस्वी झालं. पण त्यानी अनेक क्रांतिकारकांना प्रेरणा दिली. महाराष्ट्रात इंग्रजांविरुद्ध पहिला सशस्त्र उठाव क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक्यांनी केला. पुढे टिळकांसारख्या पत्रकारांनी लेखणी चालवून भारतीयांच्या मनात ब्रिटिशांविरुध्द असंतोष पेटवला. तर अनेक क्रांतिकारकांनी ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध हातात शस्त्र घेतलं. अशा वीर हुतात्म्यांची स्मारकं महाराष्ट्रात अनेक गावांत आहेत. खुद्द पुण्यात अशा वीराचं स्मारक गणेशखिंड रस्त्यावर आहे. त्याचं नाव दामोदर हरि चापेकर.

हे चापेकर मूळचे चिंचवडचे. दामोदर, बाळकृष्ण आणि वासुदेव असे हे तिघे भाऊ होते. त्यांचे वडील हरदास म्हणजे कीर्तनकार होते. तिघे भाऊ वडलांना कीर्तनात पेटी, टाळ वगैरे वाजवून मदत करायचे. पण दामोदर आणि बाळकृष्णाला पहिल्यापासून शरीर कमावण्याची, व्यायामाची, शस्त्रविद्येची अतिशय आवड होती. सैन्यात प्रवेश मिळवण्याचाही त्यांनी खूप प्रयत्न केला पण त्यांना यश आलं नाही. मध्यप्रदेशात धारला मुक्काम

असताना त्यांना बंदुकीच्या नेमबाजीचं शिक्षण घेता आलं. त्यांनी थोडी शस्त्रं जमवायला सुरुवात केली. मुलांमधे संघभावना निर्माण व्हावी म्हणून त्यांनी मुलांचा एक गट बनवला. त्यांना गोफण चालवण्याचं शिक्षण दिलं. बाळकृष्णतर युद्धकला शिकण्यासाठी घर सोडून नेपाळला गेला होता. त्याचा फारसा उपयोग झाला नाही. तरीही दोघांच्या मनातलं शस्त्रांचं प्रेम कमी झालं नाही.

दामोदरला हिंदू धर्माचा फार अभिमान वाटत असे. ख्रिस्ती मिशनरी आणि त्यांच्या प्रलोभनांना बळी पडून धर्मांतर केलेले इथले सुधारक यांच्यावर दामोदरचा फार राग होता. त्यांना दहशत वाटावी म्हणून त्यांनी एका मिशनऱ्याचं घर जाळण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी वेलणकर नावाच्या धर्मांतर केलेल्या हिंदूला त्याच्या घरात जाऊन बेदम मारलं होतं.

मोठं सैन्य उभं करून राजकीय बंड करण्याचा चापेकरांचा हेतू नव्हता. त्यांना इंग्रजांविषयीचा राग व्यक्त करायचा होता. 'जय मिळणे न मिळणे नशिबावर आहे. ..... पण जे काम करायचे ते अत्यंत महत्त्वाचे असले पाहिजे. जे केल्यावर त्याची सर्वत्र चर्चा होऊन आईबाबांना आनंद झाला पाहिजे आणि इंग्रजांना अतिशय वाईट वाटून राजद्रोहाचा स्पष्ट शिक्का आम्हाला मिळाला पाहिजे' अशी त्यांची इच्छा होती.

यासाठी त्यांनी मुंबईच्या फोर्ट भागातल्या व्हिक्टोरिया राणीच्या पुतळ्याला डांबर फासलं आणि त्याला फाटक्या चपलांची माळ घातली. युरोपियन पद्धतीचे शिक्षण आपल्या मुलामुलींना दास बनवते असे वाटल्यामुळे त्यांनी परीक्षेचा मांडव जाळून टाकला होता.

१८९७ साली पुण्यात प्लेगच्या साथीने कहर केला होता. ताप येऊन काखेत गाठी उठून माणसं पटापट मरत होती. या साथीचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रज सरकारने रँड (आय. सी. एस) आणि आयर्स्ट अशा दोन अधिकाऱ्यांची नेमणूक केली होती. तपासणीच्या नावाखाली रँडच्या सोजिरांनी फार अत्याचार केले. दुकानं लुटली, देवस्थानं भ्रष्ट केली, घरातले देव रस्त्यावर फेकले, स्त्रियांना त्रास दिला. आजारी असल्याच्या संशयावरून गोरगरिबांना मारहाण करून सरकारी दवाखान्यात जबरदस्तीने कोंडले. कोणत्याही वेळी गोरे सोजीर कोणाच्याही घरात घुसत आणि सामानाची नासधूस करत. लोक याला अगदी त्रासून गेले होते. "या अत्याचारांचा बदला घेणारा कोणी स्वाभिमानी मर्द नाही काय ?" असे बायका अगदी तळतळून विचारत.

दामोदराचं मन यामुळे पेटून उठलं. त्यातच त्याचा जिवलग मित्र दत्ता भिस्कुटे याचाही प्लेगने अंत झाला. मगमात्र रँडसाहेबाला ठार मारण्याचा त्यानी निश्चय केला. १८९७ हे वर्ष व्हिक्टोरिया राणीच्या राज्यकारभाराचं साठावं वर्ष होतं. हीरकमहोत्सवाचा हा समारंभ पुण्यात २२ जून १८९७ रोजी गव्हर्नरच्या बंगल्यावर होणार होता. समारंभाला हजर राहून रँड आणि आयर्स्ट घोडागाड्यांमधून घरी परतत होते. या वाटेवर दामोदर आणि बाळकृष्ण या दोघांनी गाड्यांमधे चढून गोळ्या झाडल्या. आपला कार्यभाग साधून ते अंधारात अदृश्य झाले.

या खुनाचा तपास ब्रुइन या पोलीस सुपरिंटेंडेंटकडे आला. त्याने हुशारीने गणेश द्रविडला माफीचा साक्षीदार केले आणि चापेकर बंधूंना अटक केली. वीर चापेकरांना १८ एप्रिल १८९८ रोजी येरवडा तुरुंगात फाशी देण्यात आले. आपल्या आईवडलांना लिहिलेल्या पत्रात दामोदरने

लिहिले आहे -- "अजूनही आम्ही केले हे वाईट केले असे आम्हांस वाटत नाही. इतकेच नाही तर पुढे फासावर जाताना सुद्धा वाईट वाटणार नाही. लग्नसमारंभात निघालेल्या मिरवणुकीपेक्षा आम्ही या अंतकालच्या मिरवणुकीस जास्त महत्त्व देतो." मृत्यूसमयी दामोदर सत्तावीस, बाळकृष्ण चोवीस आणि वासुदेव फक्त अठरा वर्षाचा होता. या तरुण हुतात्म्यांनी केलेल्या बलिदानाबद्दल देश त्यांचा ऋणी आहे. ज्या जागेवर चापेकरांनी रँडचा वध केला तिथेच त्यांचा पुतळा उभा करून लोकांनी त्यांचं स्मारक बांधलं.

टिपा

१. वासुदेव बळवंत फडके - (जन्म १८४५ - मृत्यू १८८३)

हे मूळ रायगड जिल्हयातील शिरढोणचे. ते पुण्याला एका जज्ञाकडे कारकून होते. १८७६ - ७७ च्या दुष्काळात लोकांचे फार हाल झाले. ते पाहून इंग्रजांविरुद्ध बंड करण्याची प्रेरणा त्यांना मिळाली. त्यांनी धाडसी लोक जमवून दांडपट्टा, तलवार, घोडदौड, बंदूक यांचे शिक्षण दिले. हे सर्व शिक्षण त्यांनी आपल्या पत्नीला म्हणजे गोपिकाबाईंनापण दिले होते. हत्यारे आणि अन्नखर्चासाठी त्यांनी धनिकांवर दरोडे घातले. १८७६ साली त्यांच्या बंडाचा पुणे भागात प्रभाव होता. अखेर फितुरी आणि आजारपणामुळे ते कैद झाले. एडनच्या तुरुंगात त्यांना मृत्यू आला. ते म्हणत, "दधीचि ऋषींनी आपल्या अस्थीही देवासाठी दिल्या मग, हे हिंदवासियांनो, मी आपला प्राण तुमच्यासाठी का देऊ नये?"

२. हरदास (कीर्तनकार)

कीर्तन ही भक्तीच्या नऊ पायऱ्यांमधली दुसरी पायरी. ही एकप्रकारची उपासनाच असते. जगाला योग्य उपदेश करून सन्मार्गाला लावणे हे

कीर्तनकाराचे काम असते. नारदमुनी हे आद्य कीर्तनकार होत. संतकवी नामसंकीर्तन करत तर हरदासांच्या दृष्टीने कीर्तन हे लोकजागृतीचे साधन आहे. आदर्श हरदास हा 'अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ' असतो. काव्य, वेदान्त, जगरूढी यांचे ज्ञान आणि वक्तृत्व हे गुण त्याच्या जवळ असतात. टाळ, वीणा, मृदंग यांच्या साथीने हरदास एखादी पौराणिक कथा गद्य आणि पद्यरूपात रसाळपणे मांडतो. पूर्वरंग, उत्तररंग असे कीर्तनाचे दोन भाग असतात. कीर्तनात सर्व रसांना महत्त्व आहे पण इथे शृंगार रस सभ्यपणाची मर्यादा सोडत नाही. म्हणून कीर्तन ही सुशिक्षित - अशिक्षित स्त्रीपुरुष - मुलाबाळांची सभ्य अशी करमणूक आहे.

शब्दार्थ -

उठाव	-	बंड, आंदोलन.
संघभावना	-	ऐक्य, आपण सर्व एक आहोत ही भावना.
गोफण	-	टोकाला दगड ठेवून फिरवून मारण्यासाठी केलेले साधन.
प्रलोभन	-	मोह, लोभ पाडणारी गोष्ट. आमिष.
शिक्का	-	मुहर stamp
सोजीर	-	शिपाई. इंग्रजी soldier चे देशी रूप.
तळतळणे	-	चीड, दुःख अनावर होऊन शापवाणी उच्चारणे.
कार्यभाग	-	करायचे ठरवलेले काम, उद्दिष्ट.
माफीचा साक्षीदार	-	गुन्हेगाराचा साथीदार पण प्रत्यक्ष गुन्हयात कमी

सहभाग असल्यामुळे त्याला शिक्षा होणार नाही असे अभय देऊन त्याचाच साक्षीदार म्हणून उपयोग केला जातो.

धड्यावरचे प्रश्न

१) मराठी माणसांनी गुलामगिरीला विरोध कसा केला ?

२) कीर्तनकाराच्या मुलांपेक्षा चापेकर बंधूंचं वागणं वेगळं कसं होतं ?

३) रँडच्या वधापूर्वी चापेकरांनी राजद्रोहाची कोणती कामं केली होती?

४) 'राजद्रोहाचा शिक्का'च चापेकरांना कशासाठी हवा होता ?

५) रँडचा वध करण्याचा निश्चय चापेकरांनी का केला ?

६) चापेकरांनी आपल्या कामगिरीसाठी कोणता दिवस निवडला ? का?

७) हौतात्म्य स्वीकारण्यामागे चापेकरांची काय भूमिका होती ?

८) मनुष्यवध हा अपराध असूनही कोणत्याही देशात क्रांतिकारकांना मान का देतात ?

टिपा लिहा

१) चापेकरांचा स्वदेशाभिमान

२) पुण्यातला प्लेग

३) हुतात्म्यांचं स्मरण

भाषाभ्यास -

१. वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
आवाज उठवणे, प्रेरणा देणे, उठाव करणे, शरीर कमावणे, बळी पडणे, दहशत वाटणे, राग असणे, कहर करणे, त्रासून जाणे, बदला घेणे, नासधूस करणे, मन पेटून उठणे, कार्यभाग साधणे.

२. स्वातंत्र्य या मराठी शब्दाला दुसऱ्या भाषांमधे कोणते शब्द आहेत ते गोळा करून लिहा.

३. अ हा उपसर्ग लागून विरुद्धार्थी बनलेले शब्द पाठातून शोधून लिहा.

४. नेम - नेमबाज - नेमबाजी असे शब्द तयार होतात. त्यांचा वाक्यात उपयोग करा. त्याप्रमाणे दगा, धोका, सौदा, दारू यांचेही असे शब्द बनवून वाक्यात उपयोग करा.

५. कीर्तनकार म्हणजे कीर्तन करणारे. याप्रमाणे गीतकार, भाष्यकार, टीकाकार, छायाचित्रकार, कलाकार, नाटककार, संगीतकार, चर्मकार, बेकार म्हणजे कोण ते सांगा.

६. मूळ शब्द सांगा -
पारतंत्र्य, गुलामगिरी, प्रलोभन, राजद्रोह, अत्याचार

७. खुद्द पुण्यात - उर्दू 'खुद' चा हा उपयोग केला आहे.
खुद्द पंतप्रधान स्वागताला उपस्थित होते.
खुद्द वीजमंडळाच्या कार्यालयातच वीज नव्हती.
त्यांनी खुद्द बॅरिस्टर जीनांनाच वकीलपत्र दिलं.
अशी वाक्ये बनवा.

८. या पाठातली रीति भूतकाळाची वाक्ये शोधून लिहा.

स्वाध्याय -

१) चापेकर बंधूंच्या जीवनावर '२२ जून १८९७' हा मराठी चित्रपट निघाला आहे. तो पहा आणि तुम्हाला काय वाटले ते थोडक्यात लिहा.

२) तुमच्या प्रांतातल्या क्रांतिकारकांची माहिती लिहा.

३) महाराष्ट्रातल्या अन्य क्रांतिवीरांची माहिती जमवून एक टिपण तयार करा.

४) दामोदर हरि चापेकरांचं आत्मवृत्त पुस्तकरूपात प्रसिद्ध आहे. ते मिळवून वाचा.

५) तुमच्याकडे क्रांतिकारकांविषयी कोणते साहित्य छापलेले आहे त्याची माहिती द्या.

१४ प्रतापगडची सहल

गेल्यावर्षी मनू सातवीत होती. तिच्या वर्गाची सहल महाबळेश्वर आणि प्रतापगडला न्यायचं ठरलं. तिचे वर्गशिक्षक श्रीधर देशपांडे इतिहास शिकवतात. त्यांनी सर्व वर्गाला प्रतापगडाची माहिती दिली होती. अफझलखान वधाचा प्रसंग तर त्यांनी मुलांच्या डोळ्यांसमोर जसाच्या तसा जिवंत उभा केला होता. तो ऐकताना मनूला आजीकडून ऐकलेल्या कंसवधाची आठवण आली. एकूणच वर्गाबरोबर सहलीला जायला आणि प्रतापगड पहायला ती अधीर झाली होती. सहलीला पाठवण्यासाठी तिनी आईवडलांचा अगदी पिच्छा पुरवला होता. अखेर परवानगी मिळाली आणि तिने शाळेत पैसेसुद्धा भरले.

देशपांडे सरांनी सहलीची जय्यत तयारी केली होती. त्यांनी एक स्वतंत्र बसच ठरवून टाकली होती. त्यांच्याबरोबर भूगोलाचे पवारसर, गणिताच्या दामलेबाई आणि मराठीच्या डोंगरेबाईपण होत्या. शाळेचा शिपाई तुकाराम मदतीसाठी हजर होता. एक दिवसाचा डबा मुलांनी आणायचा आणि दुसऱ्या दिवशी खिचडी करून खायची असं ठरलं होतं. सहलीसाठी दिवाळीनंतरचा काळ उत्तम. कारण पाऊस संपलेला असतो आणि कडाक्याची थंडी अजून सुरू झालेली नसते. म्हणून मनूच्या सहलीचे दिवस १६, १७ नोव्हेंबर हे शनिवार - रविवार ठरवले होते. सगळ्या वर्गात सहलीच्या

घोषणेने उत्साहाचे वारेच संचारले होते. काय काय आणायचं, डब्यात काय घ्यायचं हे ठरवता ठरवता दिवस हां हां म्हणता निघून गेले आणि सहलीचा दिवस उजाडला.

शनिवारी पहाटे शाळेचं आवार मुलांनी आणि त्यांच्या आईबाबांनी गजबजून गेलं होतं. सर्वांचा एकच कल्लोळ उठला होता. आपल्या मित्रमैत्रिणीजवळची जागा धरण्यासाठी आणि खिडकीजवळची जागा मिळवण्यासाठी सर्वांची धडपड चालली होती. भांडणं नको म्हणून डोंगरेबाईंनी सर्वांना हजेरीपटातल्या क्रमांकाप्रमाणे बसवलं. पुन्हा एकदा सर्वांची हजेरी घेतली. सर्व सामान आलं हे पाहून तुकारामनं बसपुढे नारळ फोडला आणि सर्वांना टाटा करुन बस सुटली.

मुलांचा उत्साह अगदी उतू जात होता. गाणी, टाळ्या, खंजिरी, शाळेचा ढोल यांच्या आवाजात बोलणे कोणाला ऐकूच जात नव्हते. वाई मागे पडल्यावरमात्र मुलांची तोंडे बंद झाली आणि बाहेरच्या हिरव्यागार निसर्गावर त्यांची नजर खिळली. पाचगणीपासून तर लाल माती, गर्द हिरवी झाडं, निळ्याभोर आकाशातलं कोवळं ऊन आणि वाटेवर हलणारी ऊनसावल्यांची नक्षी पहाताना मुलं हरवून गेली. महाबळेश्वर कधी आलं पत्ताच लागला नाही.

चहाफराळ आटपून सगळे महाबळेश्वर पहायला निघाले. काश्मीर हे भारताचं तर महाबळेश्वर हे महाराष्ट्राचं नंदनवन आहे. फरक इतकाच की, इथल्या सहयाद्रीच्या शिखरांवर बर्फ नसून दाट हिरवीगार झाडी आहे. या डोंगर भागात उंच टोकदार अशी थोडी पुढे गेलेली जागा असते. तिथून सभोवर पर्वत, दरी, दूरवरची नदी इ. दृश्य अगदी अप्रतिम दिसते. अशा

जागांमधे काही जागा ब्रिटिश अधिकाऱ्यांनी भटकंतीत शोधून काढल्या. त्यांना निरनिराळे पॉईटस् म्हणतात. महाबळेश्वरला असे पहाण्यासारखे एकूण ३० पॉईटस् आहेत. त्यांमधे एलेफंटस् हेड (हत्तीचं मस्तक), केट्स् पॉइंट, लुडविक पॉइंट, कोयना पॉइंट, मंकीज पॉइंट हे तर फारच प्रेक्षणीय आहेत. बऱ्याच ठिकाणी आत बस जाते. पुढे पायवाट. शिक्षकांनी मुलांना सांभाळून नेले. तिथे विशाल पर्वत आणि खोल दऱ्या असे निसर्गाचे रुद्र रूप पाहून मुलं चकित झाली. एको [प्रतिध्वनी] पॉ इं टला खू पच मजा आली. सुईच्या नेढ्यासारखा पर्वताचा आकार Needle point आणि एलेफंट पॉइंट चे घुसलेले टोक इथून पाय निघत नव्हता. जुन्या महाबळेश्वरात कृष्णा, कोयनादी पाच नद्यांच्या उगमस्थानी एक जुनं भव्य देऊळ आहे. तिकडे सर्वांनी अंगतपंगत करून डबे खाल्ले. संध्याकाळी बॉंबे पॉइंटचा सूर्यास्त पहायचा होता. आकाशात पहाता पहाता अदृश्य होणारे सूर्यबिंब पाहून अभयने 'कुठे बुडाला पलीकडिल तो सोन्याचा गोळा' ही ओळ असलेली 'संध्यारजनी' नावाची कविता म्हटली. बाजारपेठ पाहून मग सर्वांनी गिरिस्थान प्रशालेत मुक्काम केला.

सकाळी प्रतापगड. आता बस सहयाद्रीच्या दुसऱ्या बाजूला उतारावरून जात होती. जंगल अधिक दाट होतं. या भागाला जावळी खोरं म्हणतात. हया दुर्गम जागी भोरप्याच्या उंच डोंगरावर १६५७ साली शिवाजी राजांनी मोरोपंतांकडून हा किल्ला बांधून घेतला होता. १०-६-१६५६ रोजी झालेल्या खानाच्या भेटीची ही पूर्वतयारी होती. तासाभरात बस गडाच्या पायथ्याशी पोचली. काळ्याकभिन्न कड्यांवरचे भक्कम बुरुज आणि किल्ल्याचे तट त्याच्या विशालतेची साक्ष देत होते. मुलं भरभर गड चढायला लागली. महादरवाजा ओलांडून आत गेल्यावर तुळजाभवानीचे मंदिर आहे. या मंदिरात स्फटिकाचे शिवलिंग आहे. खानाच्या भेटीला जाण्यापूर्वी शिवाजी

राजांनी याच देवीचा आशीर्वाद घेतला होता. हे देशपांडे सरांनी सांगितल्यावर मुलांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. पुढे चढून गेल्यावर बालेकिल्ला लागतो. आत शिरल्यावर जुनं महादेवमंदिर आणि सदरेची जागा आहे. उजवीकडे छत्रपतींचा भव्य अश्वारूढ पुतळा आणि उद्यान आहे. तटाजवळ उभे राहिले की, जावळी खोरे, मकरंदगड आणि महाबळेश्वरची पर्वतमाला असे भव्य दृश्य दिसते.

भवानीमंदिराच्या पूर्वेला बराच दूरवर गेलेला तटबंदीचा एक चिंचोळा भाग दिसतो. त्याच्या शेवटी अफझलबुरुज आहे. हा सर्व भाग देवळाच्या दारातल्या एका खिडकीतून अगदी स्पष्ट दिसतो. बुरुजाच्या उजवीकडे मैदानात अफझलखानाची कबर आहे. कबरीची आजही अतिशय उत्तम व्यवस्था ठेवली आहे. त्यावरुन शिवाजीराजे शत्रूचा मरणानंतर आदरच करत हे ध्यानात येते.

दोन दिवस सतत भटकून मुलं दमून गेली होती. पण जे पहायला मिळालं त्यामुळे त्यांची मनं भारावून गेली होती. कारण आज इतिहास त्यांच्यापुढे जिवंत झाला होता.

१. सांस्कृतिक टिपा

१. प्रतापगड - महाबळेश्वरहून पश्चिमेकडे सहयाद्री ओलांडल्यावर जावळी खोरे लागते. हा भाग पूर्वीपासून घनदाट जंगलामुळे अतिशय दुर्गम आहे. जावळीचा आदिलशाही वतनदार चंद्रराव मोरे अत्याचारी होता. त्याचा शिवाजी महाराजांनी वध केला. त्यावेळी अफझलखान विजापूरच्या

दरबारात वाईचा सुभेदार होता. शिवाजीच्या बंदोबस्तासाठी तोच येणार याची राजांना कल्पना होती. त्यांच्याजवळ प्रचंड सैन्य नव्हतं. म्हणून जावळीच्या दुर्गम जंगलाचा उपयोग करायचं त्यानी ठरवलं. तिथे भोरप्याचा डोंगर होता. मोरोपंतांना सांगून त्यांनी १६५७ साली या उंच डोंगरावर किल्ला बांधून घेतला, तोच प्रतापगड. या गडावर बलशाली अफझलखानाचा वध करण्याचा प्रताप राजांनी केला आणि त्याचं नाव सार्थ झालं. गडावर कुलदेवता भवानीचं मंदिर आहे.

२. *अफझलखानवध* - अफझलखान हा वाईचा सुभेदार होता. तो अतिशय धिप्पाड, बलवान होता. हातानी पहार वाकवणे, तोफेचा गाडा उचलणे त्याला सहज शक्य होते. तो चांगला प्रशासक होता. पण जुलमी आणि कपटी होता. शिवाजी राजांचा भाऊ संभाजी याला त्यानी कपटाने मारले होते. वडील शहाजींना पण कैद केले होते. विजापूरच्या दरबारात "शिवाजीला चढे घोडियानिशी घेऊन येतो" अशी प्रतिज्ञा करुन खान प्रचंड फौज घेऊन निघाला. वाटेत त्याने पंढरपूर, तुळजापूरची मंदिरं भ्रष्ट केली. शिवाजीचा पूर्ण पराभव करायचा, भेटीला बोलवून ताकदीने त्याला कपटाने ठार करायचे हा त्याचा हेतू होता. शिवाजी राजांनी मोठ्या युक्तीने सैन्यासह त्याला जावळीत आणले. १०-९-१६५९ दिवशी दुपारी वाघनखं चालवून त्याला ठार केले. हा मराठ्यांचा पहिला मोठा विजय होता.

शब्दार्थ

पिच्छा पुरवणे	-	पाठीस लागणे, सतत हट्ट धरणे.
जय्यत	-	परिपूर्ण, सर्व

कडाक्याची	-	कडक, तीव्र
वारे संचारणे	-	खूप उत्साह वाटणे, नावेच्या शिडात वारे शिरले की नावेला वेग येतो.
कल्लोळ	-	कोलाहल, मिश्र आवाज
उतू जाणे	-	दूध तापवताना वर येऊन सांडतं त्याला उतू जाणे म्हणतात.
खिळणे	-	ठोकल्याप्रमाणे स्थिर होणे.
भटकंती	-	मुक्त फिरणे
नेढं	-	सुईत दोरा ओवण्याची जागा
अंगतपंगत	-	एकमेकांचे पदार्थ वाटून एका पंगतीत जेवणे
बालेकिल्ला	-	किल्ल्याच्या आतल्या भागातली मुख्य महाल, कचेरीची जागा.
चिंचोळा	-	चिंचेप्रमाणे लांब आणि अरुंद

धड्यावरचे प्रश्न

१. वर्गाची सहल कुठे जाणार होती ? त्या ठिकाणांचं वैशिष्ट्य काय ?

२. शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी सहलीची काय तयारी केली ?

३. मुलांची सहल कोणत्या महिन्यात काढतात ? का ?

४. बसमधल्या मुलांवर निसर्गसौंदर्याचा काय परिणाम झाला ?

५. महाबळेश्वरला महाराष्ट्राचं नंदनवन का म्हणतात ?

६. प्रतापगडावर इतिहासाच्या खुणा कुठे कुठे आहेत ?

७. प्रतापगडावर कोणती महत्त्वाची घटना घडली होती ?

८. आज अफझलखानाची कबर पाहून काय वाटते ?

टिपा लिहा.

१. शिवाजी - अफझल भेट

२. सहयाद्रीच्या निसर्गाचे वैशिष्ट्य

३. सहल - पर्यावरण शिक्षणाचं साधन

४. महाराष्ट्रातले किल्ले / किल्ला

गाळलेल्या जागी पाठातले योग्य शब्द भरा -

१. अफझलखान वधाचा प्रसंग त्यांनी मुलांच्या डोळ्यांसमोर ______ ______ ______ जिवंत उभा केला होता.

२. मनूला आजीकडून ऐकलेल्या ______ आठवण आली.

३. देशपांडे सरांनी सहलीची ______ तयारी केली होती.

४. पाऊस संपलेला असतो आणि ______ थंडी सुरू झालेली नसते.

५. हिरव्यागार निसर्गावर नजर ______ .

६. ______ हे भारताचं तर ______ हे महाराष्ट्राचं नंदनवन आहे.

७. काही जागा ब्रिटिशांनी ____________ शोधून काढल्या. त्यांना ____________ असे म्हणतात.

____________ ____________ सूर्यास्ताची शोभा दिसते.

८. तिकडे सर्वांनी ____________ ____________ करुन डबे खाल्ले.

९. मंदिरापुढे चढून गेल्यावर ____________ लागतो.

१०. आत शिरल्यावर जुनं महादेवमंदिर आणि ____________ जागा आहे.

११. उजवीकडे छत्रपतींचा भव्य ____________ पुतळा आहे.

१२. भवानीमंदिराच्या पूर्वेला बराच दूरवर गेलेला ____________ एक ____________ भाग दिसतो.

१३. १६५७ मधे राजांनी ____________ डोंगरावर ____________ कडून हा गड बंधून घेतला होता.

१४. खानाच्या भेटीची ही ____________ होती.

भाषाभ्यास -

वाक्प्रचार -

जसा च्या तसा, पिच्छा पुरवणे, वारे संचारणे, हां हां म्हणता, उत्साह उतू जाणे, नजर खिळणे, हरखून जाणे, पत्ता न लागणे, साक्ष देणे, रोमांच उभे रहाणे, जिवंत होणे, पहाता पहाता, तोंड बंद होणे, पाय न निघणे.

१. पाऊस संपलेला असतो, थंडी सुरू झालेली नसते ———
ही रचना पूर्ण झालेली नित्याची, नेहमीची गोष्ट सांगण्यासाठी वापरतात. *उदा:*

सकाळी मुलं शाळेत गेलेली असतात.

दिवाळीत शेतकऱ्यांनी पिकं कापलेली असतात.

अकरा वाजेपर्यंत सर्व शिक्षक आलेले असतात.

नकारार्थी

अज़ून पिकं तयार झालेली नसतात.

पहाटे रहदारी फारशी सुरू झालेली नसते.

घरात कोणी उठलेलं नसतं.

भूतकाळवाचक 'लेला' प्रत्ययाचा इथे केलेला उपयोग लक्षात घ्या.

२. तासभर - तासाभरात,

दिवसभर - दिवसभरात,

वर्षभर - वर्षभरात,

महिनाभर - महिनाभरात

या जोड्यांमधला अर्थाचा फरक समजून घ्या आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा.

३. मूळ शब्द सांगा
भटकंती, टोकदार, डोंगराळ, पायथा, हजेरी

४. हिरवागार हे तीव्रतादर्शक विशेषण तुम्हाला माहीत आहे. त्याचबरोबर काळ्याकभिन्न, निळ्याभोर, काळाकुट्ट, काळीशार, लांबलचक, लांबसडक, हिरव्याकंच या नव्या विशेषणांचा उपयोग समजून घ्या आणि वाक्ये बनवा.

५. या पाठात आलेल्या सर्व विशेषणांची यादी करा.

स्वाध्याय -

१. तुम्ही नेलेल्या शाळेच्या सहलीचे वर्णन करा.

२. तुमच्या प्रांतातल्या एखाद्या निसर्गरम्य स्थळाची माहिती लिहा. कोणता ऐतिहासिक प्रसंग त्या स्थळाशी निगडित आहे त्यावर एक संवाद लिहा.

३. पुण्याजवळ सिंहगड, पुरंदर हे किल्ले आहेत. ते पाहून त्यांचे वर्णन लिहा.

४. तुमच्या प्रांतात शिवाजी महाराजांबददल काय माहिती आहे, त्यावर एक टिपण लिहा.

५. अफझलखान वधाचा प्रसंग तुमच्या शब्दांत लिहा.

६. 'वाघनखं' ले. रणजित देसाई आणि 'आकाशमिठी' ले. वसन्त कानेटकर ही पुस्तके वाचा.

१५ छत्रपती शिवाजी

शिवाजी महाराजांचा जन्म ६ फेब्रुवारी १६३० या दिवशी शिवनेरी किल्ल्यावर झाला. त्यांचे वडील शहाजीराजे आदिलशहाचे सरदार होते. स्वतंत्र राज्यस्थापनेच्या अनेक अपयशी प्रयत्नांनंतर ते बंगळूरला स्थिरावले होते. पुणे आणि पुण्याजवळचा बारा मावळ हा प्रांत ही त्यांची जहागीर होती.या जहागिरीत शिवाजी आपली आई जिजाबाई आणि गुरू दादोजी कोंडदेव यांच्यासह बालपणापासून कारभार पहायला लागले.

हा सर्व प्रदेश आक्रमकांनी उध्वस्त केलेला होता. प्रजा वतनदारांच्या अत्याचारांनी गांजून गेली होती. शिवाजीने प्रथम इथे गावे वसवली. जमीन लागवडीखाली आणली. शेतकऱ्यांना नांगर, बैल, बीबियाणे कर्जाऊ दिले. कर्जाची परतफेड दोन वर्षात बांधून दिली. करवसुली निश्चित केली. आणि लांडग्यांपासून पिकाचे रक्षण करण्यासाठी प्रोत्साहन दिले. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या रांझ्याच्या पाटलाला आठव्या वर्षी त्यांनी हातपाय तोडण्याची कठोर शिक्षा केली होती. शेतकऱ्यांना फौजेचा किंवा वतनदारांचा त्रास होऊ नये म्हणून राजांनी कडक नियम केले आणि वतनदारी मोडून काढली, याच सामान्य शेतकरी मावळ्यांच्या हातात त्यांनी शस्त्र दिले. त्यांच्या स्वराज्यस्थापनेची सुरुवात ही अशी झाली. वयाच्या पंधराव्या वर्षी रोहिडेश्वरासमोर त्यांनी स्वराज्यस्थापनेची शपथ घेतली होती.

या वीरनायकाच्या आयुष्यात अनेक रोमहर्षक घटना आहेत. अफझलखान वध, पावनखिंडीची लढाई, शास्ताखानाचा पराभव, पुरंदरचा तह आणि आग्याहून सुटका या सर्व नाट्यमय घटना आहेत. शिवाजीची धाडसी वृत्ती आणि युध्दकौशल्य त्यांमधून प्रगट होते. बाजीप्रभू, तानाजी, मुरारबाजी, प्रतापराव गुजर या त्यांच्या सहकाऱ्यांच्या बलिदानांच्या वीरगाथाही तितक्याच स्फूर्तिदायक आहेत. शिवाजीचे हे सर्व सेनानी आणि प्रधान सामान्यांमधूनच वर आलेले आहेत हे विशेष.

पण शिवाजीचे खरे कर्तृत्व प्रजेच्या मनात स्वराज्याची प्रेरणा निर्माण करण्यात आहे. दिल्लीपती औरंगजेब स्वतःला तुर्क म्हणवत असे. हिंदुस्थानचा तो जेता होता. त्याच्याशी टक्कर घेऊन एतद्देशीयांचे हिंदवी राज्य महाराजांनी स्थापन केले. पुढे शिवाजीच्या मृत्यूनंतर सत्तावीस वर्षे मराठ्यांनी औरंगजेबाशी नेत्याशिवाय झुंज दिली आणि त्याचा पराभव केला. ही प्रेरणा शिवाजीची होती. म्हणूनच शिवाजीराजे आग्याला कैदेत असतानाही त्यांचे राज्य सुरक्षित राखले गेले. त्यांच्याविरुद्ध प्रजेने किंवा फौजेने कधीही बंड पुकारले नाही.

शिवाजी महाराजांना फक्त हिंदूंचेच राज्य अपेक्षित नव्हते. त्यांचे सेवक, सरदार मुसलमान होते. त्यांनी मशिदींनाही नेमणुका दिल्या होत्या. त्यांनी एकाही माणसाचे छळाने धर्मांतर केले नाही किंवा एकही मशीद पाडली नाही. युद्धाच्या गर्दीतही धुळीत पडलेली कुराणाची प्रत त्यांनी एका धार्मिक मुसलमानाच्या हाती सुपूर्द केली होती. त्यांनी शत्रुच्याहीस्त्रीची विटंबना होऊ दिली नाही. त्यांचे नैतिक आचरण श्रेष्ठ दर्जाचे होते. त्या काळातल्या कोणत्याही राज्यकर्त्याने न केलेल्या अनेक रचनात्मक गोष्टी शिवाजी महाराजांनी केल्या. आपल्या युद्धनीतीत आरमाराची नवी उभारणी त्यांनी केली. मालवणला सिंधुदुर्ग हा नवा जलदुर्ग बांधला. आरमारी युध्दाची

तयारी केली. त्यामुळे इंग्रज, पोर्तुगीज आणि सिद्दी यांची समुद्रात नाकेबंदी झाली. पंचवीस तीस वर्षे श्रमाने उभारलेल्या या आरमाराची योग्य प्रगती पुढच्या राज्यकर्त्यांनी केली असती तर इंग्रजांचा प्रवेश इतका सहज झाला नसता.

राज्यकारभाराची भाषा त्यावेळी फारसी होती. व्यवहाराच्या भाषेवरही फारसीचे वर्चस्व होते. शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहारकोश' करवून घेतला. त्यामुळे प्रशासनात मराठी भाषेचा प्रसार झाला.

एकूण प्रशासनाचीच त्यांनी उत्तम व्यवस्था लावून दिली होती. त्यांच्या अष्टप्रधानांची नेमणूक वंशपरंपरेने होत नव्हती करवसुलीपासून सैन्याच्या खर्चापर्यंत सर्व कारभार कारकुनांच्या हातात होता. हा मुलकी सत्तेचा (civil code) पाया होता. फौजेला मनमानी करण्याचा अधिकार नव्हता. प्रजेच्या काडीलाही शिपायांनी धक्का लावू नये अशी त्यांची सक्त ताकीद होती. त्यांची राजनीती 'आज्ञापत्र' या अमात्यलिखित ग्रंथात व्यक्त होते.

शिवाजी महाराजांनी रामदास, तुकाराम या संतांचे आशीर्वाद मिळवले होते. आपल्या प्रजेला अभय देणारा, स्त्रियांची अब्रू सुरक्षित राहीलयाची हमी देणारा असा हा लोककल्याणकारी राजा होता. केवळ मराठ्यांच्याच नाही तर सर्व भारतीयांच्या मनात ते स्वातंत्र्याचे प्रेरणास्थान बनले.

सांस्कृतिक टिपा

१. आदिलशहा -

विजापूरचे बादशहा. युसुफ आदिलखान हा त्यांचा मूळ संस्थापक बादशहा. त्यानंतर इस्मायल आदिलशहा, मल्लू आदिलशहा, इब्राहिम आदिलशहा, सुलतान अली आदिलशहा आणि इब्राहिम आदिलशहा हे

बादशहा झाले. त्यांचा काळ १४८६ ते १६६५ पर्यंत आहे. त्यांची अहमदनगरच्या निजामाशी स्पर्धा होती. मराठा सत्तेचा उदय आदिलशाहीशी संघर्ष करूनच झाला. अखेर त्यांना मोगलांशी लढा द्यावा लागला. शिवाजी राजांचे वडील शहाजीराजे आदिलशहाचे नोकर होते.

२. आज्ञापत्र -

शिवाजी महाराजांच्या राजनीतीवरील सूत्रग्रंथ असे याचे वर्णन करतात. हा ग्रंथ रामचंद्रपंत अमात्यांनी सन १७१५ - १६ या काळात लिहिला. ग्रंथात ६ प्रकरणे आहेत. ३ ते ६ प्रकरणांमधे राजा, प्रधान, वतनदार, साहूकार म्हणजे व्यापारी, गडकोटांचा बंदोबस्त, आरमार इ. विषयी लेखन आहे. सूक्ष्म तपशील, तर्कशुद्धता, व्यापक अनुभव यामुळे महाराजांच्या राजनीतीचे सार या ग्रंथात सापडते.

३. राज्यव्यवहारकोश -

रघुनाथ नारायण हणमंते हे राजांचे चंदीचंदावर येथील कारभारी होते. ते विद्वान होते. त्यांच्याकडून शिवाजी राजांनी 'राज्यव्यवहारकोश' तयार करून उर्दू - फारशी शब्दांऐवजी मराठी, संस्कृत शब्दांची योजना केली. या ग्रंथाचा रचनाकाल १७ व्या शतकाचा पूर्वार्ध आहे.

४. बाजीप्रभू देशपांडे (मृत्यू १६६०)

बाजी हा मावळच्या देशकुलकर्ण्याचा मुलगा. त्यांच्याकडे बांदल देशमुखी होती. दांडपट्टा चालवण्यात ते प्रख्यात होते. त्यांच्या हाताखाली १०,००० बांदल सैन्य होते. फाजलखान आणि सिद्दी जोहरने पन्हाळा किल्ल्याला वेढा घातला त्यावेळी गडावर अडकून पडलेल्या शिवाजी राजांना रात्रीच्या अंधारात ते विशाळगडाकडे घेऊन गेले. वाटेत घोडखिंडीत पाठलाग

करणाऱ्या सैन्याशी लढत त्यांनी प्राण दिले. (१३ जुलै १६६०) त्यांच्या बलिदानामुळे त्या खिंडीला पावनखिंड हे नाव पडले.

५. तानाजी मालुसरे (मृत्यू ४-२-१६७०)

हे शिवाजी राजांचे बालमित्र होते. मूळ गाव उमराठे. बारा हजार पायदळाचे ते सुभेदार होते. कोंढाणा किल्ला जिंकण्यासाठी कड्याला घोरपड लावून ते गडावर गेले. किल्लेदार उदयभानूपण शूर होता. लढाईत एक हात मोडला असताही त्यांनी उदयभानूला मारले. त्यांच्या मृत्यूनंतर 'गड आला पण सिंह गेला' असे उद्‌गार राजांनी काढले. तेव्हापासून कोंढाण्याला सिंहगड म्हणतात.

६. प्रतापराव गुजर (मृत्यू २४ फेब्रु. १६७४)

मूळनाव कडतोजी - पराक्रमी म्हणून पुढे त्यांना प्रतापराव नाव पडले. ते शिवाजी राजांचे सरनोबत होते. विजापूरच्या बहलोलखानाला त्यांनी लढाईत पराभूत केले होते पण सोडून दिले. त्यामुळे राजांनी त्यांना दोष दिला. नवी मदत घेऊन येणाऱ्या खानाच्या सैन्यावर ते फक्त सहा सैनिक घेऊन तुटून पडले. त्यांच्या या आत्माहुतीवर कवी कुसुमाग्रजांची 'वेडात मराठे वीर दौडले सात' ही कविता प्रसिद्ध आहे.

७. मुरारबाजी (मृत्यू १६६५)

मुरारबाजी देशपांडे. पुरंदरचे किल्लेदार. मिर्झा राजे जयसिंहांच्या आज्ञेवरुन दिलेरखानाने पुरंदरवर तोफखान्यासह मोठा हल्ला केला. त्या लढाईत अतुलनीय शौर्य गाजवून वीरमरण मिळाले. त्यांचे शौर्य पाहून खानाने त्यांना वतन देऊ केले पण बाजींनी ते धुडकावले.

शब्दार्थ -

स्थिरावणे	-	स्थिर होणे, settle
वतनदार	-	वंशपरंपरेने जमिनीचा वसूल घेणारे. त्याचा काही भाग ते बादशाहीला देत. आपल्या बंदिस्त गढीत ते सैन्य ठेवत. त्या त्या भागाचे राजेच बनत.
गांजून	-	त्रासून, वैतागून
एतद्देशीय	-	या देशातले, इथले - Native
नेमणूक	-	एक अर्थ appointment. देवळाला किंवा धार्मिक ठिकाणाला खर्चासाठी जमीन किंवा वर्षाला ठराविक रक्कम नेमून देणे.
सुपूर्द करणे	-	ताब्यात देणे, हवाली करणे
नाकेबंदी	-	संचारावर नियंत्रण, पहारा
वर्चस्व	-	domination
हमी	-	खात्री. assurence

स्वाध्याय

धड्यावरचे प्रश्न -

१) १. शिवाजी राजांची कौटुंबिक पार्श्वभूमी काय होती ?

२. शिवाजीच्या राज्यकारभाराचे शिक्षण कसे झाले ?

३. शिवाजीचे राज्य हे स्वराज्य का मानले जाते ?

४. शिवाजीची परधर्मसहिष्णुता कशावरून स्पष्ट होते ?

५. आरमार उभारणीमागे शिवाजीचा काय हेतू होता ?

६. शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात कोणत्या सुधारणा केल्या ?

टिपा लिहा -

वीरनायक शिवाजी

राज्यव्यवहारकोश

आज्ञापत्र

वतनदारी

गाळलेल्या जागी धड्यातले योग्य शब्द भरा.

१. स्वतंत्र राज्यस्थापनेच्या अनेक __________ प्रयत्नांनंतर ते बंगरूळला __________ होते.

२. __________ आणि पुण्याजवळचा __________ __________ हा प्रांत ही त्यांची __________ होती.

३. शिवाजीने इथे प्रथम गावे __________ जमीन __________ खाली आणली.

४. __________ __________ आठव्या वर्षी त्यांनी हातपाय तोडण्याची कठोर शिक्षा केली होती.

५. शेतकऱ्यांना __________ त्रास होऊ नये म्हणून कडक नियम केले आणि __________ मोडून काढली.

६. त्यांनी __________ समोर __________ ची शपथ घेतली.

७. या वीरनायकाच्या जीवनात अनेक ________ घटना आहेत.

८. याच्याशी टक्कर घेऊन ________ हिंदवी राज्य महाराजांनी स्थापन केले.

९. त्यांनी मशिदींनाही ________ दिल्या होत्या.

१०. त्यांनी शत्रूच्याही स्त्रीची ________ केली नाही.

११. आपल्या युद्धनीतीत ________ नवी ________ केली. त्यामुळे शत्रूची समुद्रात ________ झाली.

१२. भाषेवरही फारसीचे ________ होते.

१३. त्यांच्या अष्टप्रधानांची नेमणूक ________ होत नव्हती.

१४. सर्व कारभार कारकुनांच्या हातात होता. हा ________ चा पाया होता.

१५. हा ________ राजा होता. केवळ मराठ्यांच्याच नाही तर सर्व भारतीयांच्या मनात ते ________ ________ बनले.

भाषाभ्यास

वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

स्थिर होणे, गांजून जाणे, मोडून काढणे, वर येणे, टक्कर घेणे, सुपूर्द करणे, नाकेबंदी करणे, धक्का लावणे, वर्चस्व असणे, बांधून देणे, मनमानी करणे, बंड पुकारणे.

विरुध्द अर्थाचे शब्द लिहा

अपयशी, उध्वस्त, प्रोत्साहन, धाडसी, स्फूर्तिदायक, जेता, अपेक्षित, विटंबना, रचनात्मक.

शब्दांचे अर्थ सांगा.

परतफेड, कर्जवसुली, नाट्यमय, जेता, विटंबना, रचनात्मक, नाकेबंदी, वंशपरंपरा, काही रचना मुलकी.

१. तो स्वतःला तुर्क म्हणवत असे. (लोकांकडून म्हणून घेत असे. किंवा लोक त्याला तुर्क म्हणत असत; असा तो अर्थ आहे. म्हण या धातूचे म्हणव हे प्रयोजक रूप आहे. (causative form) त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहारकोश करवून घेतला. याचा अर्थ स्वतः केला नाही तर रघुनाथपंत हणमंते यांच्याकडून तयार करून घेतला. मराठीत (causative) प्रयोजक रचनेसाठी करून घे, बनवून घे, लिहून घे अशी रचना करण्याची जास्त पध्दत आहे. शिवाय 'व' लावूनही प्रयोजक धातू वनतात. *उदा:* शिकव, समजव, ऐकव, उठव, झोपव, बसव, बनव इ. पाठव, दाखव, धाव, पाव या क्रियापदांच्या शेवटी व असले तरी ती मूळ क्रियापदेच आहेत. वरील सर्व प्रयोजक रूपांची वाक्ये बनवा.

२. स्थिर या क्रियाविशेषणापासून स्थिराव क्रियापद बनले आहे. अशी लांब - लांबव, उंच - उंचाव, खाली - खालाव, दूर - दुराव अशी क्रियापदे बनतात. तुम्ही त्यांचा वाक्यात उपयोग करा.

३. स्फूर्तिदायक, नाट्यमय, प्रेरणास्थान हे सामासिक शब्द आहेत. या पाठातून असे सामासिक शब्द शोधून लिहा.

४. त्रास होऊ नये म्हणून -- -- -- -- ही रचना म्हणजे 'व्हावा' या विध्यर्थी रचनेचे नकारार्थी रूप आहे. सामान्यतः विनंतीवजा सूचना असतात अशा ठिकाणी हे होकारार्थी किंवा नकारार्थी रूप येते. उदा. कचरा पेटीत टाकावा. फाटक येताना जाताना बंद करावे. खिडकी सोडण्यापूर्वी पैसे तपासून पहावे. इ.
नकारार्थी - इथे थुंकू नये. जाहिराती चिकटवू नयेत. धावत्या बसमधे चढू नये. उजवीकडे वळू नये. इ.

१६ मकर संक्रांत

पावसाळा संपून थंडीला सुरुवात होते. दिवस लहान आणि रात्र मोठी होत जाते. मुलांचे ओठ, हातपाय फुटायला लागतात. लोकरीचे स्वेटर, शाली बाहेर निघतात. मोकळ्या जागी शेकोटया पेटायला लागतात. शेतात पीक तयार होऊन कापणीची वाट पहात असतं. स्वच्छ, निरोगी हवेत मुलामाणसांची भूकही वाढायला लागते. अशा गुलाबी थंडीत येतो संक्रांतीचा गोड सण.

मकर संक्रांत म्हणजे पौष महिन्याची संक्रांत. हा दिवस साधारणपणे चौदा जानेवारीला येतो. क्वचित एखाद्यावेळी ही तारीख बदलते. संक्रांतीच्या आदल्या दिवशी 'भोगी' असते. या दिवशी स्त्रिया न्हाऊन सुघडांची पूजा करतात. सुघडं म्हणजे मातीची लहान मडकी. या मडक्यांमध्ये गव्हाच्या लोंब्या गाजरं, उसाचे करवे, पावटयाच्या शेंगा, तीळ आणि गूळ घालून त्यांची पूजा करतात. शेतात तयार झालेल्या नव्या पिकाचा या वस्तूंमधे समावेश असतो. या सुघडांचं सवाष्णीला वाण देतात. भोगीदिवशी बाजरीची तीळ लावलेली भाकरी, लोणी, मुगाच्या डाळीची खिचडी, गाजराची कोशिंबीर, वांग्याचं भरीत आणि लेकुरवाळी भाजी असा खास बेत असतो. लेकुरवाळी भाजी म्हणजे वांगी, ओले पावटे, गाजरं पापडीच्या शेंगा, ओला

हरभरा यांची मिश्र भाजी. भोगीच्या जेवणासाठी अनेक घरात सवाष्णीला किंवा मुंज्या मुलाला बोलवून खिचडीच्या भोजनाने संतुष्ट करतात.

दुसऱ्या दिवशी मकरसंक्रांत. त्या दिवसाचं खास पक्वान्न म्हणजे गुळाची पोळी. या दिवसांतच नवा गूळ बाजारात येतो. कोल्हापूर दर्जेदार गुळासाठी प्रसिध्द आहे. नव्या पिवळ्याधमक गुळाची तीळ घालून पोळी करणे हे सुगरणीचेच काम ! ही पोळी कणीदार तुपाच्या गोळ्याबरोबर खातात. थंडीच्या दिवसांत शरीराला उष्णता मिळवून देणाऱ्या पदार्थांची गरज असते. म्हणून तीळ, कारळे, गूळ, तूप, बाजरी हे पदार्थ सणाच्या निमित्ताने जेवणात समाविष्ट केले आहेत. या दिवशी तिळावर साखरेच्या पाकाने बनवलेला शुभ्र काटेरी हलवा किंवा तिळगुळाची वडी अथवा लाडू घरोघरी बनवतात. बाजारातही हे जिन्नस विकत मिळतात. पण स्वतः बनवलेले नाजूक, शुभ्र आणि केशरी, काटेरी हलव्याचे दाणे दुसऱ्याच्या हातावर ठेवताना सुगरणीला विशेष अभिमान वाटतो. पहाणाराही ती कुसर बघून पसंतीची मान डोलावतो. हलवा तिळावर करतात तसा खसखशीवर, लवंगांवर, भोपळ्याच्या सोललेल्या बियांवरसुध्दा करतात. लहानमोठे सर्वजण हा तिळगूळ एकमेकांना देऊन म्हणतात, "तिळगूळ घ्या, गोड बोला". वर्षभरातली भांडणं, मनातली अढी, अबोला काढून टाकून नव्याने गोड शब्दांची देवाणघेवाण सुरू करण्याचा हा सण आहे. तिळामधला स्नेह आणि गुळातली गोडी दुरावलेली मनं पुन्हा जोडण्याचं काम करते.

लग्नानंतर येणारी पहिली संक्रांत नव्या जोडप्यासाठी विशेष महत्त्वाची असते. नव्या जावयाला सासूसासरे चांदीच्या वाटीतून तिळगूळ देतात. हलवा, रंगीत कागद आणि झीग वापरुन बनवलेला हार आणि गुच्छपण त्याला देतात. नव्या सुनेसाठी सासू काळीभोर साडी घेते. त्या साडीवर पांढऱ्या चांदण्यांची खडी असते.

गोऱ्या गोऱ्या वहिनीची अंधाराची साडी
अंधाराच्या साडीवर चांदण्यांची खडी

हे वर्णन संक्रांतीदिवशीच्या वहिनीचं आहे. तिच्यासाठी हलव्याची बिंदी, बाजुबंद, बांगडया, मंगळसूत्र, हार, कंबरपट्टा असे कितीतरी दागिने बनवतात. काळ्या साडीवर हे पांढरेशुभ दागिने अगदी उठून दिसतात. असे दागिने घालून, हातात हलव्याची परडी देऊन सुनेचा फोटो काढतात. सासरी असं कोडकौतुक झालं की नव्या सुनेलाही आपल्या सासरबद्दल प्रेम वाटतं.

बाळाची पहिली संक्रांतसुध्दा अशीच थाटात साजरी करतात. पांढऱ्या टिकल्या लावलेलं काळं झबलं आणि काळी टोपी बाळाला घालतात. त्यालाही हलव्याचा हार, मुगुट, बाजुबंद घालून नटवतात. बाळाच्या बरोबरीच्या पाच मुलांना बोलवतात. सर्वांना ओवाळून त्यांच्या डोक्यावर चुरमुरे, बत्तासे, बोरं वगैरे ओततात. याला 'बोरन्हाण' असं म्हणतात. बोरन्हाणाच्या निमित्ताने बाळाच्या मित्रांना वाटी, ताटली असं काहीतरी भेट देतात.

संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी किंक्रांत. या दिवशी बायका हळदीकुंकू करतात. शेजारपाजारच्या, ओळखीच्या बायकांना आमंत्रण देतात. संध्याकाळी आलेल्या बायकांना हळदकुंकू, अत्तर लावून तिळगूळ देतात. गहू, गाजरं, उसाचे - तुकडे, पावटयाच्या शेंगा, ओला हरभरा इत्यादींनी त्यांची ओटी भरतात. एखादी छोटी संसारोपयोगी वस्तूपण लुटतात.

ज्यांना किंक्रांतीला हळदीकुंकू करणे शक्य नसेल त्यांना ते पुढे रथसप्तमीपर्यंत करता येते. तशी या सणाला मुदतवाढीची सोय आहे.

रथसप्तमी ही या सणाची समाप्ती. या दिवशी उगाळलेल्या चंदनाने पाटावर सूर्याचा रथ काढून त्याची पूजा करतात. अंगणात गोवऱ्या पेटवून त्यावर एका छोट्या बोळक्यात दूध आणि तांदळाचे चार दाणे शिजवून ते उतू जाऊ देतात. सूर्यदेवतेला हा नैवेद्य दाखवल्यामुळे घरात समृद्धी येते अशी कल्पना आहे.

धुंधुरमास हा देखील या सणाचा एक भाग आहे. या दिवसांत रात्र मोठी असते. सकाळी सकाळी थंडीत भूक चांगली लागते. सूर्योदयाबरोबर गरम गरम खिचडी, तूप, बाजरीची भाकरी आणि लोणी, तिळाची चटणी असा बेत करून सर्व कुटुंब लौकर जेवतं. त्यालाच धुंधुरमास म्हणतात धुंधुरमासासाठी आप्तेष्टांनाही बोलवतात. एकूणच तिळाचे स्नान, तिळाचे दान आणि तिळाचे भक्षण असं या संक्रांतीच्या सणाचं वैशिष्ट्य आहे. ऋतुमानाप्रमाणे बदलणारी हवा आणि आरोग्याला पोषक ठरणारा आहार यांचा सुंदर मेळ या सणामधे घातलेला दिसतो.

सांस्कृतिक टिपा

१. वाण

संस्कृतमधे 'सौभाग्यवायन' हा शब्द आहे. सुवासिनीला सौभाग्यचिन्ह मानलेल्या वस्तू काही मंगलप्रसंगी देतात. त्या वस्तूंना 'वाण' असे म्हणतात. मंगळागौरीच्या उद्यापनात मुलगी आपल्या आईला वाण देते. त्यात एका कलशात सोन्याच्या नागाची प्रतिमा घालून देतात. त्या गोष्टीला कहाणीचा संदर्भ आहे. संक्रांतीच्या वाणासाठी पूजा केलेली पाच सुघडं पाच सुवासिनींना देतात. हे संक्रांतीचं वाण. 'सतीचं वाण' हा शब्द याच संदर्भातला आहे.

२. हळदीकुंकू

महाराष्ट्रात हळदीकुंकू लावण्याला फार महत्त्व आहे. घरी आलेली कोणतीही सुवासिनी स्त्री निरोप घ्यायला लागली की तिला कुंकू लावून साखर देतात. कोणाला आमंत्रण देताना कुंकू लावतात. हळदीकुंकवाचा समारंभ वर्षभरात निरनिराळ्या वेळी असतो. चैत्रातल्या हळदीकुंकवाला आंब्याची डाळ, पन्हं देऊन भिजलेल्या हरभऱ्यांनी ओटी भरतात. श्रावण शुक्रवारी मसाल्याचं दूध आणि फुटाणे देतात. गौरीगणपतीत साखरखोबरं देतात. संक्रांतीला तिळगूळ, लुटलेली वस्तू आणि गव्हाची ओटी असा थोडा फरक असतो. हळदीकुंकवात सुवासिनींनाच फक्त महत्त्व असते. एका दृष्टीने हा स्त्रियांचा मेळावा असतो.

शब्दार्थ

शेकोटी	-	उघड्यावर हातपाय शेकण्यासाठी पेटवलेला जाळ
लोंब्या	-	भात, गहू या दोन पिकांच्या कणसांसाठी हा शब्द वापरतात
करवे	-	उसाचे तुकडे
पक्वान्न	-	फक्त जेवणात येणारा गोड पदार्थ
कुसर	-	नक्षी, कलाकौशल्य
अढी	-	एखाद्या व्यक्तीबद्दल, गोष्टीबद्दल मनात राहिलेला राग
जोडपं	-	पतिपत्नीची जोडी
बोळकं	-	खेळातलं छोटं मडकं

गोवऱ्या - शेणाच्या सुकवलेल्या थापटया
परडी - फुलांची टोपली

धड्यावरचे प्रश्न -

१. थंडीमुळे निसर्गात आणि माणसांमध्ये कोणते बदल झालेले दिसतात ?
२. महाराष्ट्रात संक्रांतीच्या आधीचा दिवस कसा साजरा करतात ?
३. संक्रांतीच्या सणाचं वैशिष्ट्य काय आहे ?
४. संक्रांतीचा सण महाराष्ट्रात कसा साजरा करतात ?
५. नववधूची संक्रांत कशी असते ?
६. बोरन्हाण म्हणजे काय ?
७. संक्रांतीच्या हळदीकुंकवाचं वर्णन करा.
८. रथसप्तमीचं काय महत्त्व आहे ?
९. धुंधुरमासामागे कोणतं तत्त्व आहे ?
१०. संक्रांतीच्या सणात तिळाला महत्त्व का आहे ?

टिपा लिहा

१. 'तिळगूळ घ्या गोड बोला'
२. नव्या वहिनीची संक्रांत
३. सणाचा आहार आणि आरोग्य यांचा संबंध

४. बोरन्हाण
५. वाण आणि वस्तू लुटणे

जोड्या जुळवा

१. सुघड	१. काळी साडी
२. शेकोटी	२. नवा जावई
३. लेकुरवाळी भाजी	३. सकाळचं जेवण
४. कोल्हापूर	४. मुलाची पहिली संक्रांत
५. हलवा	५. लहान मडकी
६. नववधू	६. सूर्याची पूजा
७. बोरन्हाण	७. पांढरे काटेरी दाणे
८. रथसप्तमी	८. वांगी, गाजरं, पावटे इ.
९. धुंधुरमास	९. गूळ
१०. चांदीची वाटी आणि हलवा	१०. उघड्यावर पेटवलेला जाळ

भाषाभ्यास -

वाकप्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.
गुलाबी थंडी, वाण देणे, अभिमान वाटणे, मान डोलावणे, देवाणघेवाण, उठून दिसणे,
कोडकौतुक करणे/होणे, साजरा करणे, च्या निमित्ताने, ओटी भरणे,

जोडशब्द पूर्ण करा -

मुलं__________ लहान__________

देवाण__________ शेजार__________

हळदी__________

मूळ शब्द सांगा -

शेकोटी, लेकुरवाळी, दर्जेदार, कणीदार,
सुगरण, काटेरी

दुरावलेली, पावसाळा, अबोला, संसारोपयोगी.

विरुध्दार्थी शब्द सांगा -

शुभ, पसंती, पोषक, ओला, सवाष्ण,

संतुष्ट, थाटात, ओळखीच्या, समृद्धी

१. सकाळी सकाळी, गरम गरम ही शब्दाची पुनरावृत्ती अर्थ अधिक स्पष्ट करण्यासाठी वापरतात. पण सर्वच शब्दांची अशी आवृत्ती वापरली जात नाही. ज्यांची आवृत्ती अर्थपूर्ण होते असे शब्द वापरून ५ वाक्यं बनवा.

२. होत जाते, व्हायला लागते, होत असतं, होत रहातं या सर्व रचना एक विशिष्ट अर्थ व्यक्त करतात. पाठातल्या थंडीच्या वर्णनाप्रमाणे तुम्ही उन्हाळा आणि पावसाळ्याचं वर्णन करा.

स्वाध्याय

१. तुमच्याकडे मकरसंक्रांत कशी साजरी करतात ?

२. नव्या पिकाचा कोणता उत्सव तुमच्याकडे असतो ?

३. मुलाचे पहिल्या वर्षातले सण कसे साजरे करतात त्याची माहिती मिळवून एक टिपण तयार करा.

४. नवदंपतीचे बारा सण कसे साजरे करतात त्याची माहिती मिळवा.

५. प्रत्येक सणाला विशिष्ट पक्वान्न करण्याची पद्धत महाराष्ट्रात आहे. त्याचा आरोग्याशीही संबंध आहे. यासंबंधीची माहिती मिळवून तुमच्या सणांशी तिची तुलना करा.

१७ घरभरणी

"घर पहावं बांधून आणि लग्न पहावं करून" असं म्हणतात, याचा अनुभव शंकररावांना चांगला आला. सदाशिवपेठेतल्या एका वाड्यात त्यांचं बिऱ्हाड आज तीसचाळीस वर्षं तरी होतं. पण शंकररावांच्या आईची फार इच्छा होती की, आपलं म्हणून हक्काचं घर असावं. अंगणात तुळशीवृंदावन असावं. वडलांनापण थोडी बागकामाची हौस होती. पण वाड्यात त्यांना आपली हौस मारावी लागत होती. घरमालकांच्या त्रासाला शंकररावांच्या पत्नी गिरिजाबाईही कंटाळल्या होत्या. अखेर गावापासून थोडा दूर त्यांना स्वस्तात एक प्लॉट मिळाला. गावाकडची थोडीफार जमीन विकून, आणि थोडं फार कर्ज काढून शंकररावांनी घरबांधणीची जुळवाजुळव केली. नाना अडचणींना तोंड देता देता अखेर त्यांची बंगली 'आशीर्वाद' नावाने पूर्ण झाली. आपल्या मुलाने स्वतःची वास्तू बांधली याचा विशेष आनंद आप्पांना म्हणजे त्यांच्या वडलांना झाला. कारण प्रत्येक पिढीत आपली वास्तू उभी करणारा पराक्रमी पुरुष असतोच असं नाही. गृहस्थाश्रमात म्हणूनच हा मोठा पराक्रम मानला जातो.

बांधकाम पूर्ण होत आलं तसे आईआप्पांना घरभरणीचे वेध लागले. सर्वांच्या सोयीसाठी आठ मे हा गुरुवारचा मुहूर्त धरला आणि तशी सर्वांना आग्रहाची पत्रं गेली. घरचे, बाहेरचे मिळून दोनशे पान तरी होईल या

अंदाजाने आचारी, वाढपे ठरवून झाले. मुख्य वास्तुशांतीचे सर्व धार्मिक विधी करण्यासाठी गणेशशास्त्र्यांना सांगून ठेवलं होतं. त्यांनी पूजेच्या साहित्याची भली मोठी यादी दिली होती. काही राहू नये म्हणून शंकरराव अनुभवी माणसांना भेटून विचारून येत होते. एकेक वस्तू आठवणीने बंगल्यासाठी बाजूला ठेवत होते.

गिरिजाबाईचा आनंद मनात मावत नव्हता. आतापर्यंत भाडेकरू म्हणून सर्वांनी हिणवले होते. आतामात्र शेजारणी त्यांना 'काय मालकीणबाई' अशी हाक मारत होत्या. नव्या बंगल्यात गेल्यावर सभोवतीची मोकळी जागा, मोकळी हवा, नव्या बांधकामाचा आणि रंगाचा वास, स्वैपाकघरातला संगमरवरी ओटा या सगळ्या गोष्टींमुळे कधी एकदा रहायला जाऊ असं त्यांना झालं होतं.

शेवटी घरभरणीचा दिवस उद्यावर आला. शंकररावांचे मामामामी, आत्या, दोन भाऊ, बहीण आणि मेहुणे दोन दिवस आधीच आले. गिरिजाबाईंची मावशी, मावसभाऊ आणि भावजयपण अगत्याने आले. गुरुवारी सकाळी बंगल्यापुढे सडारांगोळी घातली. दारांना केळीचे खुंट बांधले. आंब्याच्या आणि अशोकाच्या पानांची तोरणं आणि फुलांच्या माळांनी दार सजलं. घरात सनईचे मंगल सूर प्रसन्नता वाढवत होते. संध्याकाळी रोषणाई करण्यासाठी सगळीकडे दिव्यांच्या माळा लावल्या होत्या.

सकाळी बरोबर आठ वाजता गणेशशास्त्री आले. त्यांच्याबरोबर आणखी चार ब्राह्मणपण होते. मुकटा नेसून शंकरराव तयार झाले. गिरिजाबाईंनी शालू नेसून नथ घातली होती. आईवडलांना आणि इतर वडीलधाऱ्यांना नमस्कार करून दोघंही पूजेला बसली. गणेशपूजन, उदकशांत

वगैरे सर्व विधी शास्त्रीबुवांनी अगदी यथासांग केले. देवघराजवळ वास्तुपुरुषासाठी ठेवलेल्या जागेत नवरत्नं पुरून तिच्यावर फरशी बसवली. आता घरात प्रत्येक कार्याच्यावेळी वास्तुपुरुषाची पूजा होणार होती. घरातल्या प्रत्येक खोलीच्या भिंतीवर गृहस्वामिनीच्या हातांचे हळदीकुंकवाचे ठसे उमटवले होते. डोक्यावर कलश घेऊन दोघांनी घराभोवती फेरी मारून गृहप्रवेश केला. सर्व ठिकाणी त्यांची मुलगी मुग्धा आईची पाठ धरून होती. होमहवन, पोथीवगैरे संपेपर्यंत अकरा वाजले. नव्या घरात चूल पेटवण्याची सुरुवात पुरोहितांनीच करून दिली. वास्तूत रहाणाऱ्या सर्वांच्या मांगल्यासाठी, कल्याणासाठी हे सर्व विधी केले जातात.

मग सर्व नातेवाइकांनी आहेर केले. जवळच्या नातेवाइकांनी गिरिजाबाईंना साडीचोळी आणि शंकररावांना कपडे किंवा घसघशीत रक्कम दिली. काहींनी नव्या घरात शोभेल अशी वस्तू दिली. शंकररावांनी पण सर्वांना परत आहेर केले. गिरीजाबाईंनी सर्व बायकांना स्टीलचे मोठे डबे दिले.

दुपारी जेवणाच्या पंगतीत मोजकी म्हणता म्हणता अडीचशे माणसं झाली. उन्हाळ्याचे दिवस म्हणून आम्रखंडाचा बेत होता. संध्याकाळी काही परिचितांना पानसुपारीला बोलावलं होतं. त्यांच्यासाठी आम्रखंड, पुऱ्या, पुलाव, वडे वगैरे फराळाचा बेत होता. सगळ्यांचं तोंड गोड करायला रंगीत कागदात गुंडाळलेले खास केशरी पेढे आणले होते. पन्हयाचे पेल्यावर पेले दिवसभर रिकामे होत होते. येणारे सर्वजण सुंदर बंगल्याचं कौतुक करत होते आणि असा बंगला बांधल्याबद्दल शंकररावांचं अभिनंदनही.

अजून सगळं सामान हलवलं नव्हतं म्हणून रात्री इतर माणसं जुन्या घरी परतली. पण वास्तुशांतीच्या रात्री घरमालकाने नव्या वास्तूत झोपायचं

असं आप्पांनी सांगितलं म्हणून शंकरराव तिथेच झोपले. बऱ्याच वर्षांनी अतिशय समाधानानी आणि प्रसन्न मनानी ते झोपी गेले. त्यांच्या आयुष्यातला हा अविस्मरणीय दिवस होता.

शब्दार्थ

वाडा	-	अनेक खोल्या आणि चौक असलेली मोठी इमारत. मुळात ते एका माणसाचं निवासस्थान असतं. पण पुढे त्याचे वंशज एकेका कुटुंबाला भाड्यानी रहायला जागा देतात. अशी अनेक भाडेकरू कुटुंब वाड्यात रहातात. त्यांना बिऱ्हाडं म्हणतात.
जुळवाजुळव	-	व्यवस्था, तजवीज
वेध	-	पुढच्या कल्पना
पान	-	जेवणाऱ्यांची संख्या ताटांवरुन ठरवणे - त्या संदर्भातला उल्लेख
हिणवणे	-	हीन, कमी मानणे
अगत्य	-	मनापासून वाटणारा आपलेपणा
मुकटा	-	पूजा किंवा काही धार्मिक विधीच्यावेळी पावित्र्यासाठी रेशमी वस्त्र नेसतात. या वस्त्राला सोवळं, मुकटा, कद अशी नावे आहेत.
यथासांग	-	जसे हवे तसे, परिपूर्ण

धड्यावरचे प्रश्न -

१) स्वतःचं घर बांधलंच पाहिजे असं शंकररावांना का वाटलं ?

२) घर बांधण्याला इतकं महत्त्व का आहे ?

३) घरभरणीसाठी काय तयारी करावी लागते ?

४) नव्या घरात कधी एकदा रहायला जाऊ असं गिरिजाबाईंना का वाटत होतं ?

५) घराची शोभा कोणत्या गोष्टींनी वाढवली होती ?

६) घरभरणीत कोणते धार्मिक विधी करतात ?

७) शंकररावांनी नव्या घराची मेजवानी कशी दिली ?

टिपा लिहा.

१) 'घर पहावं बांधून आणि लग्न पहावं करून'

२) हक्काच्या घराचं सुख

३) आहेर

४) पानसुपारी समारंभ

अनेक शब्दांना एक शब्द द्या.

१) रहाण्यासाठी भाडं देऊन जागा घेणारं कुटुंब ________

२) तुळशीभोवती बांधलेला कठडा ________

३) घर, संस्था इ. साठी बांधलेली इमारत ________

४) नव्या घरात रहाण्यापूर्वी करायचा समारंभ ________

५) पैसे घेऊन स्वैपाक करणारे लोक ________

६) वाढण्याचं काम पैसे घेऊन करणारे लोक ______

७) बहिणीचा नवरा किंवा बायकोचा भाऊ ______

८) अंगण झाडून, पाणी शिंपडून, रांगोळी घालणे ______

९) आंब्याच्या किंवा अशोकाच्या पानांची आणि फुलांची दारावर बांधलेली माळ ______

१०) पूजेसाठी नेसायचं रेशमी वस्त्र ______

भाषाभ्यास ---

वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अनुभव येणे, हौस मारणे, जुळवाजुळव करणे, तोंड देणे, वेध लागणे, आनंद मनात न मावणे,

ठसा उमटवणे, पाठ धरणे, घसघशीत रक्कम, तोंड गोड करणे, कौतुक करणे, अभिनंदन करणे.

जोडशब्द पूर्ण करा.

थोडा ______ , सडा ______ , वडील ______ ,

होम ______ , साडी ______ , पान ______ .

विरुद्धार्थी शब्द द्या.

अविस्मरणीय, समाधान, प्रसन्न, कौतुक, मोजकी, परिचित, कल्याण, अगत्य, अनुभवी, सोय.

१) त्यांना हौस मारावी लागत होती. धातूला आवा प्रत्यय जोडून ही रचना होते. सकर्मक धातूत कर्माच्या लिंगवचनाप्रमाणे 'आवा' चे रूप येते. अकर्मक धातूत नपु. ए. वचनी बनते. मनाविरुद्ध सक्तीने एखादी गोष्ट करतेवेळी ही रचना वापरतात. कर्त्याला 'ला' प्रत्यय अवश्य लागतो. अशी तुम्ही पाच वाक्यं बनवा.

२) देत देत आणि देता देता यामधला फरक समजावून घ्या.

३) 'असतोच असं नाही.' सरळ 'नसतो' असं नकारार्थी रूप न वापरता केलेली नकारार्थी रचना. अशी पाच वाक्यं बनवा.

४) सांगून ठेव, करून ठेव - या रचनेतून पूर्ण क्रिया व्यक्त होते. असे रूप करून मग कोणत्याही काळात वाक्य बनवता येते.

५) करावं, रहावं, या विध्यर्थी रूपाची नकारार्थी रचना करू नये, राहू नये अशी होते. दोन्ही प्रकारात कर्त्याला 'नी' प्रत्यय लागतो.

६) पेल्यावर पेले - अनेक पेले. एकामागून एक असा अर्थ.

स्वाध्याय -

१) तुमच्याकडे नवीन घरात रहायला जाण्याचा कोणता कार्यक्रम करतात ?

२) तुम्ही मित्राच्या वास्तुशांतीला (घरभरणीला) गेलात अशी कल्पना करून संभाषण लिहा.

३) घरभरणीला आहेर काय करावा यासंबंधी बहिणीशी चर्चा करणारा संवाद लिहा.

४) 'घर पहावं बांधून ....' या म्हणीत सांगितल्याप्रमाणे काही अडचणी तुमच्या अनुभवात आहेत का? असल्यास त्यांचे वर्णन करा.

५) घरमालक आणि जागा पहायला आलेला माणूस यांच्यातला संवाद लिहा.

६) घरांना दिलेल्या नावांविषयी निरीक्षण करुन एक टिपण तयार करा.

१८ लग्न

कल्याणी पहिल्या वर्गात बी. कॉम. पास झाली. तिनी पुढे मॅनेजमेंट कोर्ससाठी नाव घातलं. पण तिच्या आईनी "आता हळू हळू स्थळं पहायला लागा" असं तिच्या वडलांना सांगितलं. कल्याणी माझी चुलत बहीण आहे. काकांनी तिला विचारलं, "नवऱ्याबददल तुझ्या काही अपेक्षा आहेत का ? तू मोकळेपणानी सांग." ती म्हणाली, "तुम्ही जो मुलगा ठरवाल तो मला पसंत असेल. तुम्ही माझ्या हिताचाच विचार करणार, मग मी वेगळं काय सांगणार ?" तिचं उत्तर ऐकून काका कामाला लागले. तिचा एक चांगलासा फोटो काढून घेतला. नात्याच्या आणि ओळखीच्या माणसांकडून जिथे चांगला मुलगा लग्नाचा आहे असं कळलं तिथे फोटो आणि पत्रिका पाठवून दिली. कल्याणीच्या पत्रिकेत थोडासा मंगळ होता म्हणून पत्रिका जुळल्याशिवाय पुढे ठरवायचं नाही असं काकूचं मत होतं.

शोधता शोधता बेळगावच्या एके ठिकाणी पत्रिका जुळली. मुलगा कॉम्प्युटर इंजिनीयर होता. गावात बंगला होता. थोडीफार बागाईत जमीन होती. मुलाच्या मोठ्या बहिणीचं लग्न झालं होतं. नाव ठेवायला कुठेच जागा नव्हती. मुलगी पहायला येतो असा दिनेशच्या म्हणजे मुलाच्या वडलांचा निरोप आला. आजकाल हा 'पहाण्याचा' समारंभ मुलामुलींना आवडत नाही. पण कुठेतरी गाठभेट व्हायला हवी म्हणून काकांच्या मित्राच्या घरी

हा कार्यक्रम पार पडला. कल्याणी तशी शंभरात उठून दिसणारी मुलगी. मुलीला घरचं वळणही उत्तम आहे, असं काकांनी सांगितलं. मुलगी पसंत पडली आणि लग्नाची बैठक घ्यायचा विषय निघाला. दिनेशच्या आईनी सांगितलं, "हुंडा मानपान याच्या याद्या करायच्या असतील तर बैठकीची गरज नाही. आम्ही आमच्या बाजूचा खर्च करू. तुम्ही तुमच्या बाजूचा करा. बाकी हौसमौज ज्यांना जशी हवी तशी ते करतील. आम्हाला माणसं जोडायची आहेत, पैशाच्या राशी नाही."

दोन्ही पक्षांच्या विचारानी लग्न मुलीच्या गावात करायचं ठरलं. तीन आठवड्यांनंतरचा मुहूर्त ठरला. लग्न नोंदणीपद्धतीनी की वैदिक पद्धतीनी वगैरेवर थोडीफार चर्चा झाली. काकूच्या नात्यात एका मुलाने परजातीच्या मुलीशी नोंदणी पद्धतीनी लग्न केलं होतं, म्हणून तिला नोंदणी पद्धत नको होती. शिवाय एकुलती एक मुलगी म्हणून मांडवात विधिपूर्वक लग्न करून द्यायची तिला फार हौस होती.

साखरपुडा झाला आणि लग्नाच्या तयारीची एकच घाई उडाली. कल्याणीचे मामामामी, दोन मावश्या आणि आम्ही चुलत बहिणी पंधरा दिवस आधीच आलो. काकांच्या मदतीला त्यांचे भाऊ, पुतण्ये आले. पुरुषांनी कार्यालय सर्वात आधी ठरवून टाकलं. आचाऱ्यापासून वाजंत्र्यापर्यंत सर्व सोयी कार्यालयात होत्या. पत्रिका छापून आणून पत्रं आणि पत्रिका पोस्टात पडल्यासुध्दा ! जावयाच्या सुटापासून देण्याघेण्याच्या साड्यांपर्यंत सर्व खरेदी धूमधडाक्यात सुरू होती. बायकांनी रुखवत, फराळाचे जिन्नस, हळद, गव्हले, पापडकुरड्या अशी आपली आघाडी उघडली. त्यातच नवऱ्यामुलीला आईवडलांसह सकाळसंध्याकाळ केळवणाची आमंत्रणं होती. चांगला दिवस पाहून देवाला अक्षत देऊन गावात पण अक्षत देऊन झाली.

बोल बोल म्हणता लग्न उद्यावर आलं. घर मुलामाणसांनी भरून गेलं. संध्याकाळी सगळे कार्यालयात जमले. तेच वरपक्षाचं जानोसघर. रात्री सीमांतपूजन झालं. दोन्ही पक्षाच्या लोकांची यावेळी ओळख होते. रात्री सुधारसाचं जेवण झालं.

भल्यापहाटे उठून हळदी, घाणा, आंघोळी झाल्यावर दोन्हीकडे देवक बसलं. अजून फक्त नातेवाईकच होते. तरीही ठेवणीतले कपडे, दागिने घालून मिरवणाऱ्या बायका, धावपळ करणारे पुरुष, दंगा करणारी मुलं, अत्तराचा आणि फुलांचा वास, सनई चौघड्याचे सूर या साऱ्यांनी लग्नाचा मांडव जिवंत झाला होता. नवरी गौरीहराची पूजा करत होती. ६.४५ चा मुहूर्त होता. गुरुजींची बोहल्यावर सर्व तयारी सुरू होती. सजवलेल्या मोटारीतून नवरामुलगा देवदर्शन करुन आला. आता मांडव गच्च भरला होता. मुलगा पाटावर उभा रहाताच अंतरपाट धरून गुरुजी ओरडले, 'मुलीला आणा'. मामांनी घेतलेली पिवळी अष्टपुत्री नेसून, दागिने घालून, मुंडावळ्या बांधलेली वधू तयार होती. मामा मुलीला घेऊन आले. मंगलाष्टके म्हणून होताच ऐन मुहूर्तावर 'वाजवा रे वाजवा' झालं. बँडच्या, टाळ्यांच्या आवाजात वधूवरांनी एकमेकांच्या गळ्यात माळ घातली.

थोडावेळ आहेर, फोटोची गर्दी झाली. मग गुरुजींनी सप्तपदी, लाजाहोम इ. सर्व विधी करून घेतले. याचवेळी वराने वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधलं. आणि एकमेकांच्या हातात दोघांनी लग्नकंकणही बांधलं. कन्यादानाच्या वेळी मुलीच्या आईच्या डोळ्यात पाणी जमलं होतं. कानपिळीसाठी छोट्या भावाने नव्या मेहुण्यांचा कान पकडला तेव्हामात्र सगळेच हसले. इकडे मांडलेल्या रुखवताची बायका बारकाईने पाहणी करत होत्या.

अकरा वाजल्यापासून पंगतींना सुरुवात झाली. गुलाबजाम आणि पुणेरी अळूच्या भाजीवर बेळगावकर खूष झाले. पंगतीत फिरून काकाकाकू सर्वांना "सावकाश होऊ द्या" असं सांगत होते. नवरानवरी आग्रहाने प्रत्येकाला गुलाबजाम वाढत होते. पूर्वी बुंदीचे लाडू किंवा जिलबी हेच पक्वान्न असायचे. आता श्रीखंड, आमरस किंवा गुलाबजाम आपल्या आवडीप्रमाणे करतात.

दुसरी पंगत खास नवरानवरीची होती. दिनेशच्या मित्रांनी घास द्यायचा आग्रह केला. नवी नवरी उखाण्यात नाव घ्यायला फारच लाजत होती. पण शेवटी तिनी नाव घेतलं --

भरल्या पंगतीत उदबत्तीचा सुंदर वास
दिनेशरावांना देते पहिला गोड घास.

याच पंगतीत वरमायपण होती. मामींनी त्यांच्यासाठी विहीण म्हटली.

जेवणानंतर दोघी विहिणींनी सर्वांचा मानपान केला आणि ओट्या भरल्या. आता निघायची वेळ झाली. बँडवाल्यांनी 'जा मुली जा' सुरू केलं. हा क्षण सर्वांनाच जड जातो. कालिदासानी म्हटलंच आहे - 'अर्थोऽहि कन्या परकीय एव'. मुलगी सुस्थळी पडली हे समाधान आईवडलांना दिलासा देतं. त्यांच्या पंखाखाली वाढलेल्या साळुंकीच्या नव्या जीवनाला सुरुवात झाली.

सांस्कृतिक टिपा

१. पत्रिका पाहणे -

प्रत्येक व्यक्तीच्या जन्म वेळेप्रमाणे ज्योतिषांनी तयार केलेली कुंडली म्हणजे जन्मपत्रिका. ज्यांचा पत्रिकेवर विश्वास असतो त्यांच्या दृष्टीने लग्नाच्या वेळी पत्रिकेला फार महत्त्व असते. वर आणि वधूच्या पत्रिका एकमेकीशी

जुळण्यासाठी कमीत कमी गुण जमणे आवश्यक असते. छत्तीस गुण जुळले म्हणजे सर्वात उत्तम असं मानतात. मुलाला किंवा मुलीला मंगळ असेल तर दुसरी पत्रिकाही मंगळाची लागते. नाहीतर मंगळामुळे दुसऱ्या व्यक्तीचा अकाली मृत्यू होतो असं समजतात. ज्यांचा विश्वास नाही ते लोक पत्रिकेच्या भानगडीत पडत नाहीत. काहीवेळा मुलीला नकार देण्यासाठी वरपक्षाचे लोक 'पत्रिका जुळत नाही' अशी खोटीच सबब पुढे करतात.

२. साखरपुडा -

लग्न ठरल्याची घोषणा करणारा समारंभ म्हणजे साखरपुडा. जवळच्या लोकांचा एक छोटा समारंभ करतात. काही धार्मिक विधी करून वरपक्षाचे लोक मुलीला साडी देतात. वधूवर एकमेकांच्या बोटात आंगठी घालतात. साखरपुडा म्हणजे अर्धं लग्नच समजतात.

३. रुखवत -

मुलीच्या संसारासाठी उपयोगी अशी भांडीकुंडी आणि इतर वस्तू लग्नात देतात त्याला रुखवत म्हणतात. रुखवत म्हणजे हुंडा नाही. पाच पातेली, हंडा-कळशी, ताटंवाट्या, लामणदिवा, चौरंग, अन्नपूर्णा आणि लंगड्या बाळकृष्णाची मूर्ती अशा वस्तू रुखवतात अवश्य असतात. गुळाची ढेप, पाच प्रकारचे मुरंबे, शेवया आणि खास सजवलेले फराळाचे पदार्थही रुखवतात मांडतात. त्याबरोबर हौस म्हणून भरतकाम केलेल्या चादरी, टेबलक्लॉथ आणि इतर कलापूर्ण वस्तूही मुलीसाठी देतात. रुखवतावरून वरपक्ष वधूपक्षाच्या कौशल्याची, रसिकतेची कल्पना करतो. नाहीतर 'आला आला रुखवत कडाडला हंडा' उघडून बघतात तर अर्धाच मांडा अशी टीका होते.

४. केळवण -

लग्न ठरलेल्या मुलामुलीला किंवा मुंजा मुलाला त्यांचे नातेवाईक किंवा ओळखीचे लोक लग्ना- मुंजी पूर्वी जेवायला बोलवतात. या मेजवानीला केळवण म्हणतात.

५. अक्षत देणे -

याचा अर्थ प्रत्यक्ष आमंत्रण करणे. वर / वधूचे आईवडील किंवा भाऊभावजय जवळच्या लोकांच्या घरी जाऊन आग्रहाचं आमंत्रण देतात. हे आमंत्रण जोडीनी करतात. ज्यांच्या घरी आमंत्रण करतात तिथे घरची बाई ओटी भरते. घाईघाईत निदान चहा, सरबत तरी देतात. हळदकुंकू लावलेल्या अक्षता म्हणजे तांदूळ हातावर ठेवून आमंत्रण देतात. काही लग्नात हौसेने वरमाईला जेवायला बोलावण्यासाठी मोत्यांची अक्षत देतात.

६. जानोसघर - (जनवास घर)

पूर्वी मंगलकार्यालयं नव्हती. लग्न मुलीच्या दारात मांडव घालून होत असे. दुसऱ्या गावातून आलेल्या वरपक्षाला रहायला जवळपासच एखादं घर देत. त्याला जानोसघर म्हणतात. आता मंगलकार्यालयातच बरीच लग्नं होतात.

७. सीमांतपूजन -

साधारणपणे लग्न मुलीच्या दारात होतं. वरपक्षाचे लोक आदल्या दिवशी लग्नासाठी येतात. त्यांचे गावाच्या सीमेवर जाऊन स्वागत करणे आणि सन्मानपूर्वक त्यांना घेऊन येणे यासाठी सीमांतपूजन हा विधी असतो. आता सीमेपर्यंत जात नाहीत. पण आदल्या दिवशी संध्याकाळी हा विधी करतात. काही धार्मिक विधी असतात. वरदक्षिणा म्हणजे हुंडा यावेळीच देतात. दोन्ही पक्षाच्या माणसांचा पुरोहित परिचय करुन देतात. वरमाईचे

पाय धुऊन गुळाची ढेप, चौरंग, हिरवी साडी देतात. एकूणच मुलाच्या आईला लग्नात फार महत्त्व असतं.

८. *विहीण म्हणणे -*

वरमाय म्हणजे मुलाची आई जेवायला बसली की वधूची आई 'विहीण' या प्रकारचं गाणं म्हणते. गाण्यातून "आमची लाडकी मुलगी आता तुमच्या ओटीत घातली आहे, तिचा सांभाळ करा" वगैरे विनंती करते. मुलगी देताना आईच्या मनाची काय स्थिती होते याचं उत्तम वर्णन या विहिणीत असतं. विहिणी लोकगीतांमधेही आहेत. ग. दि. माडगूळकरांची ही रचना फार लोकप्रिय आहे.

शब्दार्थ

स्थळ - लग्नाच्या संदर्भात लग्नाला योग्य असा मुलगा.

वळण - इथे अर्थ वागण्याची पद्धत, रीतभात, घरातलं शिक्षण.

नोंदणी पद्धत - (Registrar) च्या कचेरीत केलेलं लग्न

आचारी - स्वैपाकी,

वाजंत्री - सनई, ताशा, चौघडा इ. वाद्यं

गव्हले - गव्हाच्या पिठापासून बोटाच्या चिमटीत वळून सुकवलेले गव्हाच्या आकाराचे बारीक दाणे, त्यांची खीर कार्यात अवश्य करतात.

कुरड्या - गव्हाच्या चिकापासून शेवयासारखा पदार्थ बनवून सुकवतात. नंतर त्या तळून जेवणात वाढतात.

सुधारस - साखरेच्या पाकात लिंबू पिळून, वेलची घालून सुधारस बनवतात. पुरी चपाती बरोबर खायचा हा साधा गोड पदार्थ आहे.

बोहलं - विवाहवेदी

अष्टपुत्री - वधूनी अक्षता पडताना नेसायची पिवळी साडी. ही साडी मामानी घ्यायची असते.

आहेर - वधूवरांना लग्नप्रसंगी दिलेल्या भेट वस्तू

उखाणा - पूर्वी बायका नवऱ्याचे नाव उच्चारत नव्हत्या. घरातल्या मोठ्या माणसांसमोर नवऱ्याला नावानी हाक मारणे म्हणजे त्यांची अमर्यादा असं समजत. शिवाय नाव घेतलं तर नवऱ्याचं आयुष्य कमी होतं असंही मानत होते. तसंच भारतीय स्त्रियांची स्त्रीसुलभ लज्जा हेही एक कारण महत्त्वाचं. काही खासप्रसंगी नवऱ्याचं नाव घेण्यासाठी प्रासयुक्त रचना करुन त्यामधे बायका कौशल्यानं नवऱ्याचं नाव जोडतात. प्रसंगाला शोभेल असा उखाणा घेण्यात स्त्रीचं चातुर्य दिसतं. तसंच पतिप्रेमाचं ते एक शालीन दर्शन आहे.

धड्यावरचे प्रश्न -

१. आईवडलांनी मुलीचं लग्न करण्याची महाराष्ट्रातली पद्धत कशी आहे ?

२. 'दाखवण्याचा' कार्यक्रम मुलींना का आवडत नाही ?

३. कल्याणीच्या लग्नाची तयारी कशी केली होती ?

४. वधूवरांवर अक्षता टाकण्यापूर्वी कोणते विधी करतात ?

५. मंगलाष्टकं झाल्यावर कोणते विधी असतात ?

६. लग्नाचं जेवण आणि घास देण्याबद्दल तुमच्या शब्दांत लिहा.

७. मुलगी सासरी निघाली की आईवडलांना काय वाटतं ?

टिपा लिहा -

नोंदणी विवाह, आंतरजातीय विवाह, हुंडापद्धती,

मराठी वधूची वेषभूषा, वरमाईचा मानपान

भाषाभ्यास -

१. अनेक शब्दांना एक शब्द द्या.

१. लग्नाला योग्य असा नवरामुलगा ____________

२. जन्मवेळेवरून ग्रहांचे स्थान सांगणारे टिपण ____________

३. मुलांवर केलेले चांगते संस्कार, सवयी ____________

४. लग्न ठरल्याची घोषणा करण्याचा समारंभ ____________

५. नवरामुलगा किंवा मुलगी, मुंजा मुलगा यांना इतरांनी दिलेलं जेवण ____________

६. मुलीच्या संसारासाठी दिलेली भांडीकुंडी आणि वस्तू ____________

७. नवऱ्याकडच्या लोकांना उतरायला दिलेलं घर ____________

८. लग्नाच्या आदल्या रात्री होणारा समारंभ ____________

९. लग्नाचं प्रत्यक्ष जाऊन दिलेलं आमंत्रण ______

१०. नवरीनी लग्न लागताना नेसलेली साडी ______

११. नवरानवरीच्या कपाळावर बांधलेल्या फुलांच्या अथवा मोत्यांच्या माळा ______

१२. लग्न लावताना वधूवरांमधे धरलेला पडदा ______

१३. लग्नाच्या वेळी म्हणायचे श्लोक ______

१४. नवरानवरीच्या मनगटावर पिवळ्या दोऱ्यात बांधलेलं हळकुंड ______

१५. नवऱ्याचं नाव घेण्याचा विशिष्ट प्रकार ______

१६. मुलीच्या आईनी वरमाईला उद्देशून म्हटलेलं गाणं ______

१७. खण नारळ तांदूळ पदरात घालणे ______

१८. सर्व विधी व्यवस्थित करून झालेला समारंभ ______

जोडशब्द पूर्ण करा -

आज ______	गाठ ______	मान ______
हौस ______	पापड ______	मुलं ______
सनई ______		

वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा.

नाव घालणे,	स्थळ पहाणे,	कामाला लागणे,
नाव ठेवायला जागा नसणे,	गाठभेट होणे,	पार पडणे,
पसंत पडणे,	हौस असणे,	धावपळ करणे,
डोळ्यात पाणी जमणे,	पाहणी करणे,	खूष होणे,
आग्रह करणे,	जड जाणे,	दिलासा देणे

स्वाध्याय

१. तुमच्या लग्नपद्धतीची माहिती द्या.

२. तुमच्याकडे लग्नात कोणत्यावेळी गाणी म्हणतात त्याची माहिती द्या.

३. हुंडयाचा किती प्रभाव तुमच्याकडे आहे ?

४. वर्गात हुंड्याच्या दुष्परिणामांवर वक्तृत्वसभा आयोजित करा.

५. आंतरजातीय विवाहाविषयी तुमच्याकडे काय प्रतिक्रिया असते याबद्दल एक टिपण लिहा.

१६ मुलांचे खेळ

श्रीनिवास आणि अमला हे आंध्रप्रदेशातले विद्यार्थी आहेत. स्वराज्यलक्ष्मी या त्यांच्या शिक्षिकेनी त्यांना मराठी भाषा शिकवली. एकदा राष्ट्रीय एकात्मता शिबिरासाठी त्या मुलांना घेऊन साताऱ्याला आल्या. तिथे मराठी कुटुंबात एक दिवस घालवण्यासाठी संजय आणि सुवर्णा ही भावंडं त्यांना आपल्या घरी घेऊन आली. मुलंच ती ! खेळ आणि खेळाबद्दल त्यांनी गप्पा मारणे अगदी स्वाभाविकच होतं ---

सुवर्णा - ये अमला. हे माझं कपाट. हया सगळ्या बाहुल्या माझ्याजवळ अगदी लहानपणासून आहेत. लहानपणी मी बाहुलीशिवाय झोपतच नव्हते.

अमला - आमच्याकडे पण मान डोलवणाऱ्या सुंदर सुंदर बाहुल्या मिळतात.

सुवर्णा - आम्ही दर रविवारी बाहुलाबाहुलीचं लग्न लावत होतो. नवे कपडे, दागिने, मुंडावळ्या, बँडबाजा आणि गोड जेवण ---

संजय - आणि त्या लग्नाला भटजी मी ! म्हणजे नटणार हया सगळ्या मुली आणि मी मात्र पंचा नेसून मंगलाष्टकं म्हणायची. नंतर बँडवाला पण मीच.

सुवर्णा - वा रे वा ! आणि आमच्या भातुकलीतला जास्तीत जास्त खाऊ कोण मटकावत होतं रे ?

श्रीनि - संजय, बातुकली म्हणजे काय ?

संजय - बातुकली नाही, भातुकली. खेळातली चूलबोळकी, पोळपाटलाटणं घेऊन स्वैपाक करायचा आणि जेवायचं ही भातुकली. त्यात सुवर्णा आई होते. मी बाबा होतो आणि लिंबूटिंबूंना आम्ही शाळेत पाठवतो.

श्रीनि - म्हणजे आमचा 'लयकापिडतलु'. पण तू काय फक्त मुलींबरोबर त्यांचेच खेळ खेळतोस का ?

संजय - हुडुत् ! "बायकात पुरुष लांबोडा भाजून खातो कोंबडा" असं चिडवतात त्या. त्यांना कोणी भटजी मिळतच नाही म्हणून --- नाहीतर आमचे मुलामुलांचे कितीतरी खेळ आहेत. खो खो, कबड्डी सूरपाट, लगोरी झालंच तर झाडावर चढायचं, पोहाय-चं,मल्लखांब हे सर्व मला सातव्या वर्षापासून येतं. तुला येतं ?

अमला - तुम्ही कबड्डी खेळता तसं आमच्याकडे 'चेडुगुडु' खेळतात. आमच्याकडे चिंचेची झाडं खूप असतात. मला चिंचेच्या झाडावर चढता येतं. पण मला पाण्याची फार भीती वाटते.

श्रीनि - अरे ही अमला इतक्या चिंचा खाते की तिचं नाव अमला नसून इमलीच ठेवलं पाहिजे. ही कसली पोहते ! मी बघ कितीही उंचावरून सूर मारतो. पण मला मल्लखांब माहीत नाही.

संजय - शाळेत मल्लखांब पुरलेला आहे. त्याच्यावर निरनिराळ्या प्रकारची कसरत करतात. आमच्या शाळेला मल्लखांबाची ढाल मिळाली आहे. मी संध्याकाळी तुला व्यायामशाळेत घेऊन जाईन.

अमला - पण लहानपणी मला 'दागुड्ड मूतलु' म्हणजे लपंडाव सर्वात जास्त आवडत होता.

सुवर्णा - अय्या हो ? मलापण ! घरात आणि शेजारी रोज नव्या नव्या लपायच्या जागा आम्ही शोधून काढत होतो. "रामराई साईसुटटयो" म्हणून व्हायच्या आत मी लपून बसायची. ज्याच्यावर राज्य असायचं तो शोधत फिरायचा. औट झालेले "आवळ्या आवळ्या गुपचुप" म्हणून मला सावध करायचे.

अमला - आणि तुम्ही 'काळ्ळुमूसेआटा' खेळता का ? म्हणजे डोळ्यावर कपडा बांधून पकडायचा खेळ ?

संजय - हो ! आंधळी कोशिंबीर. ही सुवर्णा फार पक्की आहे. डोळे बांधून बोटं विचारली की चुकीची सांगते. पण तिला फटीतून चांगलं दिसत असतं.

श्रीनि - आणखी काय काय खेळ आहे तुझ्याजवळ ?

सुवर्णा - हे गजगे, ठिकरी, दोरीच्या उड्यांची ही दोरी आणि हया काचाकवड्या, बांगड्यांच्या काचांचे मोठे तुकडे जोडून मी साखळदंड पण केले आहेत.

संजय - आणि हया बघ माझ्या गोट्या, हा भोवरा आणि विटीदांडू! थांब हं ! ही दोरी गुंडाळून मी भोवरा फिरवतो. हं आता हात पसर. घे तुझ्या हातावर. बघ कसा फिरतोय !

श्रीनि - विटीदांडू म्हणजे आमचा 'बिल्लाकोडु' मला पण फार आवडतो. कितीदातरी माझी विटी घराच्या कौलांवर जाते.

सुवर्णा - हया संजयच्या विटीमुळेतर ही बघ माझ्या कपाळावर केवढी खोक पडली होती.

संजय - तुला कोणी सांगितलं होतं मधे कडमडायला ?

अमला - अरे भांडू नका असे.

सुवर्णा - चल ग, आपण झिम्मा, फुगडी, कोंबडा, पिंगा हेच खेळ खेळू या. आपल्या खेळात ह्यांची लुडबूड नको.

अमला - तू मला दाखव मग मी पण करून पहाते. तुमच्याकडे खेळाची गाणी आहेत न?

सुवर्णा - हो म्हण - आम्ही दोघी मैत्रिणी जोडीच्या जोडीच्या हातात पाटल्या तोडीच्या तोडीच्या. हे फुगडीचं गाणं आणि झिम्म्याचं गाणं --

झिम पोरी झिम कपाळीचं भिंग
भिंग गेलं फुटून पोरी आल्या उठून
पळता पळता ठेच लागली
आंबा पिकतो रस गळतो
कोकणचा राजा बाई झिम्मा खेळतो.

संजय - अरे, गाणी तर हादग्याची फार छान असतात.

श्रीनी - हादगा म्हणजे काय ?

सुवर्णा - आम्ही हादगा म्हणतो त्याला कोणी भोंडला म्हणतात. हस्त नक्षत्राचे सोळा दिवस हत्तीच्या चित्राची पूजा करतात. रोज एक, दोन याप्रमाणे सोळाव्या दिवशी सोळा गाणी म्हणून हादग्याची

बोळवण करतात. आमच्या आत्याला हादग्याची खूप गाणी येतात.

संजय - मी मात्र खिरापतीची वाट बघत असतो. खिरापत ओळखायला फार मजा येते. आईची खिरापत कोणालाच ओळखत नाही.

आई - चला बघू - आजची खिरापत कोण ओळखतो बघू या. आता खेळ पुष्कळ झाला. पटकन हातपाय धुऊन खायला चला.

(सर्वजण जातात.)

सांस्कृतिक टिपा

१. मल्लखांब -

मल्लखांब हा शारीरिक कसरतीचा एक प्रकार आहे. लहान वयात शरीर लवचिक होण्यासाठी याचा उपयोग करतात. मल्लखांबाचा व्यायाम योगासनांवर आधारित असतो. मऊ मातीमधे तळाशी थोडा जाड आणि वर गोळा असलेला खांब पुरतात. त्यावर एक मुलगा निरनिराळे कसरतीचे प्रकार दाखवतो. एकावेळी अनेक मुलंसुद्धा मल्लखांबावर तोल सांभाळून निरनिराळ्या प्रकारची कसरत करून दाखवतात. मल्लखांब हा प्रेक्षणीय व्यायामप्रकार आहे. खांबाप्रमाणे दोरी आणि वेतावर सुद्धा अशी कसरत करतात. महाराष्ट्रात मल्लखांब फार लोकप्रिय आहे. मुलीसुद्धा मल्लखांबाचा व्यायाम करतात पण मुलींचं प्रमाण फारच कमी असतं.

२. हादगा किंवा भोंडला -

मुलींच्या ह्या खेळाला भुलाबाई असंही नाव आहे. हस्त नक्षत्र शेतकऱ्यांच्या दृष्टीनी फार महत्त्वाचं असतं. 'लागला हस्त आणि शेतकरी

झाला मस्त' असं म्हणतात. या हस्ताच्या पावसाची पूजा करण्यासाठी मुली हादगा खेळतात. हत्तीचं बाजारात मिळणारं विशिष्ट चित्र भिंतीवर लावतात. त्याला फळांची माळ घालतात. याच दिवसात येणाऱ्या हादग्याच्या किंबा आकाशमोगरीच्या फुलांची माळ गुंफून घालतात. सोळा दिवस रोज माळ घालतात. संध्याकाळी मुली पाटावर रांगोळीने हत्तीचे चित्र काढतात. त्याच्या भोवती फेर धरून गाणी म्हणतात. ही सर्व गाणी लोकगीतं आहेत. गाणी संपल्यावर काहीतरी खिरापत [प्रसाद] मुलींना ओळखायला सांगतात. मुलींना ओळखता आलं नाही तर त्या "हरलो" म्हणतात. सोळाव्या दिवशी सोळा गाणी म्हणून फाराळाचे जास्त पदार्थ करून बोळवण करतात. कागद, माळा नदीत सोडतात. याप्रमाणे सोळा वर्षं हादगा करतात.

शब्दार्थ

मुंडावळ्या	-	लग्नात नवरानवरीच्या कपाळावर फुलांच्या किंवा मोत्यांच्या माळा बांधतात त्यांना मुंडावळ्या म्हणतात.
पंचा	-	आखूड, लहान धोतर.
मंगलाष्टकं	-	लग्न लावताना म्हणायचे श्लोक.
मटकावणे	-	खाऊन संपवणे
बोळकं	-	खेळातलं छोटं मडकं
गजगे	-	सागरगोटे - एका शेंगेतल्या गोल गोट्या.
ठिकरी	-	फरशीचा तुकडा
खोक	-	कपाळावर झालेली खोल जखम
जोडीच्या	-	सारख्या

खिरापत - हा प्रसादाचा खाऊ सर्वांना वाटून खातात.

बोळवण - पाठवणे, निरोप देणे, संपवणे याअर्थी

धड्यावरचे प्रश्न

१. आंध्रच्या मुलांचे आणि मराठी मुलांचे कोणते खेळ समान आहेत?

२. बाहुलाबाहुलीच्या लग्नाचं वर्णन करा.

३. भातुकली म्हणजे काय ?

४. अमलाला कोणत्या खेळांची आवड आहे ?

५. केवळ मुलींचेच असे कोणते खेळ आहेत ?

६. हादगा किंवा भोंडला कसा साजरा करतात ?

७. ज्या ज्या खेळांसाठी तेलुगु शब्द आले आहेत त्यांना तुमच्या भाषेत कोणते शब्द आहेत ?

टिपा लिहा

१. महाराष्ट्रातले फक्त मुलींचे खेळ

२. फक्त मुलांचे खेळ

३. हादगा किंवा भोंडला

४. भातुकली

५. मुलींच्या खेळातली गाणी

गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा

१. संजय बाहुलीच्या लग्नात ____________ नेसून ____________ होत होता.

२. बायकात पुरुष ____________ भाजून खातो ____________ .

३. श्रीनिवास उत्तम पोहतो तो कितीही उंचावरुन ____________ ____________ .

४. व्यायामशाळेत ____________ वर निरनिराळ्याप्रकारची ____________ करतात.

५. ज्याच्यावर ____________ येतं त्याचे डोळे बांधतात या खेळाला ____________ ____________ म्हणतात.

६. मी काम करतेय. तू इथे ____________ येऊ नकोस.

७. डॉक्टरांच्या कामात इतरांनी ____________ केलेली त्यांना आवडत नाही.

८. हादग्यालाच ____________ असंही म्हणतात.

९. रोज गाणी म्हटल्यावर ____________ वाटतात. सोळाव्या दिवशी ____________ करतात.

भाषाभ्यास -

वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

झालंच तर , सूर मारणे, सावध करणे, खोक पाडणे, लुडबूड करणे, बोळवण करणे, कसरत करणे, शोधून काढणे, जास्तीत जास्त

१. 'मुलंच ती !' ही रचना फक्त 'ती मुलं आहेत' या प्रकारची नाही. त्यापेक्षा वेगळा अर्थ अशा रचनेतून व्यक्त होतो. तो अर्थ समजून घ्या. चोर, सासू, फेरीवाला, वाघ या शब्दांसाठी असा अर्थ व्यक्त करणारी वाक्ये बनवा.

२. जोड शब्द पूर्ण करा.

बाहुला ______	बँड ______	चूल ______
पोळपाट ______	काचा ______	विटी ______

३. समानार्थी शब्द सांगा -
सावध, पक्का लहानपण

५. ती कसली पोहते !

ही रचना उपहास व्यक्त करणारी आहे. याचा अर्थ ती पोहू शकत नाही. याप्रमाणे पाच वाक्ये लिहा.

६. 'तुला कोणी सांगितलं होतं मधे कडमडायला ?' या वाक्यातल्या शब्दांचा क्रम बदलून लिहा.

स्वाध्याय -

१. तुमच्या प्रांतातल्या मुलांचे कोणते खेळ इथल्या मुलांपेक्षा वेगळे आहेत ?

२. तुमच्याकडे मुलींच्या खेळात कोणती गाणी आहेत ?

३. हादग्यासारखा तुमच्याकडे कोणता खेळ आहे ?

४. भारतीय खेळांसाठी महागड्या साधनांची गरज नसते. या दृष्टीने भारतीय खेळांवर एक निबंध लिहा.

५. 'रामराई साईसुट्ट्यो', 'बायकात पुरुष लांबोडा' यासाठी तुमच्या भाषेत काय म्हणतात ? दुसऱ्या एखाद्या खेळात मुलं असं काही म्हणतात का, याची माहिती द्या.

२० महात्मा जोतीबा फुले

म. गांधींनी महाराष्ट्राला 'सामाजिक कार्यकर्त्यांचं मोहोळ' असं म्हटलं होतं. महाराष्ट्राच्या सामाजिक प्रगतीमागे समर्पित अशा त्यागी समाजसुधारकांची फार मोठी परंपरा आहे. म. जोतीबा फुले हे या परंपरेतले आद्य समाजसुधारक मानले जातात.

जोतीबांचा जन्म १८२७ साली एका माळ्याच्या कुटुंबात झाला. माळी किंवा कुणबी हे तेव्हा शूद्र मानले जात. पण जोतीबांच्या वडलांनी, गोविंदरावांनी त्यांना स्कॉटिश मिशनच्या शाळेत घातले. जोतीबांनी ग्रंथांमधून ज्ञान मिळवले आणि त्याहीपेक्षा उघड्या डोळ्यांनी आपल्या हीनदीन समाजाचे निरीक्षण करून आपल्या जीवितकार्याची दिशा निश्चित केली.

स्त्रिया आणि शूद्रांना त्यावेळी विद्येचा अधिकार नव्हता. स्त्रीला शिक्षण दिले तर ती कुमार्गाला लागेल असे मानत. मुलीने शिक्षण घेतले तर तिला अकाली वैधव्य येते अशी समजूत होती. तिने पायात जोडे घालणे किंवा छत्री वापरणे हा पुरुषांचा अपमान आहे असे समजत. अशा काळात जोतीबांनी १८४८ च्या ऑगस्ट महिन्यात पुण्याच्या भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढली. या शाळेत अतिशूद्रांच्या मुलीसुद्धा होत्या. ह्या मुलींना शिकवण्यासाठी त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाईंना तयार केले. सावित्रीबाई

शाळेत निघाल्या की सनातनी लोक त्यांच्या अंगावर केर, शेण, दगड फेकत. लोकांनी जोतीबांच्या वडलांवरही दबाव आणला. वडलांनी मुलाला आणि सुनेला घरबाहेर काढले. घरीदारी विरोध पत्करूनही फुले पतिपत्नींनी स्त्रीशिक्षणाचे कार्य चालूच ठेवले.

स्त्रियांची ही स्थिती, तर शूद्रांच्या कपाळी अक्षरशः नरकवास होता. शूद्रांनी वेदपठण ऐकले तर त्यांच्या कानात तप्त शिशाचा रस ओतावा अशी मनुस्मृतीची आज्ञा होती. अस्पृश्याच्या सावलीचासुद्धा विटाळ मानत. शूद्रानी सकाळी किंवा संध्याकाळी रस्त्यावर फिरू नये कारण त्यावेळी सावली लांब पडते. भर दुपारी पायाशी सावली पडते त्यावेळीच त्यांनी फिरावे. तेव्हाही आपली सावली कोणावर पडणार नाही याची खबरदारी घ्यावी. शूद्राची थुंकी रस्त्यावर पडू नये म्हणून त्यांनी सतत एक मडके गळ्यात बांधूनच फिरावे इतकी अस्पृश्यता कडक पाळली जात होती. खुद्द जोतीबांना त्यांच्या मित्राच्या लग्नाच्या मिरवणुकीतून लोकांनी अपमान करून हाकलून दिले होते. जोतीबांना सर्वच अस्पृश्यांचा कळवळा होता. त्यांना शिक्षण दिल्याशिवाय त्यांची स्थिती सुधारणार नाही हे त्यांनी जाणले आणि १८५१ साली पुण्याच्या नानापेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढली. प्रौढांसाठी त्यांनी एक रात्रीची शाळाही सुरु केली.

अस्पृश्यांचे पाण्याचे फार हाल होत असत. पुण्यात अनेक हौद होते. पण शूद्र स्वतः त्यामधून पाणी घेऊ शकत नव्हते. तासंतास विनवण्या केल्या तर कोणीतरी एखादी घागर दुरून त्यांच्या मडक्यात ओतायचे. जोतीबांना हे पाहवेना. त्यांनी आपल्या घरातला पाण्याचा हौद खुला केला. त्या हौदाचे पाणी जसे फुले वापरत तितक्याच हक्काने सर्व शूद्रही वापरत असत. एकदा एका घाणेरड्या, शेंबड्या मुलाला उचलून जोतीबांनी कुरवाळले आणि

त्याला खाऊ दिला. एका गृहस्थाने त्यांना विचारले, "इतक्या घाणेरड्या मुलाला तुम्ही कसेकाय जवळ घेता?" जोतीबा त्याला म्हणाले, "ह्या मुलाच्या आईबापांच्या दारिद्र्यामुळे हा अशा स्थितीत आहे. तुमच्यासारखे लोक त्यांना पाणी, साबण, कपडे पुरवत नाहीत म्हणून ही मुले अशी घाणेरडी असतात. हा त्यांचा दोष नव्हे. ही समाजाची जबाबदारी आहे. ह्या मुलाचा देहच काय तो धुवावा लागेल पण तुमचे तर मन धुतले पाहिजे."

जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले
तोचि साधु ओळखावा । देव तेथेचि जाणावा

या तुकारामवचनाप्रमाणे जोतीबा खरे साधुपुरुष होते. जोतीबांच्या सुधारणा नापसंत असणाऱ्या सनातन्यांनी त्यांच्यावर मारेकरी घातले होते. पण त्या महात्म्याच्या दर्शनाने त्यांचेही मन द्रवले. पुढे त्यातला एकजण त्यांचा अंगरक्षक झाला आणि दुसरा धोंडीराम नामदेव कुंभार हा काशीला मोठा पंडित झाला.

विधवांची स्थिती सुधारण्यासाठीही फुलेच पुढे आले. त्यांच्या पुढाकाराने १८६७ साली पहिला पुनर्विवाह पार पडला. त्याकाळी अनेक ब्राह्मण विधवांचे पाऊल वाकडे पडल्यावर आत्महत्येशिवाय त्यांना दुसरा मार्ग नसे. जोतीबांनी 'बालहत्याप्रतिबंधकगृह' काढून अशा स्त्रियांच्या बाळंतपणाची सोय केली आणि त्यांना भ्रूणहत्येच्या पापापासून वाचवले. त्यांचा दत्तक पुत्र यशवंत याच मुलांतला एक होता. 'बालविवाह' हे अनेक दोषांचे मूळ आहे हे जाणून त्यांनी प्रौढ विवाहाला प्रोत्साहन दिले. पुरोहित वर्गाची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजाची' स्थापना केली. ईश्वराची प्रार्थना आणि लग्नापासून सर्व विधी मातृभाषेतून करण्याची नवी पद्धत सुरु केली.

पण फुल्यांची खरी ओळख 'शेतकरी कामकरी लोकांचे प्रमुख नेते' ही आहे. 'गुलामगिरी','अस्पृश्यांची कैफियत', 'शेतकऱ्याचा आसूड' या लेखांमधून त्यांनी गरिबांची दुःखे वेशीवर टांगली. ड्यूक आणि डचेस ऑफ कॅनॉटच्या मेजवानीला जोतीबा पंचा, घोंगडी, फाटक्या वहाणा अशा कुणब्याच्या वेशात गेले आणि त्यांनी आपल्या भाषणातून कष्टकऱ्यांची स्थिती वर्णन करून सांगितली. ११ मे १८८८ च्या सभेत जनतेने त्यांना 'महात्मा' ही पदवी अर्पण केली. २८-११-१८९० रोजी जोतीबांचे निधन झाले. पण फुलयांचा विचार सतत जिवंत राहिला. महर्षी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर इतकेच काय मुस्लिम सत्यशोधक समाजाचे हमीद दलवाई या सर्वांच्या कार्याच्या रूपाने फुले अमर झाले.

शब्दार्थ

मोहोळ	-	मधमाशांचा थवा
समर्पित	-	ज्यांनी सर्व काही अर्पण केले आहे असे
कुणबी	-	शेतमजूर, गरीब शेतकऱ्यांची जात
सनातनी	-	जुन्या मताचे, परंपरेचा आग्रह धरणारे
दबाव	-	presure दडपण
कळवळा	-	कणव, सहानुभूती
कुरवाळणे	-	प्रेमाने स्पर्श करणे, हात फिरवणे
पाऊल वाकडे पडणे	-	विशेषतः स्त्रीचे अनैतिक वर्तन
भ्रूणहत्या	-	कोवळ्या गर्भाची हत्या
मक्तेदारी	-	Monopoly एकाधिकार

कैफियत - दुःख, अन्याय व्यक्त करणे

घोंगडी - मेंढीच्या लोकरीचे जाड - खरबरीत ब्लँकेट - (कंबल)

स्वाध्याय

धड्यावरचे प्रश्न -

१. 'कार्यकर्त्यांचं मोहोळ' या शब्दांमधून गांधीजींना काय सुचवायचे होते ?

२. जोतीबांनी समाजसुधारणेचे कार्य का निवडले ?

३. स्त्रीशिक्षणाचा आरंभ करण्यासाठी फुल्यांना काय काय सहन करावे लागले ?

४. जोतीबांच्या काळी अस्पृश्यतेचे स्वरूप काय होते ?

५. फुल्यांच्या अंतःकरणातली माणुसकी अस्पृश्यांना कशी अनुभवता आली ?

६. विधवांच्याबाबतीत काळाच्या बरेच पुढे असे कोणते कार्य फुल्यांनी केले ?

७. जोतीबांना कुणब्यांचे पुढारी का म्हणतात ?

८. फुल्यांच्या मृत्यूने त्यांचे कार्य थांबले नाही, ते कसे ?

टिपा लिहा

१. स्त्री शिक्षणाची चळवळ

२. अस्पृश्यता निवारण
३. बहुजनसमाजात शिक्षणाचा प्रसार
४. समाजसुधारकांना होणारा समाजाचा विरोध
५. जोतीबांच्या जीवनात सावित्रीबाईंचे स्थान

रिकाम्या जागी पाठातले योग्य शब्द भरा

१. म. गांधींनी महाराष्ट्राला ______ ______ ______ असं म्हटलं होतं.

२. फुले हे या परंपरेतले ______ ______ मानले जातात.

३. माळी किंवा ______ हे तेव्हा ______ मानले जात.

४. ______ आणि ______ त्यावेळी विद्येचा अधिकार नव्हता.

५. स्त्रीला शिक्षण दिले तर ती ______ लागेल असे मानत.

६. फुल्यांनी ______ ______ महिन्यात मुलींची पहिली शाळा काढली.

७. सावित्रीबाई शाळेत निघाल्या की ______ लोक त्यांच्यावर शेण, दगड फेकत.

८. शूद्रांनी ______ ऐकले तर त्यांच्या कानात ______ ओतत.

९. जोतीबांना सर्वच अस्पृश्यांचा ______ होता.

१०. या मुलाचा ______________ काय तो धुवावा लागेल. तुमचे तर ______________ धुतले पाहिजे.

११. जोतीबांनी विधवांसाठी ______________ काढून त्यांना ______________ ______________ पापापासून वाचवले.

१२. पुरोहितवर्गाची ______________ मोडून काढण्यासाठी त्यांनी ______________ ______________ स्थापना केली.

भाषाभ्यास -

वाक्प्रचार -

मानला जाणे, उघड्या डोळ्यांनी, कुमार्गाला लागणे, दबाव आणणे, घराबाहेर काढणे, च्या कपाळी, कळवळा असणे, हाल होणे, तासंतास, मारेकरी घालणे, मन द्रवणे, पाऊल वाकडे पडणे, मोडून काढणे, वेशीवर टांगणे, दुसरा मार्ग नसणे.

पुढील शब्दांचा अर्थ सांगा -

मोहोळ, समर्पित, कुणबी, अकाली, सनातनी, दबाव, विटाळ, कळवळा, कुरवाळणे, भ्रूणहत्या, मक्तेदारी, कैफियत, प्रोत्साहन

पुढील शब्दांमधील मूळ शब्द सांगा -

समर्पित, वैधव्य, मिरवणूक, विनवण्या, घाणेरडा, शेंबडा, प्रोत्साहन, मक्तेदारी, पुढाकार, मारेकरी, अस्पृष्यता, सुधारणा, समजूत.

जोडशब्द पूर्ण करा -

हीन_________, घरी_________, _________पत्नी,

आई_________, रंजले_________

विरुद्धार्थी शब्द द्या -

कुमार्ग, त्यागी, सनातनी, खबरदारी, प्रगती, कळवळा, प्रौढ, गुलामगिरी, फाटका, अपमान, अतिशूद्र, प्रमुख, कष्टकरी

पुढील सामासिक शब्दांची फोड करा -

जीवितकार्य, समाजसुधारक, नरकवास, वेदपठण, अंगरक्षक, सत्यशोधक, कष्टकरी

वाक्यरचना -

हा पुरुषांचा अपमान समजत, लोक शेण फेकत.

ही रचना रीतिभूतकाळाची आहे. जायचा, जात असे हे इतर दोन प्रकार आहेत.

मी जाई [स्वरान्त] मी ऐके [व्यं.] तो / ती / ते ----- तीच रूपे आणि अ.व. साठी ते / त्या / ती --- जात, ऐकत अशी रूपे वापरली जातात. या पाठातली रीतिभूतकाळाची वाक्ये दुसऱ्या दोन प्रकारांनी लिहा.

२. करावा / करू नये ही विध्यर्थाची रूपे आहेत.

या पाठातली विध्यर्थाची होकारार्थी वाक्ये नकारार्थी आणि नकारार्थी वाक्ये होकारार्थी बनवा.

३. जोतीबांना हे पाहवेना. पाहवत नव्हते / नाही. याचा अर्थ पाहणे शक्य नव्हते, सहन होत नव्हते असा होतो. याला मराठीत शक्यार्थ म्हणतात. याप्रमाणे बघवेना, बोलवेना, सोसवेना, उठवेना इ. वापरून वाक्ये बनवा.

४. तुमचे तर मनच धुतले पाहिजे. शूद्रांच्या कपाळी तर नरकवास होता. या वाक्यांमधाला तर हा जर - तर जोडीतला conditional नाही. त्या तर चा उपयोग तुलनेसाठी केला आहे. तुम्ही अशी वाक्ये बनवा.

स्वाध्याय -

१. या पाठाच्या शेवटी आलेल्या समाजसुधारकांची माहिती मिळवून त्यांच्यावर एकेक परिच्छेद लिहा.

२. तुमच्या प्रांतातल्या समाजसुधारकांची माहिती द्या, त्यांनी कोणत्या सुधारणा केल्या, समाजानी त्यांना कसा विरोध केला या सर्व तपशिलासह टिपण लिहा.

३. स्त्री-जागृती या विषयावर एक परिसंवाद घ्या.

४. तुमच्या प्रांतात अस्पृश्यता अजून पाळतात का ?

५. जोतीबा हे कृतिशील सुधारक होते. उलट काही समाजसुधारक आपल्या लेखनातून जागृती करत होते. आगरकर, लोकहितवादी हे असे सुधारक होते. तुमच्या प्रांतात होऊन गेलेल्या अशा सुधारकांची माहिती द्या.

६. सावित्रीबाई फुले आपल्या नातीशी बोलताहेत अशी कल्पना करून एक संवाद लिहा.

२१ वैज्ञानिकाची मुलाखत

डॉ. जयंत नारळीकर हे जागतिक कीर्तीचे खगोलशास्त्रज्ञ आहेत. श्रीमती नीलिमा साठे विज्ञानाच्या शिक्षिका आहेत. शिक्षकांच्या एका मासिकासाठी साठेबाई नारळीकरांची मुलाखत घ्यायला आल्या आहेत.

साठे - नमस्कार डॉ. नारळीकर. आज १९ जुलै. आपल्या वाढदिवसाबद्दल शुभेच्छा. आपल्याला दीर्घ आयुरारोग्य मिळो आणि आपल्या ज्ञानाचा लाभ देशाला होवो.

नारळीकर - धन्यवाद ! तुमच्या सद्भावनेबद्दल आभारी आहे.

साठे - आपण गणिती किंवा खगोलशास्त्रज्ञ होणार हे घरातच ठरले होते असे म्हणता येईल काय ?

नारळीकर - माझे वडील वाराणसीच्या बनारस हिंदु विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक होते. माझे मामा हुजूरबाजार हेही गणिती होते. परंतु गणिताची परंपरा घरात असूनही मी गणिती व्हावे असा आग्रह वडील मंडळींचा नव्हता. मलाच तो विषय आवडला असे मी म्हणेन.

साठे - आपलं शिक्षण जन्मगावी म्हणजे कोल्हापूरला झालं की--

नारळीकर - माझं शिक्षण प्रथम वाराणसीत हिंदी माध्यमातून झालं. पुढे १९५७ साली उच्च शिक्षणासाठी मी केंब्रिजला गेलो.

साठे - याचा अर्थ मातृभाषेतून शिक्षण घेऊनही आपण -

नारळीकर - तुम्ही योग्य शब्द वापरलात. हिंदी ही माझी दुसरी मातृभाषाच आहे. आणि प्राथमिक शिक्षण तरी मातृभाषेतूनच मिळावे या मताचा मी आहे.

साठे - शिक्षणात आपण मिळवलेल्या अत्युच्च यशाची यादी मी वाचली आहे. शिक्षण संपवून आपण संशोधनाची सुरुवात कुठे केली ?

नारळीकर - प्रथम इंग्लंडमधे किंग्ज कॉलेजात मी फेलो होतो. नंतर नव्याने स्थापन झालेल्या केंब्रिजच्या सैद्धान्तिक खगोलशास्त्र संस्थेत काम केले.

साठे - त्यानंतर आपण भारतात परत आलात.

नारळीकर - हो. १९७२ पासून टाटा मूलभूत संशोधन संस्थेत सैद्धातिक खगोल-भौतिकशास्त्र विभागाचा प्रमुख म्हणून मी काम करत होतो.

साठे - आपले संशोधन विज्ञानाच्या अतिशय प्रगत क्षेत्रातले आहे, याची मला जाणीव आहे. तरीही आपल्या संशोधनाबद्दल थोडी कल्पना द्याल का ?

नारळीकर - खरेतर खगोलशास्त्र अतिशय प्राचीन आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे या विषयातले संशोधन झपाट्याने पुढे जाते आहे. खगोलशास्त्राचा संबंध विश्वाच्या निरीक्षणाशी आहे.

त्या निरीक्षणांचे भौतिक शास्त्राच्या आधारे केलेले विश्लेषण हा खगोल भौतिक शास्त्राचा विषय आहे. या विश्लेषणामुळे संपूर्ण विश्वाच्या रचनेबद्दल शास्त्रीय तर्क करणे शक्य झाले. अशा प्रयत्नातून विश्वरचनाशास्त्राचा [Cosmology] जन्म झाला. आइनस्टाइननी म्हटलेच आहे की, "विश्वाबद्दल सर्वात अगम्य गोष्ट हीच की ते गम्य आहे." [The most incomprehensible thing about the universe is that it is comprehensible, Einstein.]

साठे - आइनस्टाइनच्या व्यापक सापेक्षतावादाशी आपले संशोधन संबंधित आहे काय ?

नारळीकर - माझे गुरु डॉ. फ्रेड हॉयेल यांच्यासह मी 'स्टेडीस्टेट थियरी ऑफ द युनिव्हर्स' वर काम केले. त्यावेळी सापेक्षतावादाच्या कक्षेतच पदार्थाच्या अखंड निर्मितीचा शोध आम्हाला लागला. माख म्हणून एक तत्त्ववेत्ता होऊन गेला. त्याने वस्तूच्या जडत्वावर काही विचार मांडले. त्यांवर काम करताना गुरुत्वाकर्षणाचा एक नवा सिद्धांत हाती आला. जो सापेक्षतेला सामावून घेऊन त्याहून व्यापक ठरला. पुढे मी क्वेसारवर काम केले.

साठे - क्वेसार म्हणजे काय ?

नारळीकर - अंतराळात काही रेडिओ लहरींचे जनक असतात. ते ताऱ्यांप्रमाणे वाटतात. पण १९६७ साली पाहणी करताना असे आढळले की, त्यांच्यात प्रचंड ऊर्जेचा साठा अतिशय लहान जागेत भरलेला आहे. त्यांच्यात ताऱ्यांच्या कोट्यवधी पटीने जास्त वस्तुमानाचे पदार्थ असतात. ताऱ्यांसारखे

वाटणाऱ्या रेडिओलहरींच्या या जनकांना क्वेसार म्हणतात. तारकाविश्व, कृष्णविवरे, श्वेतविवरे, विश्वरचनाशास्त्र हेही माझ्या अभ्यासाचे विषय आहेत.

साठे - आपले सर्व संशोधन इतके मौलिक आहे म्हणूनच आतापर्यंत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर तीसेक बहुमान आपल्याला मिळाले आहेत. त्यात पद्मभूषण हा पहिलाच पुरस्कार आपल्याला केवळ सत्ताविसाव्या वर्षी मिळाला. आता आपण ज्या 'आयुका'चे पहिले संचालक आहात त्या संस्थेची थोडी माहिती द्या.

नारळीकर - Inter - University Centre For Astronomy And Astrophysics - - चा संक्षेप म्हणजे 'आयुका' IUCAA खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्राचे संशोधन फार खर्चिक असते. प्रत्येक विद्यापीठाला या सोयी परवडणार नाहीत. शिवाय नारायणगावला 'जायंट मीटरवेव रेडिओ टेलिस्कोप' [GMRT] उभारला जातोय. हा जगातला मीटरलहरी वापरणारा सर्वात मोठा टेलिस्कोप आहे. त्याचा लाभ देशातल्या तरुण शास्त्रज्ञांना मिळावा तसेच देशविदेशीच्या खगोलशास्त्रज्ञांच्या संशोधनाचे एक प्रमुख केंद्र शेजारीच असावे यादृष्टीने 'आयुका' ची १९८८ साली स्थापना झाली.

साठे - आपण संशोधानातून विज्ञानकथांकडे कसे वळलात ?

नारळीकर - १९७४ साली 'कृष्णविवर' ही पहिली विज्ञानकथा मी लिहिली. ही प्रेरणा माझे गुरु हॉयेल यांची. सामान्य

माणसाला विज्ञानाची माहिती होण्यासाठी, लोकांमधे वैज्ञानिक दृष्टिकोन तयार होण्यासाठी विज्ञानकथांचा फार उपयोग होऊ शकतो. नाहीतर लोक अंधश्रद्धांच्या आहारी जातात. 'यक्षांची देणगी', 'अंतराळातील भस्मासुर' हे माझे विज्ञानकथांचे संग्रह आहेत. 'प्रेषित' आणि 'वामन परत न आला' या कादंबऱ्या. 'खगोलशास्त्राचे विश्व' हेही पुस्तक मी मराठीत लिहिले. अलिकडेच 'अंतराळातील स्फोट' ही मुलांसाठी विज्ञानकादंबरी लिहिली. विज्ञान लोकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी वैज्ञानिकांचीच आहे असे मी मानतो.

साठे - शेवटचा प्रश्न. आपल्या घरात रँग्लरांच्या दोन पिढ्यांनंतर तिसऱ्या पिढीत हा वारसा कोण चालवणार?

नारळीकर - माझ्या तीनही मुली विज्ञानाच्या वाटेने जात आहेत - - - पाहूया पुढे काय करतात ते !

साठे - कामांच्या गर्दीतून आपण मुलाखत दिल्याबद्दल मनापासून धन्यवाद ! आता आपला निरोप घेते.

टिपा -

१. कृष्णविवर - न्यूट्रॉन ताऱ्याची घनता पाण्याच्या १० - १५ पटींपर्यंत असू शकते. जर एखादा तारा रूपांतर होत होत न्यूट्रॉन ताऱ्याच्या स्थितीला आलेला असताना त्याचे वस्तुमान सूर्यापेक्षा तिपटीने किंवा त्याहून जास्त असेल तर त्याच्या प्रचंड गुरुत्वाकर्षणाखाली त्याचे आकुंचन सुरू होते. हे आकुंचन थांबवण्याइतके त्या ताऱ्यातले आंतरिक दाब नसल्यामुळे हे आकुंचन वाढत्या वेगाने चालू रहाते. या प्रकाराला गुरुत्वीय अवपात

Gravitational collapse असे म्हणतात. या अवपातातून कृष्णविवर तयार होते. कृष्णविवरातून कसलाच प्रकाश किंवा पदार्थ बाहेर पडू शकत नाही. कारण त्याचे प्रचंड गुरुत्वाकर्षण कुठल्याही बाहेर पडू इच्छिणाऱ्या वस्तूला आत ओढून घेते. अशी कृष्ण विवरे अस्तित्वात आहेत का ? असा प्रश्न आहे. नारळीकरांनी 'कृष्णविवर' या नावाची एक विज्ञानकथा लिहिली आहे.

२. *श्वेतविवर* - एखादा ताऱ्याचे आकुंचन न होता प्रसरण झाले - प्रसरणाचा वेग वाढून जर त्याचा स्फोट झाला तर श्वेतविवराची निर्मिती होते. श्वेतविवरे फार काळ टिकणार नाहीत असे शास्त्रज्ञ म्हणतात. कारण स्फोटातून बाहेर येणाऱ्या वस्तूंवर आसपासच्या वस्तू विलक्षण दबाव टाकून त्यांचे प्रसरण थांबवतील. एक श्वेतविवर म्हणजे आपले संपूर्ण विश्व.

३. *विज्ञानकथा* - विसावे शतक हे विज्ञानयुग म्हटले जाते. या एका शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञान खूपच पुढे गेले. त्याचे मानवी जीवनावर काय परिणाम होतील याची माहिती सामान्य माणसाला झाली पाहिजे. तसेच जनसमान्यांमधील अंधश्रद्धा, चमत्कारांवर विश्वास या प्रवृत्ती काढून टाकून त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन तयार झाला पाहिजे. हे काम करण्यासाठी विज्ञानकथांचा उपयोग होऊ शकतो, या विचाराने डॉ. नारळीकरांनी मराठीत विज्ञानकथा लिहिल्या. विज्ञानकथा ही मनोरंजक आणि विज्ञानाच्या दृष्टीने उद्‌बोधक असावी. ती सध्या माहीत असलेल्या विज्ञानावर असावी किंवा त्यात स्वतःच्या कल्पनाशक्तीने भर घालून उद्याच्या विज्ञानाचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न असावा. ती केवळ काल्पनिक भयकथा नसावी. इंग्रजीत विज्ञानकथा लोकप्रिय आहेत. आता भारतीय भाषांमध्ये तसा प्रयत्न होतो आहे.

शब्दार्थ

आयुरारोग्य	-	आयुष्य आणि आरोग्य
सैद्धान्तिक	-	Theorotical
व्यापक सापेक्षतावाद	-	General Theory of Relativity
अगम्य	-	न समजणारी, अनाकलनीय. incomprehensible
पदार्थाची अखंड निर्मिती	-	Continuous creation of matter
जडत्व	-	Intertia
गुरुत्वाकर्षण	-	Gravity
अंतराळ	-	Space
वस्तुमान	-	Mass

धड्यावरचे प्रश्न

१. या मुलाखतीतून डॉ. नारळीकरांविषयी कोणती कौटुंबिक माहिती तुम्हाला समजली ?

२. साठेबाई 'मातृभाषेतून शिक्षण घेऊनही ---' असं का म्हणतात ?

३. नारळीकरांनी परदेशात आणि भारतात कुठे कुठे काम केले ?

४. आइनस्टाइनच्या सापेक्षतावादाशी नारळीकरांच्या संशोधनाचा काय संबंध आहे ?

५. क्वेसार म्हणजे काय ?

६. 'आयुकाची' स्थापना कशासाठी झाली ? ती पुण्यातच होण्याचे कारण काय ?

७. नारळीकरांना शास्त्रज्ञ म्हणून जागतिक मान्यता मिळाली हे कशावरून स्पष्ट होते ?

८. विज्ञानकथा म्हणजे काय ? नारळीकरांनी कोणत्या विज्ञानकथा लिहिल्या ? का ?

टिपा लिहा.

१. विज्ञानकथा

२. ज्योतिष व खगोलशास्त्र

३. विज्ञान आणि भारत

भाषाभ्यास

१. अर्थ सांगा -

गणिती, ज्योतिषी, खगोलशास्त्र, खगोल-भौतिकशास्त्र, विश्वरचनाशास्त्र, अंतराळ

वाक्‌प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

वारसा चालवणे, आहारी जाणे, वाटेने जाणे, अमुक मताचा, हाती येणे, सामावून घेणे.

स्वाध्याय

१. 'यक्षांची देणगी' या विज्ञानकथांच्या संग्रहाला नारळीकरांनी प्रस्तावना लिहिली आहे. ही प्रस्तावना आणि त्यांचा एखादा विज्ञानकथासंग्रह/कादंबरी वाचा.

२. 'प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच दिले जावे' या विषयावर एक वक्तृत्वसभा घ्या.

३. भारतात प्रगत संशोधनासाठी सोयी नाहीत असे सांगून अनेक बुद्धिमान भारतीय तरुण परदेशातच रहातात. पण डॉ. नारळीकरांनी आपले महत्त्वाचे कार्य भारतातच केले. या पार्श्व-भूमीवर 'भारतातील तरुण वैज्ञानिकांचे भवितव्य' या विषयावर एक वक्तृत्वसभा घ्या.

४. तुमच्या भाषेत विज्ञानावरचे ग्रंथ आणि विज्ञानकथा कोणी लिहिल्या आहेत का ? त्याची माहिती द्या.

५. आदर्श शिक्षकाचा पुरस्कार मिळालेल्या एका शिक्षकाची अशी मुलाखत तयार करा.

२२ सौर ऊर्जा

पृथ्वीच्या पोटातून आपण खनिज तेले मिळवतो. खनिज तेलांच्या किंमती दिवसेदिवस आकाशाला भिडताहेत. शिवाय कधीतरी हा खनिज तेलांचा साठा संपणार आहे, ही टांगती तरवार आपल्या डोक्यावर आहेच. या भीतीमुळे पर्यायी ऊर्जा आणि पूरक इंधनाचा शोध घ्यायला सुरुवात झाली. यातूनच सौर ऊर्जा हा नवा आशेचा किरण आपल्याला लाभला.

विज्ञानाच्या सहाय्याने सूर्याचे स्वरूप स्पष्ट होत गेले तसतशी एक गोष्ट सिध्द झाली. ती म्हणजे सूर्य ही एक अतिप्रचंड भट्टी आहे. इथे हायड्रोजनचं हेलियममधे रूपांतर होतं आणि ऊर्जानिर्मिती होते. सूर्यप्रकाशाच्या स्वरूपात लक्षावधी किलोवॅट ऊर्जा पृथ्वीला पोचते. सूर्यकिरण पृथ्वीच्या जन्मापासून पृथ्वीला ऊर्जा पुरवताहेत. पृथ्वीवर सजीव सृष्टी निर्माण झाल्यापासून तिला आवश्यक अन्न निर्माण करण्यासाठी मदत याच सूर्यप्रकाशाने केली. हे सर्व कसलेही प्रदूषण न करता आणि अगदी फुकट! हे लक्षात आल्यावर शास्त्रज्ञांचे लक्ष सौर ऊर्जेकडे वळले.

आपण एका दिवसात जितकी ऊर्जा खर्च करतो तिच्या कितीतरी पट ऊर्जा सूर्य पृथ्वीवर ओतत असतो. ही ऊर्जा मानवी उपयोगाला योग्य बनवण्यासाठी मात्र गुंतागुंतीची यंत्रसामग्री लागते.

सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी चिलीमधे सौरऊर्जेच्या सहाय्याने एक यंत्रणा उभारून रोज ५,००० गॅलन गोडं पाणी खाणीच्या कामगारांना पुरवलं जात होतं. १६१३ त एका अमेरिकन तंत्रज्ञाने सौर ऊर्जेचा उपयोग शेतीला पाणी पुरवण्यासाठी करून घेतला होता. १६४७ साली अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांना सल्लागार मंडळाने सल्ला दिला होता की, १६७५ पर्यंत १३ लक्ष घरं सौर ऊर्जेच्या मदतीने हिवाळ्यात उबदार आणि उन्हाळ्यात थंड ठेवता येतील. प्रत्यक्षात १६७५ साली अशी फक्त तेरा घरं, तीही प्रायोगिक तत्त्वावर चाललेली होती. इतकं आपण सुरुवातीला सौर ऊर्जेकडे दुर्लक्ष केलं.

पण अलीकडे शास्त्रज्ञांना सौर ऊर्जेची बॅटरी बनवण्यात यश आलं आहे. ही बॅटरी जिथे सूर्यकिरण येतील अशा ठिकाणी बसवली जाते. या बॅटरीत रेडिओ लहरींचा संग्राहक [ट्रांझिस्टर] आणि इतर घन स्थितीतल्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर केलेला असतो. बॅटरीवर पडणाऱ्या सूर्यकिरणांपैकी १५% सूर्यकिरणांचे विद्युत् ऊर्जेत रूपांतर इथे अगदी सहज होते. सौर ऊर्जेवर चालणाऱ्या बॅटऱ्या आकाशात सोडलेल्या उपग्रहांना, चंद्रावर आणि मंगळावर सोडलेल्या उपकरणांनाही ऊर्जा पुरवू शकतात. एखाद्या घराच्या छपरावर बसवलेली अशी यंत्रणा फक्त १०% काम करत असली तरीही एका कुटुंबाला पुरून उरेल एवढी विद्युत ऊर्जा निर्माण करते.

सध्या वीजनिर्मितीसाठी जलविद्युत्, अणुविद्युत् आणि औष्णिक म्हणजे खनिज कोळशावर तयार होणारी वीज असे तीन मार्ग वापरले जातात. सौर शक्तीचा ऊर्जेसाठी वापर हा वरील सर्व मार्गांपेक्षा प्रभावी ठरतो. शिवाय भारतासारख्या भरपूर सूर्यप्रकाश मिळणाऱ्या देशाला सौर ऊर्जा स्वस्त पडेल. इंधनासाठी होणारी बेछूट वृक्षतोड त्यामुळे थांबेल. कोकणासारख्या समुद्रकिनाऱ्यावर सौर ऊर्जेमुळे खाऱ्या पाण्याचं गोड्या

पाण्यात रुपांतर करुन पाण्याचे हाल थांबवता येतील. शिवाय वीजनिर्मितीही होईल.

सौर ऊर्जानिर्मिती कमी खर्चाची आणि वापरायला सोपी व्हावी म्हणून अनेक शास्त्रज्ञांनी संशोधन केले. सुरुवातीला शूमान या शास्त्रज्ञाने अंतर्गोल संग्राहक वापरले. पुढे त्यानेच सपाट संग्राहकाचे तंत्र विकसित केले. जॉर्जेस क्लॉड या फ्रेंच शास्त्रज्ञाने समुद्राचाच सपाट संग्राहक म्हणून वापर करता येईल हे सिद्ध केले. यातूनच सागरी औष्णिक ऊर्जेचा विकास झाला. अँडरसनच्या मते एकटया गल्फ प्रवाहावर अमेरिकेच्या विद्युत् गरजेच्या २०० पट ऊर्जानिर्मिती होऊ शकते. ग्लाझरच्या मते सौर ऊर्जेच्या संग्राहकासाठी उपग्रह योग्य ठरतील. एडन मनल या शास्त्रज्ञाने सोपी औष्णिक अभियांत्रिकी प्रक्रिया बनवली. सपाट तक्त्यांच्या संग्राहकातून ऊर्जानिर्मिती करणारी ही रचना आहे. वाळवंटात अशी यंत्रणा उभारून प्रखर सूर्यप्रकाशाचा उपयोग करता येईल आणि वस्तीला निरुपयोगी प्रदेशही उपयुक्त ठरेल. कसलेली इंधन न जाळता प्रदूषण न करता ही ऊर्जानिर्मिती शक्य होईल.

भारतात सौर ऊर्जानिर्मितीकडे आपले शास्त्रज्ञ जास्त लक्ष देत आहेत. मोठ्या संशोधन प्रकल्पापासून सूर्यचुलीपर्यंत आपण या ऊर्जेचा वापर करायला लागलो आहोत. भविष्यात ऊर्जेसाठी तरी आपल्याला सूर्यनमस्कार घालणे भाग आहे कारण सूर्य हा ऊर्जेचा कधीही न संपणारा साठा आहे.

शब्दार्थ

खनिज - खाणीतून मिळणारे.

खाण - Mine

पर्यायी	-	दुसरी, alternative
इंधन	-	Fuel जळणासाठी आवश्यक पदार्थ
प्रायोगिक	-	experimental केवळ चाचणी स्वरूपात
उपकरण	-	साधन Instrument
उपग्रह	-	Sattelite

धड्यावरचे प्रश्न

१. खनिज तेलांवर ऊर्जेसाठी अवलंबून रहाणे धोक्याचे का आहे ?

२. सौर ऊर्जेच्या जमेच्या बाजू कोणत्या आहेत ?

३. सौर ऊर्जेचा वापर आरंभी कोणी केला ?

४. सूर्यकिरणांपासून सौर ऊर्जा कशी मिळवतात ?

५. जलविद्युत्, अणुविद्युत् आणि औष्णिक विद्युत् यांची फायदेतोटयांच्या दृष्टीने तुलना करा.

६. सौर ऊर्जेच्या वापरासाठी कोणत्या शास्त्रज्ञांचे प्रयत्न उपयुक्त ठरले?

७. सौर ऊर्जा हाच अंतिम आणि उत्तम ऊर्जा स्रोत आहे असे का म्हटले जाते ?

टिपा लिहा -

१. पेट्रोल - काळे सोने

२. अणुशक्ती - शाप की वरदान

३. सूर्यकिरणांचे रोजच्या जीवनात होणारे फायदे

४. पर्यावरण-रक्षण

५. सौर ऊर्जा आणि भारत

भाषाभ्यास

वाक्प्रचारांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.

आकाशाला भिडणे, टांगती तलवार, आशेचा किरण, सल्ला देणे, पुरून उरणे, स्वस्त पडणे, नमस्कार घालणे, यश येणे

१. खारे पाणी आणि गोडं पाणी -
गोड हे विशेषण न बदलणारं आहे. पण अपवादात्मक ठिकाणी ते बदलणारं होऊ शकतं. *उदा.* गोडं तेल. गोडं पाणी. गोडा बेत [जेवणाचा]

२. न जाळता, न करता ही अतिशय सोपी नकारार्थी रचना आहे. जाळल्याशिवाय, केल्याशिवाय, असा त्याचा अर्थ होतो. बोल, धडपड, [पैसे] खर्च कर, उठ, जेव या क्रियापद्रांचा उपयोग करून अशी वाक्ये बनवा.

३. 'सूर्यनमस्कार घालणे' याचा प्रत्यक्ष अर्थ वेगळा आहे. इथे सूर्याला शरण जाणे असा दुसरा अर्थ सूचित केला आहे. याला 'कोटी' म्हणतात. *उदाहरणार्थ :* लीला मुळगावकरह्या बाई रक्तपिपासू होत्या.

आपल्या घरात मी एकटा देशपांडे आणि तू आहेस उपदेशपांडे! [उदाहरणे पु.ल. देशपांडे यांची]

अफझलखान शिवाजीला भेटायला शामियान्यात आला तेव्हा त्याला स्वर्ग दोन बोटं उरला होता.

सिद्दी जोहरचे सैनिक कडवे होते पण शिवाजी महाराजांनी त्यांना पावसात भिजत घातले होते.

या वाक्यांमधल्या कोटया समजून घ्या. तुमच्या भाषेतली अशी दोन उदाहरणे समजून सांगा.

४. मूळ शब्द सांगा
सौर, लक्षावधी, उबदार, संग्राहक, औष्णिक, अभियांत्रिकी

५. समानार्थी शब्द द्या.
साठा, सहाय्य, गुंतागुंतीची, प्रभावी, भरपूर, सोपी

६. विरुद्धार्थी शब्द द्या.
बेछूट, वृक्षतोड, सजीव, गुंतागुंतीची, सहज, निरुपयोगी

स्वाध्याय

१. जलविद्युत प्रकल्पाच्या उभारणीत काय अडचणी असतात ?

२. अणुविद्युत तयार करणाऱ्या भारतातील संस्थांची माहिती द्या.

३. सौर ऊर्जा निर्माण करणाऱ्या बेंगलोरच्या केंद्राची माहिती मिळवून एक टिपण तयार करा.

४. औद्योगिक प्रगती आणि निसर्गाचा समतोल या विषयावर एक वक्तृत्वसभा आयोजित करा.

५. तुमच्या प्रांतातल्या विद्युत् निर्मिती प्रकल्पांची माहिती लिहा.

२३ गावकुसाबाहेर

[संपादकीय - [दै. महाराष्ट्र टाइम्स] दि. १२. ६. १८७०]

लोकसभेत व राज्यसभेत अस्पृश्य समाजाबाबत बरीच चर्चा नुकतीच झाली. या चर्चेनंतर विशेष काही निष्पन्न होईल, असे दिसत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात अस्पृश्योद्धाराबद्दल जी तळमळ होती, ती स्वातंत्र्यानंतर उरली आहे, असे म्हणणे कठीण. महात्मा गांधींनी या प्रश्नाला अखिल भारतीय स्वरूप दिले. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याही चळवळीत अस्पृश्यता निवारणास महत्त्वाचे स्थान होते. गांधीजींनी 'हरिजन सेवक संघ' चालविला. आतामात्र या चळवळीला पूर्वीचे स्थान उरलेले नाही. औरंगाबादच्या मिलिंद महाविद्यालयाने म. गांधी जन्मशताब्दीनिमित्त एक प्रकाशन प्रसिद्ध केले असून, त्यात बारा विद्यार्थ्यांनी आपले अस्पृश्यतेसंबंधीचे प्रत्यक्ष अनुभव दिले आहेत, ते अतिशय उद्विग्न करणारे आहेत. कोवळ्या वयाची ही तरुण मुलं आपल्याबरोबर जहरी अनुभवांची शिदोरी वाहून नेत आहेत. बालवयात त्यांच्यावर संस्कार झाले, तेही स्पृश्यास्पृश्य भेदाचे. बालवयात शाळेत वा समाजात वावरताना त्यांना अलगतेची वागणूक मिळत होती आणि आता ही मुले महाविद्यालयात शिकत असली, तरी ती जेव्हा आपल्या गावी जातात, तेव्हा त्यांना व त्यांच्या नातेवाइकांना पूर्वीप्रमाणेच वागविले जात असल्याचा दारुण अनुभव येतो. मिलिंद महाविद्यालयाच्या बारा विद्यार्थ्यांचे

अनुभव हे अतिशय बोलके असून सरकारी कायदे समाजाने कसे पायदळी तुडविले आहेत, याची साक्ष देणारे आहेत. अस्पृश्य हरिजनसमाज हा पूर्वी गावकुसाबाहेर होता आणि आजही तो तसाच आहे. नव्हे, आज त्याचा छळ वाढला आहे. अस्पृश्यांना येत असलेला हा अनुभव स्पृश्य समाजाच्या असंस्कृततेची ग्वाही देणारा आहे.

वाढते प्रमाण

आपले अनुभव कथन करणारी ही मुले लहानपणी स्पृश्यांच्या घरी जाऊ शकत नव्हती, शिवाशीव होऊ नये म्हणून त्यांना सार्वजनिक ठिकाणी बंदी होती. आजही खेड्यापाड्यांत हेच चालले आहे. या विद्यार्थ्यांचे समवयस्क शहरांत त्यांना क्वचित घरी नेत असले, तरी त्यांना वेगळ्या पेल्यातून चहा आजही मिळतो. भजन मंडळीत भजनालाही वेगळे बसावे लागते. देवाच्या दारीही शिवाशिवीची भावना जोपासली जाते. खेड्यात पिण्याच्या पाण्याचा तुटवडा, आणि उन्हाळ्यात पाणी आटते. पण गावातील सामायिक विहिरीवर अस्पृश्यांना पाणी भरता येत नाही. नदी असेल, तर खालच्या अंगाला पाणी भरावे लागते. पण स्पृश्य समाज वरच्या अंगाला पाणी घेतो व उन्हाळ्यात अस्पृश्यांना पाणी मिळत नाही. गावात या अस्पृश्यांविरुद्ध खोटया तक्रारी केल्या जातात आणि मग समरप्रसंग उद्भवतो. अस्पृश्य शिक्षकाची अवहेलना होते. मुळातच प्राथमिक शिक्षक व शिक्षिका हे जिल्हा परिषद व गावपंचायतीच्या सदस्यांना आपल्या घरचे नोकर वाटतात. त्यात अस्पृश्य शिक्षक असेल, तर त्याची काय अवस्था होत असेल, याची कल्पना केलेली बरी.

गांधी जन्मशताब्दी झाली. त्याप्रसंगी अनेक वक्त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध भाषणे केली. मंत्र्यांनी त्यांच्या सुरात सूर मिसळला. पण प्रत्यक्षात अस्पृश्यतेला अटकाव होत नाही. ग्रामीण भागात ती वाढत आहे, अस्पृश्यांवरील

अत्याचारही वाढत आहेत. काही अस्पृश्यांना जिवंत जाळल्याची उदाहरणे नुकतीच घडली. वाळीत टाकण्याचे प्रकारही होतात आणि या सामाजिक बहिष्काराविरुद्ध सरकारही काही करू शकत नाही. शहरात थोडी बरी परिस्थिती आहे. पण तीही थोडीच. तथापि शिकलेल्या अस्पृश्यांना खेड्यात जावे लागले, की आपल्या बांधवांवरील अन्यायाने अधिकच संताप येतो. तिथे राजकीय व आर्थिक सत्ता पंचायत सभासदांच्या हाती अधिक प्रमाणात आल्याने त्यांची अन्याय करण्याची ताकदही वाढली आहे. राजकीय पक्षांना या ज्वलंत सामाजिक प्रश्नाचा विचार करण्यास वेळ नाही. अस्पृश्यांच्या जमिनी बळकावल्या गेल्या, त्यांना माणुसकीला न शोभणारी वागणूक मिळाली, तरी या सर्वांचा परिहार करणारी संघटना वा चळवळ नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात ही जाणीव होती, आता तीही राहिली नाही. पण अस्पृश्य समाजातील नवी पिढी पूर्वीच्या पिढीप्रमाणे मुकाटयाने अन्याय सहन करणार नाही. यातून सामाजिक संघर्ष निर्माण होईल. म्हणून वेळीच सावध होऊन अस्पृश्यतेविरुद्ध व्याख्यानबाजी न करता पद्धतशीर प्रयत्न व्हावयास हवेत. आज ज्यांना गावकुसाबाहेर ठेवले जात आहे, ते उद्या गावाचे कूस मोडून टाकतील, नव्हे, गावसुद्धा उध्वस्त करतील, हा धोका मोठा आहे.

- गोविंद तळवलकर
"अग्रलेख" पृ. २८४

सांस्कृतिक टिपा

१. हरिजन सेवक संघ

अस्पृश्यता हा हिंदू धर्माला जडलेला रोग आहे असे म. गांधींचे मत होते. म्हणून त्यांनी सुरुवातीपासूनच अस्पृश्यतानिवारणाचा आपल्या विधायक

कार्यक्रमात समावेश केला होता. अस्पृश्यांना 'हरिजन' हे नावही त्यांनीच दिले आणि तेच नाव १९३२ साली 'यंग इंडिया' या साप्ताहिकाला दिले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अस्पृश्य एकत्र येऊ लागले आणि दलित चळवळ उभी राहिली. त्यावेळी राजकीय फूट टाळण्यासाठी गांधीजींनी १९३२ साली 'हरिजन सेवक संघाची' स्थापना केली आणि एक वर्ष स्वतःला अस्पृश्यता निवारणाच्या कार्याला पूर्ण वाहून घेतले. शिक्षणसंस्था, मंदिरे, पाणवठे व इतर सार्वजनिक ठिकाणे हरिजनांना खुली करून देण्याचे कार्य संघाने केले.

२. *मिलिंद महाविद्यालय*

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना समर्थ बनवण्यासाठी शिक्षणाची आवश्यकता ओळखली होती. १९५१ साली त्यांनी 'पीपल्स एज्युकेशन सोसायटी' स्थापन केली. या सोसायटीच्या मिलिंद महाविद्यालयाचा कोनशिला समारंभ १ सप्टेंबर १९५१ रोजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या हस्ते झाला. यावेळी केलेल्या भाषणातून बाबासाहेबांनी सर्व दलितांना विद्या मिळवण्याचे आवाहन केले. तिथे सर्व महाराष्ट्रातून दलित विद्यार्थी शिकायला येऊ लागले. त्यामुळे मिलिंद महाविद्यालय हे दलितांच्या चळवळीतील एक केंद्र बनले.

३. *सावरकर आणि अस्पृश्यता निवारण*

अंदमानातून सुटून आल्यावर सावरकर रत्नागिरीत स्थानबद्ध होते. या काळात त्यांनी अस्पृश्यता निवारणाचे कार्य केले. अस्पृश्यांना बाटवून ख्रिश्चन किंवा मुसलमान केले जाई. या गोष्टीला त्यांनी विरोध केला. सक्तीने धर्मांतर केलेल्यांना पुन्हा 'शुद्ध' करून हिंदु धर्मात घेण्याची क्रांतिकारक पद्धत सुरू केली. अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवून देण्यासाठी चळवळ

करून १९२५ साली रत्नागिरीच्या विठोबाच्या मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश मुक्त केला. त्यामुळे त्याचे नाव 'पतित पावन मंदिर' असे पडले. सावरकरांनी अस्पृश्यांना बरोबर घेऊन सहभोजनाचे कार्यक्रम केले, आपल्या प्रभावी वक्तृत्वातून अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी प्रबोधन केले.

शब्दार्थ

निष्पन्न	-	बाहेर पडणे, निघणे
उद्विग्न	-	अत्यंत चीड, नकोसे वाटणे. disgust
शिदोरी	-	प्रवासात [पूर्वीचा पायी प्रवास] खाण्यासाठी दिलेले जेवण. [पाथेय]
गावकूस	-	खेड्याभोवती बांधलेली संरक्षक तटबंदी, सीमेवरची भिंत.
ग्वाही	-	स्पष्टता, सत्यता, पुरावा. [गवाही]
जोपासणे	-	जतन करून वाढवणे.
तुटवडा	-	scarcity - कमतरता, अपुरा साठा
अवहेलना	-	उपेक्षा, हीन वागणूक, अपमान
अटकाव	-	रोखणे, अडवणे, थांबवणे, प्रतिबंध
वाळीत टाकणे	-	बहिष्कार घालणे
बळकावणे	-	बळाचा, ताकदीचा वापर करून घेणे

धड्यावरचे प्रश्न

१. अस्पृश्यतेविषयीच्या कार्यात स्वातंत्र्यानंतर काय फरक पडला ?

२. गांधीजी, सावरकर यांनी अस्पृश्यता निवारणासाठी काय केले ?

३. हा अग्रलेख लिहायला कोणते कारण घडले ?

४. अस्पृश्यांची स्थिती सुधारली नाही असे लेखकाला का वाटते ?

५. अस्पृश्यता खेड्यात आणि शहरात दोन्हीकडे पाळली जाते. कशावरुन ?

६. गांधी जन्मशताब्दी खऱ्या अर्थाने साजरी केली असे आपण केव्हा म्हणू शकलो असतो ?

७. लेखकानी कोणता इशारा दिला आहे ? का ?

टिपा लिहा.

१. सामाजिक प्रश्न आणि राजकीय नेते.

२. अस्पृश्यता निवारणाचे कार्य.

३. खेड्यातल्या अस्पृश्यांची स्थिती.

४. अस्पृश्यतानिवारण - स्पृश्यांची जबाबदारी.

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. लोकप्रतिनिधींनी अस्पृश्यतेसंबंधी काय केले ?

२. स्वातंत्र्यापूर्वी समाजसेवक अस्पृश्यता निवारणाचे कार्य कोणत्या लाभासाठी करत होते ?

३. मिलिंद महाविद्यालयात प्रामुख्याने कोणते विद्यार्थी असतात ?

४. मिलिंद महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गांधी जन्मशताब्दी कशी साजरी केली ?

५. अस्पृश्यतेविषयी सरकारने कोणता कायदा केला आहे ?

६. देवाच्या दारात अस्पृश्यता कशी पाळली जाते ?

७. खेड्यात अस्पृश्य पाणी 'वरच्या अंगाला' का घेऊ शकत नाहीत ?

८. अस्पृश्यांवर समाज कोणते भयंकर अत्याचार करतो ?

९. खेड्यातल्या पंचायतीची अस्पृश्यांवर अन्याय करण्याची शक्ती कशामुळे वाढते ?

१०. व्याख्याने हा अस्पृश्यता निवारणाचा मार्ग आहे का ?

भाषाभ्यास -

वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

निष्पन्न होणे, कोवळ्या वयाचा, अनुभवांची शिदोरी, पायदळी तुडवणे, ग्वाही देणे, शिवाशीव होणे, देवाच्या दारी, अवहेलना होणे, वाळीत टाकणे, व्याख्यानबाजी करणे, सुरात सूर मिसळणे

विरुद्ध अर्थाचे शब्द सांगा.

कोवळा, जरुरी, अलग, बोलका, असंस्कृत, सामाजिक, अवहेलना, अटकाव, माणुसकी, क्वचित, तुटवडा.

अर्थ स्पष्ट करा.

प्रकाशन, दारुण, समवयस्क, क्वचित, अटकाव, परिहार,व्याख्या-नबाजी, समरप्रसंग, अलगता.

वृत्तपत्रांची भाषा -

१. या चर्चेनंतर विशेष काही होईल, असे दिसत नाही. ती [तळमळ] स्वातंत्र्यानंतर उरलीआहे, असे म्हणणे कठीण. काही होणार नाही, तळमळ उरली नाही असे सरळ न लिहिता वरील रचना या भाषेत दिसते. आपले विचार समतोल वाटावे, टोकाचे वाटू नयेत हा हेतू त्यामागे असतो.

२. या भाषेत विचार पूर्ण करण्यासाठी मोठी वाक्ये असतात.

उदा:-बालवयात शाळेत ——————अनुभव येतो.

अस्पृश्यांच्या जमिनी——————तीही राहिली नाही.

३. वृत्तपत्राचे लेखन समाजातल्या दोषांवर टीका करणारे, उपहासपूर्ण असते. या लेखातली उपहास satire व्यक्त करणारी वाक्ये निवडून लिहा.

स्वाध्याय -

१. तुमच्या प्रांतात अस्पृश्यतेचे स्वरूप काय आहे ते लिहा.

२. तुमच्याकडे अस्पृश्यतानिवारणाचे कार्य कोणी केले ?

३. सामाजिक अत्याचारांकडे राजकीय नेते दुर्लक्ष करतात, अशा तुमच्याकडे घडलेल्या एका घटनेची माहिती द्या.

४. महाराष्ट्र टाइम्सचे संपादक श्री. तळवलकर हे मराठीतले एक अग्रणी संपादक आहेत. तुमच्या भाषेतले असे एखादे वर्तमानपत्र आणि त्याच्या संपादकांची माहिती द्या.

५. कोणत्या उपायांनी अस्पृश्यता नष्ट होईल असे तुम्हाला वाटते ?

६. खेडयातल्या शिक्षक-शिक्षिकांबद्दल या लेखात लिहिले आहे. तुमच्या प्रांतातले चित्र काय आहे ?

२४ कहाणी शुक्रवाराची

एक आपलं आटपाट नगर होतं. तिथे एक गरीब ब्राह्मण रहात असे. तो फार दरिद्री होता. त्याची बायको शेजारणीच्या घरी एके दिवशी बसायला गेली. तिनं आपल्या गरिबीचं गाणं गाइलं. शेजारणीनं तिला शुक्रवारचं व्रत करायला सांगितलं. गरीब बाईनं विचारलं, "ते कसं करायचं ?" ती म्हणाली, "बाई बाई, शुक्रवारचं व्रत कर. हे शुक्रवार तू श्रावणापासून धर. सारा दिवस उपास करावा, संध्याकाळी सवाष्णीला बोलवावं. तिचे पाय धुवावे. तिला हळदकुंकू द्यावं, तिची ओटी भरावी, साखर घालून दूध प्यायला द्यावं, भाजलेल्या हरभऱ्याची खिरापत वाटावी. नंतर आपण जेवावं. याप्रमाणे वर्षभर करून त्याचं उद्यापन करावं." ती गरीब बाई घरी आली. देवाची प्रार्थना केली. शुक्रवारचं व्रत करू लागली.

याच गावात तिचा भाऊ रहात होता. तो एके दिवशी सहस्त्रभोजन घालू लागला. साऱ्या गावाला आमंत्रण केलं. बहिणीला काही बोलवलं नाही. का तर ती गरीब. तिला बोलवलं तर लोक हसतील. पुढे दुसरे दिवशी मारे भावाकडे ब्राह्मणांचे थवेच्या थवे येत आहेत. पोटभर जेवत आहेत. बहिणीनं विचार केला की, आपला भाऊ सहस्त्रभोजन घालतो आहे, बोलावणं करायला विसरला असेल, तर आपल्या भावाच्या घरी जायला काही हरकत नाही. असा विचार करून सोवळं नेसली, बरोबर मुलांना घेतलं आणि भावाच्या घरी गेली. पुष्कळ पानं मांडली होती. एका पानावर जाऊन बसली. शेजारच्या

पानांवर मुलांना बसवलं. सर्व पानं भरली. वाढणं वाढलं. तेव्हा तिच्या भावानं तूप वाढायला घेतलं. वाढता वाढता हिच्या पानाशी आला. ही खाली मान घालून बसली होती. तिला हाक मारली, "ताई ताई, तुला वस्त्र नाही, पात्र नाही. दागदागिना नाही, तुझ्याकडे पाहून सर्व लोक मला हसतात. ह्यामुळे मी तुला काही बोलावलं नाही. आज तू जेवायला आलीस ती आलीस. आता उद्या काही येऊ नकोस." असे सांगून पुढे गेला. ही आपली तशीच जेवली. हिरमुसलेलं तोंड केलं. मुलांना घेऊन घरी आली. दुसरे दिवशी मुलं म्हणू लागली, "आई आई, मामाकडे जेवायला चल." बहिणीने विचार केला, कसा झाला तरी आपला भाऊच आहे. बोलला म्हणून काय झालं ? आपली गरिबी आहे म्हणून आपल्याला ऐकून घेणं भाग आहे. आजचा दिवस आपला बाहेर पडला, तितकाच फायदा झाला. असं म्हणून त्याही दिवशी भावाकडे जेवायला गेली. पहिल्या दिवसाप्रमाणं रिकाम्या पानावर बसली. जवळ आपल्या मुलांना बसवलं. भाऊ तूप वाढता वाढता हिच्या पानापाशी आला. ही खाली मान घालून बसली होती. भावानं तिला हाक मारली, "ताई ताई, तू भिकारडी तर भिकारडी आणि सांगितलेले ऐकत नाहीस. जेवायला येऊ नकोस म्हणून काल सांगितले. आज आपली निलाजऱ्यासारखी पोरांचं लेंढार घेऊन आलीस तर आलीस. उद्या आलीस तर हात धरून घालवून देईन." तिनं ते मुकाट्यानं ऐकून घेतलं. तसंच थोडंसं जेवली. अन् उठून चालती झाली.

पुन्हा तिसरे दिवशी जेवायला गेली. भावानं पाहिलं, हात धरून घालवून दिलं. फार दुःखी झाली. देवाची प्रार्थना केली. सारा दिवस उपास पडला. देवीला तिची दया आली. दिवसानुदिवस तिला सुखाचे दिवस दाखवू लागली. असं करता करता वर्ष झाले. बाईचं दारिद्र्य गेलं. पुढे एके दिवशी ती शुक्रवारचं उद्यापन करू लागली. भावाला जेवायला बोलावलं. भाऊ मनात ओशाळा झाला. बहिणीला म्हणू लागला, "ताई ताई, तू उद्या माझ्या

घरी जेवायला ये. नाही काही म्हणू नकोस. घरी काही जेवू नकोस. उद्या जर तू आली नाहीस तर मी काही तुझ्या घरी येणार नाही." बहिणीनं बरं म्हटलं. भावाच्या मनातलं कारण जाणलं.

दुसऱ्या दिवशी लवकर उठली. वेणीफणी केली. दागदागिने ल्यायली, उंची पैठणी नेसली, भावाकडे जेवायला गेली. तो भाऊ तिची वाट पहातच होता. ताई आली तसा तिचा हात धरला, पाटावर बसवलं. पाय धुवायला ऊन पाणी दिलं, पाय पुसायला फडकं दिलं. इतक्यात जेवायची पानं मांडली. ताईचं पान आपल्या शेजारी मांडलं. भाऊ जेवायला बसला. ताईने आपली शालजोडी काढून बसल्या पाटी ठेवली. भाऊ पाहू लागला. मनात कल्पना केली, शालजोडीने उकडत असेल म्हणून काढली असेल. नंतर ताई आपले दागिने काढू लागली, बसल्या पाटी ठेपू लागली. भावानं विचार केला, चड झाले असतील म्हणून काढत असेल. तंतर ताईने भात कालवला. मोठासा घास केला. तो उचलून सरीवर ठेवला. भाजी उचलून ठुशीवर ठेवली. लाडू उचलून चिंचपेटीवर ठेवला. जिलेबी उचलून मोत्याच्या पेंडयावर ठेवली. भावानं विचारलं, "ताई ताई, हे काय करतेस ?" ती म्हणाली, "मी करते हेच बरोबर आहे. ज्यास तू जेवावयास बोलवलंस त्यासच मी भरवते आहे" भाऊ काही हे समजेना. त्यानं तिला पुन्हा सांगितलं, "अग ताई, तू आता तरी जेव." तिनं सांगितलं, "बाबा, हे माझं जेवण नाही, ह्या दागिन्यांचं जेवण आहे. माझं जेवण होतं ते मी सहस्त्रभोजनाच्या दिवशी जेवले." इतकं ऐकल्यावर भाऊ मनात ओशाळला व तसाच उठला. बहिणीचे पाय धरले. झाल्या अपराधाची क्षमा मागितली. बहिणीनं क्षमा केली. नंतर दोघेजण जेवली. मनातली अढी काढून टाकली. दोघांनी देवीचे आभार मानले. भाऊ बहिणीकडे जेवायला गेला. तिला आनंद झाला. देवीनं असं तिला समर्थ करुन आनंदी केलं, तसं तुम्हा आम्हा करो. ही साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण.

सांस्कृतिक टिपा.

१. व्रत आणि उपास

मराठीत ज्याला उपास म्हणतात त्याला साधारणपणे उत्तरेत व्रत म्हणण्याची पद्धत आहे. पण या दोन शब्दांत फरक आहे. व्रत म्हणजे काहीतरी नियम, बंधन. धार्मिक संदर्भात वटसावित्रीचं व्रत, एकभुक्त रहाण्याचं व्रत, केळीच्या पानावर जेवण्याचं व्रत इ. ना व्रत म्हणता येईल. काहीही न खाणे किंवा साबूदाणा, शेंगदाणे इ. विशिष्ट पदार्थच खाणे याला उपास म्हणतात. उपासाच्या दुसऱ्या दिवशी जेवण केलं की पारणं म्हणजे उपास संपला. व्रताची समाप्ती म्हणजे उद्यापन. त्याला काही समारंभ पण असतो. उद्यापनानंतर ते व्रत करत नाहीत. म्हातारपणी उपास झेपत नाहीत तेव्हा त्यांचेही उद्यापन करतात. व्रत हा शब्द मौनव्रत, स्वदेशीचं व्रत, समाजसेवेचं व्रत या संदर्भातही वापरतात.

२. नैवेद्य - प्रसाद - खिरापत

भक्त जे खाद्यपदार्थ देवाला अर्पण करतात त्यांना नैवेद्य म्हणतात. गोडधोडाचा स्वैपाक करून कोणालाही वाढण्यापूर्वी ताट भरून देवापुढे ठेवतात तो नैवेद्य. देवाला नैवेद्य दाखवून झाल्यावर तेच पदार्थ प्रसाद म्हणून इतरांना देतात. खिरापत म्हणजे एखादा पदार्थ अगदी थोडाथोडा हातावर ठेवणे.

३. सहस्रभोजन

आपल्या देशात अन्नदानाचं पुण्य सर्वात मोठं मानतात. मुक्तद्वार, सहस्त्रभोजन, लक्षभोजन, अन्नछत्र हे सर्व शब्द याच संस्कृतीचे निदर्शक आहेत.

४. सोवळं - [वस्त्र]

पावित्र्याच्या कल्पनेतून 'सोवळं' [शुचिता] निर्माण झालं. देवाची पूजा करताना, धार्मिक कारणासाठी स्वैपाक करताना रेशमी वस्त्र नेसतात त्याला सोवळं म्हणतात.

हीच कामं करताना दुसऱ्याचा स्पर्श होऊ न देणं यालाही सोवळं म्हणतात. अमूक माणूस सोवळ्यात आहे याचा अर्थ त्याला घरातल्याही दुसऱ्या कोणी शिवायचे नाही. जुने धार्मिक लोक विशेषतः ब्राह्मण 'सोवळओवळं' पाळायचे याचा अर्थ दुसऱ्याचा स्पर्श इतकंच काय सावलीही टाळायचे.

५. पैठणी

औरंगाबादजवळ गोदावरीच्या काठी पैठण हे प्राचीन गाव आहे. ही शककर्त्या शालीवाहनाची राजधानी. पैठणी हे त्याच्या काळापासून महाराष्ट्रात तयार होणारं उंची भरजरी वस्त्र. मूळ वस्त्र गर्भरेशमी, पूर्ण जरीचा पदर, रुंद काठ आणि अंगभर जरीचे बुट्टे अशी ही हातमागावर विणलेली साडी. जर चांदी आणि सोनं वापरून बनवलेली असते. पूर्वी पैठणीत तीन, पाच, सात तोळे सोनं वापरत असत. पेशवाईत श्रीमंत स्त्रिया तीन मजली, चार मजली नऊवारी पैठण्या नेसत. आता पैठणच्या कारागिरांना प्रोत्साहन देऊन महाराष्ट्र सरकारने पैठणी केंद्र चालवले आहे. तिथे सहावारी पैठण्या बनतात. तरीही त्यांची किंमत ६००० ते ३०,००० किंवा ४०,००० पर्यंत असते. पैठणी हे महाराष्ट्राच्या वैभवाचे चिन्ह असलेले पारंपरिक वस्त्र आहे.

शब्दार्थ

आटपाट	-	आठ पेठा असलेलं म्हणजे मोठं या अर्थी. पण हे काल्पनिक गाव फक्त गोष्टीसाठीच वापरतात.
सवाष्ण	-	सुवासिनी
मारे	-	बोलभाषेत काही आविर्भावासह हा शब्द वापरतात. हिंदीत यूं वापरतात. *उदा:* राम्या मारे मालकाच्या थाटात पलंगावर झोपला होता.
हिरमुसलेला	-	अपमानित, निराश
लेंढार	-	थवा, गट जास्त मुलांसाठी हा हीनतादर्शक शब्द वापरतात.
ओशाळा	-	शरम - आपल्या चुकीची जाणीव झालेला.
शालजोडी	-	खांद्यावर पांघरलेली शाल.
सरी, ठुशी, चिंचपेटी	-	स्त्रियांनी गळ्यात घालायचे जुने दागिने
मोत्याचं पेंडं	-	मोत्याचा अनेकपदरी हार - मधे पदक
अढी	-	मनात ठेवलेला राग

धड्यावरचे प्रश्न -

१. कहाण्यांमधे व्रतांचे महत्त्व का असते ?

२. शुक्रवारचं व्रत कसं करतात ?

३. सहस्त्रभोजन म्हणजे काय ? ते कोणासाठी असते ?

४. भावाने बोलावले नसताना बहीण जेवायला का गेली ?

५. भावाने बहिणीचा कसा अपमान केला ?

६. बहिणीने जेवायला बोलावल्यावर तो मनात ओशाळा का झाला ? भावानं बहिणीचं आपल्या घरी कसं स्वागत केलं ?

७. "ज्याला तू जेवायला बोलवलंस त्यालाच मी भरवते आहे" असं बहीण का म्हणाली ?

८. बहिणीने भावाला का क्षमा केली ?

टिपा लिहा

१. या कहाणीतल्या बहिणीची व्यक्तिरेखा

२. लोककथा

३. कहाणीतून समजणारी श्रीमंत स्त्रीची वेशभूषा

रिकाम्या जागी पाठातले योग्य शब्द भरा

१. एक आपलं ______________ नगर होतं.

२. शेजारणीनं तिला शुक्रवारचं ______________ करायला सांगितलं.

३. संध्याकाळी ______________ बोलवावं. तिचे पाय धुवावे ______________ भाजलेल्या हरभऱ्याची ______________ वाटावी.

४. बहीण __________ नेसली. बरोबर मुलांना घेतलं.

५. ती आपली तशीच जेवली. __________ तोंड केलं.

६. ताई ताई, तू __________ तर __________ आणि सांगितलेले ऐकत नाहीस.

७. आज आपली __________ सारखं पोरांचं __________ घेऊन आलीस.

८. भाऊ मनात __________ झाला.

९. दुसऱ्या दिवशी लौकर उठली __________ केली. दागदागिने __________, उंची __________ नेसली.

१०. ताईने आपली __________ काढून __________ पाटी ठेवली.

११. माझं जेवण होतं ते मी __________ च्या दिवशी जेवले.

१२. मनातली __________ काढून टाकली.

१३. ही __________ उत्तराची कहाणी __________ उत्तरी सुफळ संपूर्ण.

भाषाभ्यास

वाक्प्रचार -

गाणं [रडगाणं] गाणे, व्रत धरणे, आमंत्रण करणे, थवेच्या थवे, -ला हसणे, कसा झाला तरी, भाग असणे, वेळ / दिवस बाहेर पडणे, उपास पडणे, सुखाचे दिवस दाखवणे, ओशाळा होणे, पाय धरणे, अढी ठेवणे / काढून टाकणे, चालता होणे.

पुढील शब्दांचे अर्थ सांगा -

व्रत, सवाष्ण, खिरापत, सहस्त्रभोजन, सोवळं, वाढणं, हिरमुसणे, लेंढार, ओशाळा, पैठणी, शालजोडी, सरी, ठुशी, चिंचपेटी, पेंडं, समर्थ, अढी.

१. तू जेवायला आलीस ती आलीस. आता उद्या काही येऊ नको. 'आलीस ती आलीस' याप्रकारची रचना प्रत्यक्ष संभाषणात जास्त येते. *उदा:*

तो गेला तो गेलाच आणि वरपपैसे घेऊन गेला.
सुधा फोन करायला आली ती आली आणि तासभर बसली.

२. जेवावयास हे रूप जेवायला याच अर्थाचे आहे. प्रौढ लेखी भाषेत जेवावयास, जेवण्यास्तव, जेवण्याकरिता अशी रूपे वापरतात. बोलभाषेत आणि लेखी रूपात फरक दिसतो अशी काही उदाहरणे जमवा.

विरुद्धार्थी शब्द लिहा.

पोटभर, निलाजरा, हिरमुसणे, ऊन, समर्थ, जड

मूळ शब्द सांगा

भिकारडी, दरिद्री, निलाजरा, मुकाट्यानं

जोड शब्द पूर्ण करा.

वस्त्र ________, ________ दागिना, हळद ______,

वेणी ______, शाल ________

स्वाध्याय -

१. व्रतांची कहाणी हा लोककथांचा एक प्रकार आहे. तुमच्या प्रांतातली अशी एक लोककथा मराठीत लिहा.

२. 'शुक्रवारची कहाणी' बहीण आणि भाऊ यांच्या संवाद रूपात लिहा. मुलं, शेजारीण या पात्रांचा त्यात समावेश करा.

३. या कहाणीतून सहस्त्रभोजन, उद्यापन, व्रत इत्यादींची तुम्हाला माहिती मिळते. त्यांवर छोटया सांस्कृतिक टिपा लिहा.

४. लोककथांमधे सर्वसामान्य माणसांच्या मनाचे चित्र असते --- 'शुक्रवारच्या कहाणी'त कोणता मनुष्यस्वभाव व्यक्त झाला आहे ?

५. या कहाणीचा आरंभ आणि शेवट वैशिष्ट्यपूर्ण आहे. तुमच्याकडे कहाणीचा आरंभ, शेवट कसा असतो ?

२५ धामनखोका खाये त्याचा मळा कुठे आहे ?
लोककथा

ढोलापूर गावात एक साधाभोळा शेतमजूर होता. त्याचं नाव सुपळ्या. सुपळ्याचं लग्न झालं आणि त्याचे मायबाप सुखासमाधानानं देवाघरी गेले. सुपळ्या तसा कष्टाळू. पण फार शामळू. त्याची बायको चिंधी महाउस्ताद. फार बेरकी. तिला नवऱ्याच्या मागे चोरून खायची फार सवय. नवरा शेतात गेला की ती कणगीतल्या गव्हाचा शिरा करी, पोळया करी आणि नवऱ्यास मात्र ज्वारी, उडदाच्या मिसळच्या भाकरी खाऊ घाली. तिला भाजी आवडत नसे म्हणून त्याच्या भाकरीवर ठेचा. अशी चिंधी चोरटी.

चिंधीच्या शेजारी एक विधवा लेकुरवाळी होती. फार पक्की. लालचीही फार. उसनेपासने पैसे घेतले तर परत करणार नाही. उसनवार चीजवस्तू नेली तर परत करणार नाही. लबाड फार पण तिच्याशिवाय ह्या दोघांचंही निभेना.

एकदा सुपळ्यानं तुकाराम पाटलांची रखवाली धरली भुईमुगाची, डुकरांचा त्रास फार. जागलचं काम. पण शेंगा खायला मिळतात म्हणून जागल घेतली. पन्नास रुपयांवर. शेतात जागलसाठी सुपळ्या जाताना शेजारच्या मावशीला आपल्या घरी सोबतीला पाठवी. कारण चिंधीला रात्री

एकटीला हुरहूर वाटायची. पण मावशी सुपळ्याची नड ओळखून त्याचा खिसा हलका करायची अन् चिंधीची गरज हेरून तिच्याकडूनही कणीक, पापड मिळवायची. अशी मावशी वस्ताद होती.

सुपळ्या भेटला की तोंडापुरतं गोड बोलणारी मावशी म्हणे, "बाबू ऽ, सुपळ्या ऽ ऽ ! तू फार सुकलास रे. तुझी बायकोमात्र पुरीसारखी टम्म फुगली." आणि चिंधीबरोबर गप्पा मारताना मावशी म्हणे, "बाई चिंधे, किती सुकलीस ग माझी बाय ! अन तो पहा बरं कसा माजलाय अगदी रानडुकरासारखा !" असं तिचं नेहमी दुतोंडी बोलणं. चिंधीच्यामागे ती सुपळ्याला म्हणे, "अरे सुपळ्या, आजकाल काय खात असतोस ? अरे ती चिंधी धामनखोका खात असते." या सहानुभूतीनं सुपळ्या सुखावला. "मावशी ग, मिसळच्या भाकरी, ठेचा खाऊन सगळा कोठा बिघडला न." आपली तक्रार त्यानं मांडली तेव्हा ती म्हणाली, "तू धामनखोका खा. पहा बोका होतोस की नाही मस्त."

चिंधी कधी गोड शिरा करायची तर कधी तिखट. ह्या शिऱ्याला ती धामनखोका म्हणायची. नवऱ्याला कळू नये म्हणून. नवऱ्याला वाढताना विचारायची, "काय वाढू, धामन खोका की मिसळची भाकरी, ठेचा ?" सुपळ्या म्हणे, "तुझा खोका बिका तूच खा. मला आपली ठेचा भाकरीच दे. ती चांगली दमदार असते." बिचाऱ्याला धामनखोका म्हणजे काय हे कुठे माहीत होतं ?

पण मावशीचा मंत्र ऐकलेला सुपळ्या एकेदिवशी धामनखोका खायचा हट्ट धरुन बसला. चिंधी गडबडली पण म्हणाली, "आज अवस आहे. अवसेला धामनखोका खाऊन जागलला जाऊ नये." पण सुपळ्या काही एक ऐकायला तयार नव्हता. तो तिखट शिऱ्यासाठी हटून बसला आणि पोटभर

शिरा खाऊन उठला. वर म्हणाला, “उद्यापासून माझ्यासाठी रोज धामनखोकाच कर. त्या मिसळच्या भाकरीनं माझं पोट पार कामातनं गेलं.” आता चिंधी घाबरली. कारण स्वतःसाठी रोज गहू काढून कणगी जवळजवळ रिकामी होत आली होती.

रात्री मावशी झोपायला आली तेव्हा चिंधीनं आपली अडचण सांगितली. गव्हाची कणगी रिकामी झाल्यानं नवऱ्याला काय सांगावं? याचा तिला विचार पडला होता. त्यावर मावशीनं चिंधीला नामी शक्कल सांगितली. म्हणाली, “अग, काळजी करू नकोस. केस पाठीवर मोकळे सोड. कपाळभर मळवट भर. हातात घे टेंभा आणि जा थेट शेतात मळयाजवळ. सुपळयाच्या मळयाजवळ आरोळया ठोक आणि म्हण, “धामनखोका खाय त्याचा मळा कुठे हाय ?” सुपळया घाबरला की विचार, “सांग तुझ्या मळयावर येऊ तुला खायला की गव्हाच्या कणगीवर जाऊ ?”

चिंधीला गोष्ट पटली. रात्री ती हडळीसारखी मळयाजवळ गेली. जोरजोरात टेंभा नाचवत ओरडायला लागली, “धामन खोका खाय त्याचा मळा कुठे हाय?” त्यावेळी तर सुपळयाची घाबरगुंडी उडाली. आरोळया ठोकता ठोकता चिंधी म्हणाली, “ही ऽऽ हीऽ होऽ ! सांग तुझ्या मळयावर येऊ तुला खायला की तुझ्या घरच्या गव्हाच्या कणगीवर जाऊ ? हां ऽऽ ही ऽऽ हूं ऽ !”

हात जोडून सुपळया म्हणाला, “जा माझ्या घरी गव्हाच्या कणगीवर जा, पण मला खाऊ नकोस. जा.” उड्या मारत चिंधी घरी आली आणि ढाराढूर झोपली. सकाळी सुपळया घरी आला. आल्या आल्या कणगी पहिली. कणगी खूपच रिकामी झाली होती. स्वतःशीच म्हणाला, “देवा रे ! बरं

झालं. जिवावरचं निभलं अन् गव्हावर उतरलं." त्याचं पुटपुटणं ऐकून चिंधीनं समाधानाचा सुस्कारा टाकला. पुन्हा धामनखोका करून खाल्ला.

शब्दार्थ

शामळू	-	बावळट, चतुरपणा अजिबात नाही असा.
बेरकी	-	मनातली गोष्ट दुसऱ्याला कळू न देणारी.
कणगी	-	धान्य साठवण्यासाठी बांबूच्या पट्ट्यांनी बनवलेली खूप मोठी उभी टोपली. ती शेणामातीने लिंपून मग त्यात धान्य साठवतात.
ठेचा	-	तेलावर मिरच्या परतून मिठासह ठेचून केलेली चटणी. कोणी त्यात लसूणही घालतात.
निभणे	-	निबाह पासून. चालणे, काम होणे हा अर्थ
जागल	-	रात्री जागून केलेली रखवाली
भूईमूग	-	शेंगदाणे
हुरहूर	-	अवस्थता, काळजी
नड	-	गरज
नामी	-	उत्तम, नेमकी
शक्कल	-	युक्ती, उपाय

मळवट	-	कपाळभर लावलेलं कुंकू
टेंभा	-	मशाल
हडळ	-	पिशाची, बाईच्या रूपातलं हे भूत मुलांना खातं अशी समजूत आहे.

धड्यावरचे प्रश्न

१. सुपळ्या आणि चिंधी यांच्या स्वभावात काय फरक होता ?

२. लबाड बायकोचे कोणते गुणविशेष चिंधीमधे होते ?

३. मावशीच्या सोबतीची गरज सुपळ्या आणि चिंधीला का वाटली ?

४. मावशीच्या वागण्यात दुतोंडीपणा आणि लबाडी कशी होती ?

५. चिंधी अडचणीत का सापडली ?

६. मावशीने तिला कोणता उपाय सांगितला ?

७. सुपळ्याला आपले संकट टळले असे का वाटले ?

८. या कथेत मनुष्यस्वभावाच्या कोणत्या विशेषांवर प्रकाश टाकला आहे?

टिपा लिहा

१. व्यक्तिचित्र - सुपळ्या, चिंधी, मावशी

२. शेतमजुराचं जीवन

३. खेड्यातल्या लोकांच्या अंधश्रद्धा

रिकाम्या जागी पाठातले योग्य शब्द लिहा.

१. सुपळ्या तसा __________ पण फार __________ .

२. त्याची बायको चिंधी __________ , फार __________

३. __________ गव्हाचा शिरा करी आणि नवऱ्याला मात्र __________ __________ __________ खाऊ घाली.

४. एक विधवा __________ होती ..... __________ पैसे घेतले तर परत करणार नाही.

५. शेंगा खायला मिळतात म्हणून सुपळ्यानं __________ घेतली.

६. अन् तो पहा बरं कसा माजलाय अगदी __________. असं तिचं __________ बोलणं.

७. ती चिंधी __________ खात असते.

८. आज अवस आहे. __________ धामन खोका खाऊन __________ जाऊ नये.

९. मावशीनं चिंधीला __________ सांगितली.

१०. कपाळभर __________ भर. हातात घे __________ .

११. रात्री ती __________ मळयाजवळ गेली.

१२. सुपळ्याची तर __________ उडाली.

१३. चिंधी घरी आली आणि ________ झोपली.

१४. देवारे ! बरं झालं जिवावरचं ________ अन् गव्हावर ____ .

भाषाभ्यास -

वाक्प्रचार -

देवाघरी जाणे, रखवाली धरणे, टम्म फुगणे, मंत्र ऐकणे, हटून बसणे, नामी शक्कल, आरोळया ठोकणे, घाबरगुंडी उडणे, ढाराढूर झोपणे, जिवावरचं निभणे, सुस्कारा टाकणे, खिसा हलका करणे, तोंडापुरतं बोलणे, कामातून जाणे.

अर्थ सांगा.

शामळू, बेरकी, कणगी, ठेचा, उसनवार, निभणे, जागल, नड, कणीक, दुतोंडी, अवस, शक्कल, मळवट, टेंभा, हडळ, आरोळी, दमदार, हुरहूर

जोडशब्द पूर्ण करा -

साधा______, शेत______, ______बाप,

______समाधान, चीज______, उसने______

मूळ शब्द सांगा -

कष्टाळू, लेकुरवाळी, उसनवार,

रखवाली, तोंडापुरतं, दमदार

विरुद्धार्थी शब्द सांगा -

साधाभोळा, कष्टाळू, शामळू, बेरकी,
चोरटा, लेकुरवाळी, उसनवार, सुखावणे

स्वाध्याय

१. या लोककथेतील विनोदावर टिपण लिहा.

२. लोककथेत मनुष्यस्वभावाचे मार्मिक चित्र असते. कसे ते या कथेच्या आधारे सांगा.

३. तुमच्या प्रांतातली एखादी विनोदी लोककथा मराठीत लिहा.

४. या कथेतली सुपळया, चिंधी, पाटील आणि मावशी ही पात्रे घेऊन छोटी नाटिका लिहा.

५. चिंधी स्वतःच ही गोष्ट सांगते आहे अशी कल्पना करून ही गोष्ट लिहा.

२६ बाणाईसाठी मेंढपाळ झाला देव मल्हारी

चंदनपूरच्या जंगलात एकदा मेंढपाळांचा फेरा आला. मुबलक गवत पाहून त्यांनी वस्ती थाटली. रंगीबेरंगी लोकरीच्या पिसाऱ्यांचा राखण्यादेव उभा केला. त्यांची तरबेज कुत्री माकडांमागे धावू लागली. मेंढ्यांच्या बें बें ऽऽ नी वातावरणात कल्लोळ उठवला. बायकांनी तीन दगडांच्या चुलाण्यावर भाकरी थापल्या आणि माणसांनी दुधाचा काला फस्त केला. रात्री तरण्याताठ्यांनी ढोल काढले आणि गाण्याचा सूर धरला. तेव्हा अचानक गडगडल्यासारखं होऊन प्रकाशाचा लोळ एका कातळावर स्थिरावला. त्यातून एका तेजस्वी मुलीनं जन्म घेतला. धनगरांचा प्रमुख आनंदानी नाचला. देवाच्या कृपेने मिळालेल्या या मुलीचं नाव ठेवलं बाणाई !

बाणाई शिवभक्त होती. रोज वाळूचं शिवलिंग करून ती पूजा करायची आणि आपली मेंढरं घेऊन रानात चरायला न्यायची. ती चंद्रकलेप्रमाणे वाढू लागली. मेंढरं वळवू लागली. मेंढरांवर तिचा भारी जीव. चंदनपूरचं गवत संपल्यावर धनगर गड जेजुरीच्या परिसरात आले.

जेजुरी गडाचा कळस सोन्याचा
मल्हारी देव नवरा म्हाळसाचा

अशी गाणी ऐकून बाणाईला आठवलं की, आपल्याला मल्हारीसाठी पाठवलं. "देवलोक सोडला. मेंढरांचा धंदा केला. कुणासाठी ?. . माझ्या मल्हारीसाठी !" बाणाई मल्हारीसाठी झुरू लागली. मल्हारीला भेटायला ती चक्क जेजुरी गडावरच गेली.

दुपारची वेळ होती. भोजन आटोपून मल्हारी आणि म्हाळसा सारीपाट खेळत होते. म्हाळसा सारीपाटात पटाईत. डाव रंगात आला होता. बाणाईनं व्दारपालाच्या हाती एका भूर्जपत्रावर सांगावा दिला. करंगळीच्या नखानं पत्रावर आपल्या अंतःकरणातले भाव कोरले. डोळ्यातल्या काजळानं त्यांना सुंदर रूप दिलं. पत्र वाचताच मल्हारीचं अंतःकरण बाणूच्या मुठीत गेलं. पण ती तिथे थांबते थोडीच? ती आली तशी परत गेली.

मल्हारीचा जीव पाखरासारखा उडाला. म्हाळसाचा जीव कावराबावरा झाला. करमत नाही म्हणून शिकारीला जातो असा संदेशा त्यानं म्हाळसाला पाठवला. म्हाळसाच्या मनात अंदेशा आला.

धनगरांच्या वस्तीवर वीर मल्हारी आला. आपला अबलख घोडा उभा केला. बावळट धनगराचा वेश घेतला. बाणाईच्या घरी नोकरी पत्करली. मुंडासं बांधलं, हाती काठी घेतली आणि प्रिय बाणूसाठी 'हेक्ऽऽ च्येक्ऽऽ' करून मेंढरं हाकू लागला. 'प्रेमाची जात लई न्यारी बाणूसाठी मेंढरं प्यारी' अशी त्याची गत झाली. "ए ऽ बावळटा ऽऽ, तू टेकाडावर मेंढरं घेऊन जा की ! येळ करू नगस ! न्याहारी आणते बघ म्या मागाहून." सकाळी सकाळी बाणूनं हिसका दाखवला. बावळट ध्यान मेंढरं घेऊन निघालं. मल्हारी टेकाडावर आला. आपली करामत दाखवण्यासाठी त्यानं मेंढरं मारून टाकली आणि बाणूच्या वाटेवर काळीज अंथरून बसला.

सूर्य हातभर वर आला तशी लसणाचा ठेचा अन् बाजरीची भाकरी घेऊन बाणू आली. आली तशी मटकन् खालीच बसली. मेंढरांची गती पाहून तिची मती गुंग झाली. मग डोईवरचा पदर कमरेला खोचून हातवारे करत ती मल्हारीला म्हणाली, "ए म्हसन्या, ह्ये काय झाल्लं?"

"वाघरू आल्ता. त्यानं मारली. म्या एकटा काय करनार ?" मल्हारी साळसूदपणे म्हणाला.

"बांगड्या घाल की हातात. अन हयो भंडारा फास की डोसक्याला! आता माझी मेंढरं आणून दे म्हसन्या !" चवताळलेली बाणू गरजली.

"आता मेंढरं आणून द्याया का मी द्येव हाय का ?" मल्हारी डोकं खाजवत म्हणाला.

"तू द्येव ? आरं वाघाचं भेव वाटतं तं देव कसला ? माझी मेंढरं दे आधी." बाणूचा मेंढरांवर भारी जीव. ती मेंढरांसाठी सर्व काही करेल याची मल्हारीला खात्री होती. तिची गंमत पहात तो उभा होता.

"अगो मेंढरं आता फट्दिशी जिती करतो. माझी बायकू होशील का?" बाणू तरातरा त्याच्या नाकाजवळ बोटं मोडत म्हणाली, "बायकू अन तुझी ?" मग राग विसरून "खो ऽ खो ऽ " हसू लागली. हसता हसता म्हणाली, "नवरा कसा मर्द पाहयजे वाघासारखा. ढाण्या वाघ मल्हारीसारखा!" तिच्या त्या रांगडया बोलण्यानं, फटाकडया चालण्यानं मल्हारीला वेड लागलं. नारीचं हे रूप किती गोड असं त्याला वाटलं.

बावळट मेंढपाळानं हेका धरला आणि मेंढरांसाठी ती कबूल झाली. पहाता पहाता बें ऽऽ बें ऽऽ करून मेंढरं उठली. बाणूला मल्हारीची किमया कळली. झाडाला रानवेलीनं लपेटावं तसे तिनी मल्हारीचे पाय धरले.

मेंढरांचा कळप वस्तीपर्यंत हाकारून ती दोघं घोडयावर स्वार झाली. जेजुरी गडाच्या बाजूला बाणूसाठी देवानं वेगळा महाल बांधला. मल्हारी धनगरांचा जावई झाल्यामुळे वस्तीवर आनंदाला उधाण आलं. ढोलाच्या तालावर पागोटयांचे शेमले वाऱ्यावर उडाले. डफावर थाप पडून रांगडे धनगर गाणी गाऊ लागले ---

जेजुरी गडाला नवलाख पायरी
येळकोट ऽ येळकोट !
जय मल्हार !

सांस्कृतिक टिपा -

जेजुरी - पुणे जिल्हयात सासवडच्या आग्नेयेला दहा मैलांवर हे धार्मिक ठिकाण आहे. इथे खंडोबा हे मुख्य दैवत आहे. त्याची जत्रा चंपाषष्ठीला भरते. या देवाला बहिरोबा, मल्हारी, मार्तंड हीही नावे आहेत. खंडोबाची दोन देवालये उंच टेकड्यांवर आहेत. त्याला कडेपठार म्हणतात. देवळात जाताना खूप पायऱ्या चढून जावे लागते. वाटेत हेगडी या धनगर प्रधानाची आणि शेजारी बाणाबाईची समाधी आहे. म्हाळसा शिखरावरच्या मंदिरात आहे. जेजुरीला होळकरांनी मंदिरं, इमारती बांधल्या आहेत. मल्लासुर राक्षसाचा नाश करण्यासाठी शिवाने खंडोबाचा अवतार घेतला म्हणून तो मल्हारी. खंडोबाला अर्पण केलेल्या मुलांना वाघ्या आणि मुलींना मुरळी म्हणतात. खंडोबा हे धनगर, कोळी, मराठा यांचे आराध्यदैवत आहे.

शब्दार्थ

मुबलक - खूप

लोळ - आकार घेतलेला प्रकाश

झुरणे - प्राप्तीसाठी तळमळणे

कावराबावरा - बेचैन, व्याकुळ

मुंडासं - पागोटं. डोक्याला गुंडाळलेलं कापड

म्हसन्या - मसण्या, स्मशानात गेलेला म्हणजे मेलेला या अर्थाची शिवी

साळसूद - वरवर भोळेपणा दाखवणारा

ढाण्या वाघ - लांब पट्ट्यांचा वाघ - Royal Bengal tiger

रांगडडा - सौम्य - नागर नाही असा

शेमला - पागोट्याचं पाठीवर सोडलेलं टोक

तरबेज - पटाईत, कुशल

कातळ - खडक

सांगावा - निरोप, संदेश

अंदेशा - शंका, संशय

हिसका - कडकपणा

भंडारा - काही देवळात कपाळावर अंगाऱ्याऐवजी हळद लावतात त्याला भंडारा म्हणतात

उधाण - भरती

कल्लोळ - कोलाहल

धड्यावरचे प्रश्न -

१. मेंढपाळांच्या जीवनाचं वर्णन करा.

२. बाणाई कोण होती ? तिच्या जन्माचं रहस्य काय होतं ?

३. बाणाईचं प्रेम मल्हारीपर्यंत कसं पोचलं ?

४. बाणाईच्या प्राप्तीसाठी मल्हारीनं काय केलं ?

५. "बायकू अन तुझी ?" असं बाणाई का म्हणाली ?

६. मल्हारीची खूण तिला कशी पटली ?

७. बाणाईच्या लग्नाचा धनगरांवर काय परिणाम झाला ?

टिपा लिहा -

१. दैवतांच्या लोककथा

२. बाणाईची व्यक्तिरेखा

३. धनगर वस्ती

४. प्रेमवेडा मल्हारी

प्रश्नाचं एका वाक्यात उत्तर द्या.

१. धनगरांचा देव कसा असतो ?

२. धनगर कुत्री कशासाठी पाळतात ?

३. धनगरांचं जेवण काय असतं ?

४. बाणाई सामान्य मुलगी होती का ?

५. मल्हारी आणि म्हाळसा काय खेळत होते ?

६. बाणाईनं मल्हारीला पत्र कसं लिहिलं ?

७. मल्हारीनं बाणाईसाठी कसला वेश घेलता ?

८. बाणूनं न्याहरीसाठी काय आणलं ?

९. बाणू लग्नाला का कबूल झाली ?

१०. आपला आनंद व्यक्त करण्यासाठी धनगरांनी काय केलं ?

भाषाभ्यास -

वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

फस्त करणे, जीव असणे, झुरू लागणे, रंगात येणे, सांगावा देणे, मुठीत जाणे, कावराबावरा होणे, गत होणे, हिसका दाखवणे, काळीज अंथरून बसणे, मती गुंग होणे, आनंदाला उधाण येणे.

समानार्थी शब्द द्या.

मेंढपाळ, पागोटं, मुबलक, राखण्या, तरबेज, सांगावा, अंदेशा, बावळट, जिती

जोडशब्द पूर्ण करा -

तरणा ——— कावरा ——— हात ———

वाक्यरचना -

१. पण ती तिथे थांबते थोडीच ? - ही प्रश्नार्थी रचना नकारात्मक अर्थासाठी वापरतात. याचा अर्थ ती थांबली नाही.' 'तो ऐकतो थोडाच ?' म्हणजे तो ऐकत नाही. याप्रकारची पाच वाक्ये बनवा.

२. प्रेमाची ..... न्यारी, मेंढरं प्यारी. त्यानं संदेशा पाठवला - तिला अंदेशा आला, गती पाहून तिची मती गुंग झाली. ही उदाहरणं यमक अलंकाराची आहेत. लोककथांमधे अशी रचना आढळते. या पाठातली 'यमका' ची उदाहरणे शोधून काढा.

स्वाध्याय -

१. या लोककथेत ग्रामीण भाषा वापरली आहे. ग्रामीण शब्द आणि त्यांच्यासाठी असलेले प्रमाण भाषेतले शब्द लिहा.

२. तुमच्याकडच्या एखाद्या दैवतासंबंधीची लोककथा मराठीत लिहा.

३. मल्हारीसंबंधी जशी गाणी आहेत तशी तुमच्या दैवतांसंबधी गाणी आहेत का ? अशा एखाद्या गाण्याचा भावार्थ मराठीत लिहा.

४. जेजुरी पुण्यापासून जवळ आहे. तिथे जाऊन मल्हारी, बाणाबाईची मंदिरं पहा आणि त्यांच्यावर एक टिपण लिहा.

५. बाणाई स्वतः सांगतेय अशी कल्पना करून ही कथा लिहा.

लोकगीत

अक्कणमाती चिक्कणमाती खळगा तो खणावा
अस्सा खळगा सुरेख बाई जातं ते रोवावं
अस्सं जातं सुरेख बाई गहू ते दळावे
अस्से गहू सुरेख बाई रवापिठी काढावी
अश्शी रवापिठी सुरेख बाई करंज्या कराव्या
अश्शा करंज्या सुरेख बाई तबकी भराव्या
अस्सं तबक सुरेख बाई शेल्यानी झाकावं
अस्सा शेला सुरेख बाई पालखीत नेऊन ठेवावा
अश्शी पालखी सुरेख बाई माहेरी धाडावी
अस्सं माहेर सुरेख बाई खायाला मिळतं
अस्सं सासर द्वाड बाई कोंडोनी मारीत

गीत

गंगायमुना डोळ्यांत उभ्या का
जा मुली जा, दिल्या घरी तू सुखी रहा ।।धृ।।

कडकडुनी तू मिठी मारता बाळे
बालपण आले आले घमवित घुंगुरवाळे
आठवले सारे सारे गहिवरले डोळे
कढ मायेचे तुला सांगती जा ।।१।।

दारात उभी राहिली खिलारी जोडी
बघ दीर धाकले बसले खोळंबुन गाडी
पूस ग डोळे या पदराने सावर ही साडी
रूप दर्पणी मला ठेवुनी जा ।।२।।

मोठ्याची तू सून पाटलिण मानाची

हसले तुझे ग हिरवे बिलवर लगिनचुडे
बघू नकोस मागे मागे, लाडके बघ पुढे
नकोस विसरू परि आईला जा. ।।३।।

पी. सावळाराम

महाराष्ट्र माउली

सुखदुःखाच्या काळी अथवा जवळदूरच्या स्थळी
सुदृढ वा तनु जर्जर जाहली ।।
प्रिय माझी ती आठवते मज महाराष्ट्र माउलदृ।।धृ।।
गिरि विंध्याद्री हा केशपाश साजिरा
गिरि सह्य जियेचा पदर गमे धावरा
श्री कृष्णौघाचा कमरपट्ट गोजिरा
तीर्थक्षेत्रे भली जियेची मंगल भूषावली
विखुरली स्थळोस्थळी चांगली ।।१।। *प्रिय माझी ती*
श्री ज्ञानेश्वर हा पुत्र जिचा थोरला
बहु भावंडांना कल्पतरू जाहला
त्यामाजि शिवाजी वीरमणी जन्मला
जोडीस तयाच्या समर्थ तो लाभला
देति साद चाहुली तयाच्या खोऱ्यातुनि मावळी
जियेची कूस अशी पोसली ।।२।। *प्रिय माझी ती*

जी मानवैभवी श्रीमंती मानिते
जी सरस्वतीचे क्रीडांगण शोभते
जी कलागुणांचे धात्रीपण मिरविते
जी पुण्यतपांचे माहेरचि जागते
साधुदास तत्पदी वाहतो सादर पुष्पांजली
तुम्ही घ्या भाग त्यात मंडळी ।।३।। *प्रिय माझी ती*

दि. १८.१०.४१

'साधुदास'
गो. गो. मुजुमदार

स्मृती

नवलाख तळपती दीप विजेचे येथ
उतरली तारकादळे जणू नगरात
परि स्मरते आणिक करते व्याकुळ केव्हा
त्या माजघरातिल मंद दिव्याची वात. १

वाऱ्यावर येथिल रातराणि ही धुंद
टाकता उसासे, चरणचाल हो मंद
परि स्मरतो आणिक करतो व्याकुळ केव्हा
त्या परसामधला एकच पारीजात. २

हेलावे भवती सागर येथ अफाट
तीरावर श्रीमान इमारतींचा थाट
परि स्मरतो आणिक करतो व्याकुळ केव्हा
तो नदीकिनारा आणि भंगला धाट. ३

बेहोष चढे जलशांना येथिल रंग
रुणझुणता नूपुर जीव बने निःसंग

परि स्मरतो आणिक करतो व्याकुळ केव्हा
तू आर्त एक जो ऐकवलास अभंग. ४

लावण्यवतींचा लालस येथ निवास
मदिरेत माणकापरी तरारे फेस
परि स्मरती आणिक करती व्याकुळ केव्हा
ते उदास डोळे त्यातिल करुणविलास ५

- कुसुमाग्रज

विरुद्धार्थी- स्वयंपूर्ण, ओळखीचा, रेळचेळ, खवळळेला, चलाख, अपयशी, उध्यास, प्रोत्साहन, धाडसी, स्फूर्तिदायक, जे, ऊपेक्षित, विरंबना, रचनात्मक, शुभ्र, पसंती, पोषक, ओळा, संवाष्ण, संतुष्ट, थारात, समृद्धी, अविस्मरणीय, समाधान, प्रसन्न, कौतुक, भोजकी, परिचित, कल्याण, असत्य, अनुभवी, सोय, सावध, पक्का, लहानपण, पोटकर, निलाजरा, ऊन, समर्थ, जड, शामळू, बेरकी, साधाभोळा, उसनवार - रोख

समानार्थी - स्वयंपूर्ण, प्रकृती, रेलचेलल, खवळलेला, चलाख, प्रलोभन, भटजी, लहानपण, कसरत, पक्की, भिंग, सवाष्ण, लेंढार, शामळू, ळेरकी, नड, शक्कळ,

जोडशब्द - तोंडओळख, मारहाण, धरपकड, चढुतार, नासधूस, अंगलपंगल, कोडकौतुक, भुलंबाळं, लहानसहान, देवाणघेवाण, शेजारपाजार, हळदीकुंकू, जुळवाजुळव, थोडाफार/ सजरांगोळी, वडीलधारे, होमहवन, साडीचोळी, पानसुपारी, आजकाल, गाठभरे, मान-पान, हौसभौज, पापडकुरड्या, सनईचौघडा, बंडबाजा, चुळबोळकी, काचाकपड्या, वस्त्रपात्र, दागदागिना, हळदकुंकू, वेणफिणी, शाळजो , उसनेपासने, साधाभोळा, शेभभात, माय-बाप, सुखसमाधान, चीजवस्तू

शब्दापासून दुसरे शब्द

बांधकाम, गडबडील, तयारी, महात्म्या, सांस्कृतिक, रसाळ, रुचकर, निसर्गवेडा, मच्छीमारी, विधिपूर्वक, समुद्रमार्गे, ठेवण्याजोगा, नेमबाज, कीर्तनकार, भटंकती, टोकदार, शेंगराळ, स्थिरावणे, नेमणूक, नाट्यमय,

शेकोटी, सेकुरवाळी, दर्जेदार, काढेरी, कष्टाळू, लेकुखाळी, उसनवार, रखवाली, दमदार, भिकारडी, दरिद्री, मुकाट्यानं

रचना -

मराठी / मराठीन / मराठीनून

ऐनवेळी / वेळेवर / वेळेत / वेळी

ताईइतकी / ताईएवढी

म्हटळं जा - ओळखळाना -

घरचा / घराचा

तुर्क म्हणवत आज

त्रास होऊ नये म्हणून

आवा लाभ

देण देन / देणा देना

नी .... करावं

वाक्प्रचार -

स्वागत करणे, तोंढओळख होणे, इतिहास घडवणे, अग्रेसर असणे, नाव ठेवमे, ओटी भरणे, ओरीत धाळणे, मान असणे, ओळख करून घे, स्मरण कर, गजर कर, लाब मार, झेंडा फडकव, दर्शन घडव, अर्पण करणे, आठवण करून देणे, स्पर्धा लावणे, मानाठा जाणे, दृष्ट लागणे, तोंड गोड होणे, वार्शिंग बांधणे, घास देणे, कामाला लागणे, माकीचा

साक्षीदार, आवाज उठवणे, प्रेरणा देणे, उठाव करणे, बळी पडणे, कहर करणे, पेटून उठणे, कार्यकाज साधणे, पिच्छा पुरवणे, वारे संचारणे, जसाच्यालसा, हां हां म्हणता, नजर सिळणे, हरवून नाणे, पत्ता नाजगणे, साक्ष देणे, शेमांच उभे रहाणे, जिवंत होणे, पहाता पर्हाता, पाय न पिघणे, सतीचं वाण, अभिमान वाटणे, मान डोळावणे, देवाणघेवाण, उठून दिसणे, कोडकौतुक करणे, साजरा करणे, च्या निमित्ताने, हौस मारणे, जुळवाजुळव करणे, तोंड देने, वेध लागणे, आनंद मनात न मावणे, ठसा उभरवणे, पाठ घरणे, तोडेक्गाडे करणे, कौतुक करणे, अभिनंदन करणे, स्थळं पहाणे, पार पडणे, कामाला लागणे, भवठेवायला जागा नसमे, गाठभरे होणे, हौस असणे, धावपळ करणे, डोळ्याण पाणी जमणे, पाहणी करणे, आग्रह करणे, जड जाणे, दिलासा देणे, झालंच तर -, सूर मारणे, लुडवूड करणे, बोळवण करणे, कसरत करणे, शोधून काढणे, जास्तति जास्त, गाणं गणि, व्रत धरणे, आमंत्रण करणे, कसा झाला तरी, भाग असणे, वेळ / दिवस बाहेर पडणे, उपास पडणे, ओशाळा होणे, पाय धरणे, अढी ठेवणे - काढून टाकणे, चाळता होणे, देवाघरी जाणे, रखवाली धरणे, रम्म फुगणे, मंत्र ळेकणे, हटून बसणे, नामी शक्कळ, रगुंडी उडणे, जिवावरचं निभणे, सुस्कारा टाकणे, खिसा हळका करणे, कामानून जाणे, तोंडापुरतं बोळणे

म्हणी -

१. घरोघरी मातीच्या चुली

२. उथळ पाण्याला खळखलाट फार

३. मुलाचे पाय पाळव्यात दिसतात

४. खाण तशी माती

५. टीक जुल, ई,ब ाट् टीक जुल, पव्ट्

६. तुपात तळलं खेरण घोळलं तरी कार्लं कडू ते कडूच !

७. नावडतीचं मीठ अळणी

८. नाचता येईना अंगण वाकडं
स्वैपाक येईना ओली लाकडं

९. बाप तसा बेटा कुंभार तसा लोटा

१०. शितावरून भाताची परीक्षा

११. असतील शिनं तर जमतील भुतं

१२. हातच्या काकवाला आरसा कशाला ?

१३. एकादशीच्या घरी शिवराम

१४. काखेत कळसा गावाला वळसा

१५. आधी करी सून सून मग करी फुणफुण

१६. आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार ?

१७. बैल गेला नि झोपा केला

१८. सुंभ जळला तरी पीळ जात नाही

१९. खिसात नाही आणा आणि मला पारीळ म्हणा

२०. बुडत्याला काडीचा आधार

सांस्कृतिक टिपा

तमाशा, ओटी, बारशाच विधी, चानुमसि, ज्ञानदेवे रचिळा पाया, पंढरीची वारी, बत्तीस शिक्षक, मंगळागौर, दहीहंग, दृष्ट लागणे, हरदास, प्रतापगड, वाण, हळदीकुंकू, अहेर, पत्रिका पहाणे, साखरपुडा, रुखवन, अक्षत देणे, सीमांतपूजन, विहीण म्हणजे, उखाणा, मक्कखांब, हादगा किंवा भोडळा, व्रत आणि उपास, पैढणी